सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. ११ जुलै २०२६ | वर्ष - ४ थे | अंक ८८ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## सोन्या - चांदीला किंचित झळाळी

नवी दिल्ली : तुमच्या घरी लग्नसोहळा किंवा सणासुदीचे कार्यक्रम असतील आणि तुम्ही सोने-चांदी खरेदीचा विचार करत असाल तर तुम्हाला दररोज बदलत्या दरांमध्ये नक्कीच माहिती हवी. शुक्रवार, आठवड्याच्या शेवटच्या व्यवहार दिवशी, १० जुलै रोजी सोने आणि चांदीच्या दरांत किंचित वाढ नोंदवली गेली आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धविराम चर्चा विफळ झाल्यामुळेसराफा बाजारावर दबावनिर्माण झाला होता, ज्याचा सुरुवातीला डॉलरला फायदा झाला आणि मौल्यवान धातूंवर मात्र दबाव आला व त्यानंतरही बाजारात अजूनही सावधगिरीचे वातावरण पहिले जात आहे. सराफा बाजारात २४ सोन्याचा १० ग्रॅम दर १.४९ लाख रुपयांवर पोहोचला तर, चांदीसुद्धा महाग झाली आणि अंदाजे २.३५ लाख रुपये किलोवर उसळी घेतली.

## ३९ अत्यावश्यक औषधांच्या किमती निश्चित



वृत्तसंस्था
नवी दिल्ली : आरोग्यसेवा कमी खर्चिक करण्याच्या दिशेने केंद्र सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. राष्ट्रीय औषध किंमत निर्धारण प्राधिकरणाने ३९ अत्यावश्यक औषधांच्या किमती निश्चित केल्या आहेत.

या निर्णयामुळे रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, संसर्ग आणि इतर गंभीर आजारांवरील अनेक औषधे कमी किंमतीत उपलब्ध होणार आहेत. सरकारच्या या निर्णयाचा फायदा लाखो रुग्णांना होणार असून औषधांच्या वाढत्या किमतींवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल. छझझ- ने स्पष्ट केले आहे की, कोणतीही औषध उत्पादक कंपनी किंवा विक्रेता सरकारने निश्रि्चत केलेल्या दरापेक्षा जास्त किंमत आकारू शकणार नाही.

सर्व औषध विक्रेते आणि वितरकांनी दुकानात औषधांच्या किमतींची यादी ठळकपणे प्रदर्शित करणे बंधनकारक असेल. ग्राहकांना किंमती सहज पाहता याव्यात यासाठी ही यादी दुकानाच्या दर्शनी भागात लावावी लागेल.निश्रि्चत दरापेक्षा जास्त किंमत आकारल्यास संबंधित कंपनीविरुद्ध कारवाई केली जाईल,असा इशाराही देण्यात आला आहे.

# तुकाराम मुंडेंच्या कारवाईनंतर दूध संकलनात २५ टक्के घट

## मंत्री नरहरी झिरवळ यांची कबुली; विधानभवनात येणाऱ्या अन्नाचीही तपासणी होणार



तभा वृत्तसेवा
मुंबई : अन्न आणि औषध प्रशासन (एफडीए) विभागाने राज्यात राबविलेल्या धडक भेसळविरोधी मोहिमेनंतर आणि वरिष्ठ अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या धडाकेबाज कारवाऱ्यांच्या धसक्यामुळे राज्यातील दूध संघांमधील दूध संकलनात तब्बल २० ते २५ टक्क्यांची घट झाली असल्याची कबुली अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी शुक्रवारी विधानसभेत दिली. दुधातील जीवघेण्या भेसळीचा हा मुद्दा सभागृहात गाजत असतानाच, खुद्द विधानभवनात आमदारांच्या जेवणात माशी सापडल्याचे उघडकीस आल्याने आता विधिमंडळ परिसरात येणाऱ्या अन्नाचीही तपासणी करण्याचे आदेश विधानसभा अध्यक्षांनी दिले आहेत.विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान जालना जिल्ह्यातील बनावट तुपाच्या कारखान्यावर झालेल्या कारवाईबाबत आमदार प्रकाश सोळंके यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यावरील चर्चेत उपप्रश्न विचारताना आमदार गोपीचंद पडळकर यांनी दुधातील भेसळीचा गंभीर प्रकार सभागृहासमोर आणला. पडळकर म्हणाले की, एका शेतकऱ्याच्या गोठ्यात एकही जनावर नसताना त्याच्याकडून दररोज दूध संघात १५० लिटर दूध पाठवले जात होते. पश्रि्चम महाराष्ट्रात किंवा अन्य ठिकाणी असलेल्या दूध संघांमध्ये अन्न व औषध प्रशासन विभागाची कारवाई होण्यापूर्वी किती दूध येत होते आणि कारवाई सुरू झाल्यावर त्यात किती तफावत पडली, याचा रेकॉर्ड तपासला पाहिजे. माझ्या जिल्ह्यातील बऱ्याच दूध संघांमध्ये दुधापासून इतर उपपदार्थ तयार करणे आता कमी झाले आहे. दुधात युरिया मिसळणारे हे नराधम महाराष्ट्रातील करोडो लोकांच्या जीवाशी खेळत असून, तपासणीत दोषी आढळणाऱ्या दूध संघांच्या मालकांवर सरकार काय कारवाई करणार?, असा सवाल त्यांनी केला.यावर उत्तर देताना मंत्री नरहरी झिरवाळ यांनी सांगितले की, ज्या दिवसापासून विभागाने भेसळविरोधी कठोर कारवाई सुरू केली आहे, तेव्हापासून दूध संकलनात २० ते २५ टक्क्यांची घट झालेली दिसून आली आहे. यावरून भेसळीचे प्रमाण स्पष्ट होत असून, तपासणीअंती दोषी आढळलेल्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, असे त्यांनी सांगितले. जालना जिल्ह्यातील तीर्थपुरी येथील 'मे. मुंदडा इंडस्ट्रीज' या तुपाच्या कारखान्यावर अचानक छापा टाकून १३ लाख ४ हजार ५४९ रुपयांचा बनावट तुपाचा साठा जप्त केल्याचा हवाला आमदार प्रकाश सोळंके यांनी दिला होता. अशा भेसळखोरांना जन्मठेप किंवा मृत्यूदंडाची शिक्षा मिळण्याबाबत सरकार नवीन कायदा करणार का, असा प्रश्न त्यांनी विचारला. त्यावर मंत्री झिरवाळ म्हणाले, संबंधित कंपनीविरोधात कलम २७ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. या कायद्यानुसार १ लाख रुपये दंडापासून ते थेट मृत्यूदंडापर्यंतच्या शिक्षेची तरतूद असून ती लागू केली जाईल. भेसळखोरांसाठी सद्यस्थितीत असलेले कायदे पुरेसे कठोर आहेत; परंतु त्यांची नीट अंमलबजावणी होत नसल्यामुळे अडचण होते, अशी कबुलीही त्यांनी दिली. तसेच मुंदडा कंपनीच्या मालकाचा परवाना रद्द करण्यात आला असून त्यांना लवकरच अटक केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या चर्चेत आमदार अर्जुन खोतकर, किशोर आप्पा पाटील, सुधीर मुनगंटीवार, नाना पटोले यांनीही उपप्रश्न उपस्थित केले.दुध आणि तुपाच्या भेसळीची चर्चा सुरू असतानाच आमदार विकास ठाकरे यांनी विधानभवनातील अन्न सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केला. विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू असून येथे सर्व २८८ आमदार उपस्थित आहेत. दुपारी प्रत्येकजण विधानभवनाच्या परिसरातच जेवणासाठी जातो. मात्र, येथील अन्न सुरक्षित आहे का? आमच्या पक्ष कार्यालयात आमदार अमित झनक जेवत असताना त्यांच्या जेवणात चक्क माशी आढळली. त्यामुळे विधानभवन परिसरात येणाऱ्या अन्नाची दर्जा चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी ठाकरे यांनी केली. आमदारांच्या आरोग्याशी संबंधित या विषयाची गंभीर दखल घेत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी, या प्रकरणाची विधिमंडळ स्तरावर चौकशी करून तातडीने उचित उपाययोजना करण्याचे आश्र्वस्त केले.

## राम मंदिरातील २३ कर्मचाऱ्यांचे राजीनामे

लखनौ : अयोध्येतील राम मंदिरातील देगणी चोरी प्रकरण देशभर गाजत आहे. यानंतर मंदिरातील कार्यपद्धती बदलण्यात आली आहे. या सगळ्याचा सर्वाधिक परिणाम देणगीची मोजदाद करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर झाला आहे. एकीकडे त्यांच्या कामाचे तास वाढवण्यात आले आहेत. तर दुसरीकडे त्यांचा पगार कमी करण्यात आला आहे. सोबतच सुट्ट्यांची संख्यादेखील घटवण्यात आली आहे. यानंतर जवळपास २ डझन कर्मचाऱ्यांनी एकाचवेळी राजीनामा दिला आहे. आधी देणग्यांची मोजदाद दोन शिफ्टमध्ये केली जायची. कामाची विभागणी केली जायची. प्रत्येक कर्मचाऱ्याची ड्युटी जवळपास ६ तासांची होती, असं कर्मचारी सांगतात. आधीच्या व्यवस्थेत बरेच बदल करण्यात आले आहेत. सगळं काम एकाच शिफ्टमध्ये केलं जाऊ लागलं आहे. त्यामुळे कामाचे तास ६ वरुन ९ तासांवर गेल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. आधीच्या तुलनेत कर्मचाऱ्यांची संख्या कमी झाली आहे. कामाचा दबाव वाढला आहे. पण सुविधांमध्ये वाढ झालेली नाही, अशी कर्मचाऱ्यांची व्यथा आहे.राम मंदिरातील देणगी चोरीचं प्रकरण देशभरात गाजत असताना नवी घडामोड घडली आहे. मंदिरात काम करणाऱ्या ३६ पैकी २३ कर्मचाऱ्यांनी तडकाफडकी राजीनामे दिले आहेत.

## नाशिकमधील जनआरोग्य योजनेतील गैरव्यवहार प्रकरणी 'एसआयटी'

तभा वृत्तसेवा
मुंबई : नाशिक जिल्ह्यात महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत झालेल्या कथित गैरव्यवहारांच्या चौकशी करण्यात येत आहे. यासाठी नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक (डखढ) स्थापन करण्यात येणार असून त्यात विविध विभागांतील तज्ज्ञांचा समावेश असेल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी केली.एकत्रित आयुष्मान भारत -प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आढावा बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विधीमंडळात झाली, त्यावेळी ते बोलत होते. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, आमदार डॉ. राहुल आहेर, सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, सचिव ई रवींद्रन, पोलीस महासंचालक सदानंद दाते, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण आणि संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या २०२४ ते २०२६ या कालावधीतील तपासणीत सुमारे १६ हजार संशयित दावे व शस्त्रक्रियांची नोंद आढळली आहे. त्यापैकी ९ हजार ५०० प्रकरणे नाशिक जिल्ह्यातील आहेत. या प्रकरणी नाशिकमधील पाच रुग्णालयांची मान्यता रद्द करण्यात आली आहे. संपूर्ण प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक स्थापन करण्यात येणार आहे. पथकाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषींवर कठोर कारवाई केली जाईल. अपहार झालेल्या निधीची वसुली केली जाईल;
तसेच भविष्यातील गैरव्यवहार रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजनाही करण्यात येतील.मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, गरीब आणि गरजू नागरिकांना दर्जेदार व पारदर्शक आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे ही शासनाची सर्वोच्च प्राथमिकता आहे.

## तृणमूलच्या 'त्या' तीन चेहऱ्यांनाच भाजपकडून राज्यसभेची उमेदवारी !





वृत्तसंस्था
नवी दिल्ली : पश्रि्चम बंगाल विधानसभा निवडणुकीनंतर सत्तांतर झालं. राज्यात पहिल्यांदाच भाजपची सत्ता आली. बंगालमधील १५ वर्षांची सत्ता जाताच ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसमध्ये राजकीय भूकंप सुरू झाले. पक्षात उभी फूट पडली. बहुतांश खासदार, आमदार ममता बॅनर्जी यांच्यापासून दूर गेले. राज्यसभेच्या ३ खासदारांनी राजीनामे दिले. आता याच खासदारांनी भाजपमध्ये प्रवेश करत पुन्हा एकदा राज्यसभा 'फिक्स' केली आहे. पश्रि्चम बंगालमधील राज्यसभेच्या तीन जागा रिक्त झाल्या आहेत. त्यासाठी भाजपनं तीन उमेदवार जाहीर केले आहेत. विशेष म्हणजे ज्या तिघांनी राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा दिला आहे, तेच आता पुन्हा राज्यसभेवर जातील. म्हणजे राज्यसभेतील चेहरे तेच राहतील, केवळ त्यांचा पक्ष बदललेला असेल. यामुळे संसदेच्या वरिष्ठ सदनात भाजपची ताकद वाढेल. ममता बॅनर्जींच्या पक्षाची सत्ता जाताच तृणमूलच्या खासदारांनी राज्यसभेची खासदारकी सोडत भाजपमध्ये प्रवेश केला आणि सत्ताधारी पक्षाची सोबत कायम राखली. सोबत राज्यसभेची खासदारकीदेखील पुन्हा मिळवली.भाजपकडे असलेलं संख्याबळ पाहता सत्ताधारी पक्षाला विजयाचा विश्र्वास आहे. तर दुसरीकडे गटबाजी आणि फाटाफुटीमुळे तृणमूल काँग्रेसचं राज्यसभेतील अस्तित्व धोक्यात आलं आहे. तृणमूल काँग्रेसकडून राज्यसभेवर गेलेल्या सुखेंदु शेखर राय, सुष्मिता देव आणि प्रकाश चिक बडाईक यांनी जूनमध्ये खासदारकीचा राजीनामा दिला. विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर या नेत्यांच्या नेतृत्त्वावर प्रश्न उपस्थित झाले होते.सुखेंदु शेखर राय, सुष्मिता देव आणि प्रकाश चिक बडाईक यांनी काल (९ जुलै) भाजप मध्ये प्रवेश केला. पश्रि्चम बंगालचे भाजप प्रदेशाध्यक्ष समिक भट्टाचार्य यांच्या उपस्थितीत त्यांनी भाजपचा झेंडा हाती घेतला. त्यानंतर पुढच्या काही तासांत भाजपनं त्यांना राज्यसभेची उमेदवारी जाहीर केली. सुखेंदु शेखर राय आणि प्रकाश चिक बडाइक यांचा राज्यसभा सदस्यत्वाचा कार्यकाळ सप्टेंबर २०२९ पर्यंत आहे. तर सुष्मिता देव यांचा कार्यकाळ एप्रिल २०३० पर्यंत आहे. रिक्त झालेल्या ३ जागांसाठी २४ जुलैला पोटनिवडणूक होईल. तेव्हा हे नेते पुन्हा उमेदवार असतील. केवळ त्यांचा पक्ष वेगळा असेल.

## खरीप २०२६ पीक विम्यासाठी नवे नियम लागू

तभा वृत्तसेवा
मुंबई : राज्य सरकारने खरीप हंगाम २०२६ साठी पीक विमा योजनेत काही महत्त्वाचे बदल केले आहेत. यंदा पीक विमा भरताना शेतकऱ्यांनी नवीन नियमांची माहिती घेणे आवश्यक आहे. या बदलांचा उद्देश विमा प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणणे, गैरप्रकार रोखणे आणि पात्र शेतकऱ्यांनाच योजनेचा लाभ मिळवून देणे हा आहे.

यंदापासून ई-पीक पाहणी अनिवार्य करण्यात आली आहे. शेतात प्रत्यक्ष कोणते पीक घेतले आहे, याची नोंद ई-पीक पाहणीमध्ये झाल्यानंतरच संबंधित पीक विमा अर्ज ग्राह्य धरला जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी वेळेत ई-पीक पाहणी पूर्ण करणे आवश्यक आहे. याशिवाय, पीक विमा अर्जासाठी आता ग्री स्टॅक ॠीशी खऊ बंधनकारक करण्यात आला आहे. राज्य आणि केंद्र सरकारच्या अनेक योजनांप्रमाणेच पीक विम्यासाठीही ॠीशी खऊ आवश्यक असणार आहे. ज्यांनी अद्याप FARMER ID तयार केलेला नाही, त्यांनी तो लवकर तयार करून घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आ.बच्चू कडू यांच्याकडून मंत्री जयकुमार गोरें विरोधात हक्कभंग

तभा वृत्तसेवा
मुंबई : ग्रामपंचायत संगणक परिचालकांच्या मानधनावरून आणि खासगी कंपन्यांच्या पॅकेजबाबत सभागृहात वारंवार चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचा आरोप करत शिवसेना आमदार बच्चू कडू यांनी शुक्रवारी भाजप नेते तथा ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याविरोधात विधान परिषदेत हक्कभंग प्रस्ताव दाखल केला. या प्रकरणात विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी संबंधित विभागाकडून तातडीने लेखी खुलासा मागवला आहे.आमदार बच्चू कडू आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्यात यंदाच्या विधिमंडळ अधिवेशनात संगणक परिचालकांच्या पगारवाढीच्या मुद्द्यावरून जोरदार जुगलबंदी पाहायला मिळाली. अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित केला असताना, 'संगणक परिचालक दरमहा ५० हजार रुपये कमावतात आणि त्यांना कमिशन म्हणून पगार दिला जातो,' अशी माहिती मंत्री जयकुमार गोरे यांनी सभागृहाला दिली होती. मात्र, कडू यांनी हा दावा त्याच वेळी फेटाळून लावत, हे अत्यंत चुकीचे आणि वस्तुस्थितीला धरून नसल्याचे म्हटले होते. प्रत्यक्षामध्ये संगणक परिचालकांचा पगार संबंधित ग्रामपंचायतींमार्फत केला जातो, असे सांगत कडू यांनी मंत्र्यांवर सभागृहाची दिशाभूल केल्याचा ठपका ठेवला आहे. आमदार बच्चू कडू आणि मंत्री जयकुमार गोरे यांच्यातील राजकीय संघर्ष विधानसभा निवडणुकीपासून उफाळून आल्याचे दिसत आहे. विधानसभा निवडणुकीत कडू यांनी गोरे यांच्या माण-खटाव मतदारसंघातून आपला उमेदवार देण्याची घोषणा केली होती.

## शेअर मार्केटमध्ये तेजी

नवी दिल्ली : देशांतर्गत शेअर मार्केटमध्ये सलग दुसऱ्या दिवशी तेजीचा कल पाहायला मिळत आहे. मुंबई शेअर बाजाराने ८०० पेक्षा जास्त अंकांची उसळी घेतली तर, निफ्टी ५० निर्देशांक २५० अंकांनी वाढून २४,२०० वर व्यवहार करत असून आयटी, फायनान्शिअल, मेटल आणि फार्मा क्षेत्रांमध्ये चांगली खरेदी झाली.

## इथेनॉलमिश्रित पेट्रोल प्रमाणित, सुरक्षित!




वृत्तसंस्था
नवी दिल्ली : इथेनॉलमिश्रित इंधनावरील (ई-२०) टीका फेटाळताना, 'ई-२० पेट्रोल पूर्णपणे वैज्ञानिकदृष्ट्या तपासलेले, सुरक्षित आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रमाणित इंधन आहे', असा युक्तिवाद पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायूमंत्री हरदीपसिंग पुरी यांनी गुरुवारी केला. ई-२०मुळे वाहनांच्या इंजिनांत बिघाड होत असल्याच्या वाढत्या तक्रारींच्या पार्श्र्वभूमीवर त्यांनी हे स्पष्टीकरण दिले. इथेनॉलमिश्रण कार्यक्रम मागील काँग्रेस सरकारच्या काळात सुरू झाला होता. त्यामुळे, आता त्याच्या जलद विस्ताराला होणारा विरोध राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे दिसते, असा संशय मंत्री पुरी यांनी 'एक्स' या समाज माध्यमावरील पोस्टमध्ये व्यक्त केला.'भारतात एप्रिल २०२३पासून ई-१५, एप्रिल २०२४पासून ई-१९ आणि एप्रिल २०२५पासून ई-२० इंधनाचा वापर केला जात आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर वापर होऊनही कोणतीही मोठी समस्या समोर आलेली नाही. देशातील २० कोटींहून अधिक दुचाकी आणि २० लाखांहून अधिक चारचाकी वाहने ई-२० इंधनावर यशस्वीपणे धावत आहेत. मात्र, आत्ताच इथेनॉल मिश्रणाविरोधातील मोहीम अचानक तीव्र झाली आहे. पाच जून रोजी फ्लेक्स-फ्यूएल वाहनांसाठी ई-८५ इंधन सुरू झाल्यानंतर अशी टीका वाढू लागली, असा दावा पुरी यांनी केला. दरम्यान, देशाला आयात कराव्या लागणाऱ्या कच्च्या तेलावरील भारताचे अवलंबित्व कमी करण्याच्या दिशेने इथेनॉलसक्ती हे एक मोठे पाऊल असल्याचेही केंद्रीय मंत्री पुरी यांनी म्हटले आहे. 'इथेनॉलमिश्रित पेट्रोलमुळे 'अन्नदाता' शेतकऱ्यांना 'ऊर्जादाता' बनवले आहे. कारण त्यांना उत्पन्नाचा एक अतिरिक्त स्रोत उपलब्ध झाला आहे. हा कार्यक्रम (इथेनॉलसक्ती) भू-राजकीय तणाव आणि जागतिक पातळीवर कच्च्या तेलाच्या किमतीतील सातत्याने होणारी चढउतार यांमुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांना तोंड देण्यासाठीही देशाला अधिक सक्षम बनवणारा आहे, असे पुरी म्हणाले.

## जे. जे. रुग्णालयात वाढणार ICU बेड्स

तभा वृत्तसेवा
मुंबई : राज्यातील सर्वात मोठ्या आणि महत्त्वाच्या शासकीय रुग्णालयांपैकी एक असलेल्या जे. जे. रुग्णालयातील आरोग्यसेवेला अधिक बळकटी देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. रुग्णालय प्रशासनातील ICU बेड्सची कमतरता दूर करण्यासाठी, आता रुग्णालयातील सध्याच्या 'रक्तपेढीची' जागा खउण विभागासाठी वापरली जाणार आहे.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा सकारात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

जे. जे. रुग्णालयात गंभीर रुग्णांसाठी आवश्यक असणाऱ्या अतिदक्षता विभागात बेड्सची संख्या अपुरी पडत होती, ज्यामुळे अनेक रुग्णांना वेळेवर उपचार मिळण्यास अडचणी येत होत्या. यावर उपाय म्हणून रुग्णालयातील कार्यरत रक्तपेढीची जागा खउण विभागाच्या विस्तारासाठी वापरण्याचा प्रस्ताव बैठकीत मांडण्यात आला. या निर्णयामुळे खउण बेड्सची संख्या वाढणे शक्य होणार आहे.विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना या विस्तारासाठी लागणारी सर्व प्रशासकीय कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे अतिदक्षता विभागाची क्षमता वाढणार असून, भविष्यात गंभीर रुग्णांना तात्काळ उपचार उपलब्ध करून देणे सोपे होईल. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना वेळेवर बेड न मिळाल्याने होणारी गैरसोय थांबण्यास आणि रुग्णसेवेची गुणवत्ता उंचावण्यास या निर्णयामुळे मोठी मदत होणार आहे, असे बैठकीत नमूद करण्यात आले.

# देशात करोना रिटर्न्स ! ४६ वर्षीय व्यक्तीचा तडफडून शेवट; दोन्ही फुफ्फुसं पूर्णपणे निकामी





तभा वृत्तसेवा
अमरावती : भारतात पुन्हा एकदा करोना संकट परतलं आहे. आंध्र प्रदेशच्या कडप्पामध्ये करोना विषाणूमुळे ४६ वर्षीय व्यक्तीचा जीव गेला आहे. जिल्हा वैद्यकीय आणि आरोग्य अधिकारी रवी बाबू यांनी याबद्दलची माहिती दिली. वेळेवर औषधं देऊनही रुग्णाची प्रकृती सुधारली नाही. चार दिवस उपचार घेतल्यावर त्याचा मृत्यू झाल्याचं रवी बाबू यांनी सांगितलं. दगावलेला व्यक्ती दारुच्या आहारी गेलेला होता. त्याला दीर्घ श्र्वास घेण्यात अडचणी येत होत्या. सोबतच त्याचा खोकल्याचाही त्रास सुरू होता. याचमुळे तो रुग्णात दाखल झाला होता.कडप्पातील मासापेटा परिसरात राहणारा व्यक्ती करोना संसर्गानं त्रस्त होता. त्याला मद्यपानाची सवय होती. तो व्यसनाच्या आहारी गेला होता. त्याला श्र्वास घेताना बराच त्रास व्हायचा. त्याला खोकलादेखील झाला होता. रुग्णालयात त्याचा एक्स-रे काढण्यात आला. त्याची दोन्ही फुफ्फुसं पूर्णपणे निष्क्रिय झाल्याचं त्यातून समोर आलं. यामुळे त्याला निमोनियादेखील झाला होता, अशी माहिती रवी बाबू यांनी पीटीआय वृत्तसंस्थेला दिली. डॉक्टरांनी सुरुवातीला रुग्णाला अँटिबायोटिक औषधं दिली. पण चार दिवस उपचार करुनही त्याची प्रकृती सुधारली नाही. त्याची तब्येत दिवसागणिक बिघडत गेली. त्यामुळे डॉक्टरांना करोना संसर्ग ाची शंका आली. यानंतर रुग्णालयाच्या छातीचं सिटी स्कॅन करण्यात आलं. त्यातून करोना संसर्ग झाल्याचं उघड झालं. रुग्णाच्या मृत्यूनंतर परिसरात योग्य खबरदारी घेण्यात आल्याची माहिती रवी बाबू यांनी सांगितलं. रुग्णाचा मृत्यू झाला, तिथली स्वच्छता करण्यात आली. सॅनिटायझेशन पूर्ण करण्यात आलं. मृत पावलेल्या रुग्णाच्या संपर्कात आलेल्या लोकांची ओळख पटवण्यात आली. त्याच्या दैनंदिन संपर्कात येणाऱ्या आणि अन्य व्यक्तींची ओळख पटवली गेली आहे. संसर्ग पसरु नये यासाठी काळजी घेतली जात असल्याची माहिती बाबू यांनी दिली. कडप्पा आणि तिरुपती जिल्ह्यांमध्ये करोनाचे ५ रुग्ण सापडले आहेत. मेडिकल एज्युकेशन डायरेक्टरकडून सरकारी रुग्णालयांमध्ये आयसोलेशन बेड, आयसीयू बेड, ऑक्सिजन, व्हेंटिलेटर, औषधं, रॅपिड टेस्ट किट, रुग्णवाहिका आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांचा संपूर्ण तपशील मागण्यात आला आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# माजी आमदारांचे आरोप हास्यास्पद; ठेवीदारांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले - आ. अर्जुनराव खोतकर

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनीधी



जालना मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेतील गैरव्यवहारामुळे अडचणीत आलेल्या शेकडो सभासद, ठेवीदार आणि गुंतवणूकदारांना त्यांच्या हक्काची रक्कम मिळावी, यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा केला. राज्याच्या चालू अधिवेशनात हा प्रश्न सभागृहात प्रभावीपणे मांडून शासनाचे लक्ष वेधले. त्यानंतर शासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत आवश्यक कार्यवाही सुरू केली. रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार ठेवीदारांना त्यांची रक्कम मिळण्यासाठी प्रक्रिया गतीने पूर्ण करण्याचे आश्वासन शासनाने दिले आणि त्यानुसार पुढील कार्यवाहीही करण्यात आली, असा खुलासा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी केला.

आमदार खोतकर म्हणाले की, शासनाने आवश्यक सूचना केल्यानंतर रिझर्व्ह बँकेमार्फत जालना मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेचा सुमारे ९३ कोटी ३६ लाख रुपयांचा विमा प्रस्ताव मंजूर झाला. त्यामुळे ठेवीदारांना त्यांच्या हक्काची रक्कम मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. हा निर्णय हजारो ठेवीदारांसाठी दिलासादायक असून, त्यासाठी आपण सातत्याने केलेल्या पाठपुराव्याचे हे फलित आहे.

याच पार्श्वभूमीवर माजी आमदारांनी केलेले आरोप पूर्णपणे बिनबुडाचे, दिशाभूल करणारे आणि हास्यास्पद आहेत. श्रेयवादाचे राजकारण करणे हा आमचा स्वभाव नाही. सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविणे हेच आमचे कर्तव्य असून, त्यातूनच आम्हाला समाधान मिळते. त्यामुळे अशा निराधार आरोपांना कोणतेही महत्त्व नाही.

बँकेतील गैरव्यवहार उघडकीस आल्यानंतरच्या सुरुवातीच्या काळापासूनच आपण ठेवीदार, सभासद आणि खातेदारांच्या बाजूने ठामपणे उभे राहिलो. त्यांच्या हक्काचे पैसे परत मिळावेत, यासाठी शासन, संबंधित विभाग आणि विविध पातळ्यांवर सातत्याने पाठपुरावा केला. ही बाब जालना जिल्ह्यातील जनतेला चांगलीच माहीत आहे.

जनतेच्या हिताचे काम होत असल्यामुळे काहींना राजकीय पोटदुखी होत असेल, तर त्यासाठी आम्ही जबाबदार नाही. जनतेची कामे होऊ नयेत, विकासाच्या प्रश्नांवर अडथळे निर्माण व्हावेत आणि त्यातून राजकारण करता यावे, हा काहींचा उद्देश असल्याचे दिसून येते. मात्र अशा प्रकारच्या आरोपांमुळे सत्य बदलत नाही.

जालना मर्चंट बँकेतील ठेवीदारांना न्याय मिळवून देण्यासाठी यापुढेही आपण कटिबद्ध राहणार असून, प्रत्येक सभासद आणि ठेवीदाराला त्याच्या हक्काची रक्कम मिळेपर्यंत आपला पाठपुरावा सुरूच राहील, अशी ग्वाही आमदार अर्जुनराव खोतकर यांनी दिली. तसेच, खरे तर बँकेत ज्यांच्या रक्कमा अडकल्या आहेत त्यांच्यामध्ये आता एकप्रकारे चांगली भावना निर्माण झाली आहे. जनतेला वस्तुस्थिती पूर्णपणे माहिती असून, केवळ प्रसिद्धीसाठी आणि दिशाभूल करण्याच्या उद्देशाने करण्यात येणाऱ्या अशा बिनबुडाच्या आरोपांना जनता कोणतीही किंमत देणार नाही, असा विश्वासही आमदार खोतकर यांनी व्यक्त केला.

# जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत विकासकामांच्या प्रगती आढावा बैठक संपन्न

तभा वृत्तसेवा
जालना प्रतिनीधी

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सन २०२६-२७ मधील विविध विकासकामांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन समितीच्या सदस्य सचिव आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षेत आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे आढावा बैठक पार पडली. यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारीया, मनपा आयुक्त अंजली शर्मा जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.



बैठकीत जिल्हाधिकारी मित्तल यांनी राज्याचे पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन तथा पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या निर्देशानुसार सर्व विभागांनी नियोजनबद्ध पद्धतीने कामकाज करण्याच्या सूचना दिल्या. सन २०२५-२६ आणि त्यापूर्वीच्या वर्षांतील विभागनिहाय मंजूर निधी, त्यातील खर्च, तसेच सन २०२३-२४ व त्यानंतरच्या वर्षांतील खर्च न झालेल्या निधीबाबत कारणांसह सविस्तर माहिती सादर करण्याचे निर्देश दिले.

यावेळी सन २०२५-२६ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळालेल्या मात्र प्रत्यक्षात काम सुरू न झालेल्या सर्व योजनांचा विभागनिहाय आढावा घेण्यात आला. अशा कामांची सद्यस्थिती, काम सुरू होण्यास झालेला विलंब आणि ती कामे विहित कालावधीत पूर्ण करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत संबंधित विभागांकडून माहिती घेण्यात आली. तसेच जिल्हा नियोजन समितीच्या मागील बैठकीत पालकमंत्री यांनी दिलेल्या सूचनांनुसार कोणकोणती कार्यवाही करण्यात आली आहे, याचा आढावा ही बैठकीत सादर घेण्यात आला. प्रत्येक विभागाने शासनाच्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी करून प्रलंबित बाबी तातडीने निकाली काढाव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी मित्तल यांनी यावेळी दिले.

सन २०२६-२७ च्या जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत जिल्हा विकास आराखडा, गतिमान प्रशासन, व्यक्तिमत्त्व विकास, जिल्हा विकास आराखडा (महसूल व भांडवली) तसेच शाश्वत विकास ध्येय (SDG) अंतर्गत प्रस्तावित योजनांवरही सविस्तर चर्चा झाली. या योजनांचे प्रस्ताव वेळेत सादर करून विकासकामांना गती देण्याचे आवाहन करण्यात आले.

याशिवाय जिल्हा वार्षिक योजना (अनुसूचित जाती उपयोजना) अंतर्गत सन २०२६-२७ मध्ये हाती घेण्यात येणाऱ्या विकासकामांचे प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच सन २०२५-२६ मध्ये झालेल्या निधी खर्चाचा आढावा घेऊन खर्चाची गती वाढविण्यावर भर देण्यात आला. बैठकीच्या शेवटी जिल्हाधिकारी मित्तल यांनी सर्व विभाग प्रमुखांनी समन्वयाने काम करत शासनाच्या प्राधान्यक्रमानुसार विकासकामे वेळेत पूर्ण करावीत. तसेच उपलब्ध निधीचा शंभर टक्के विनियोग सुनिश्चित करावा आणि प्रलंबित प्रस्ताव व अहवाल विहित मुदतीत सादर करावेत, असे निर्देश दिले.

यावेळी बैठकीत विविध विभागांच्या योजनांची अंमलबजावणी, निधी खर्च, प्रलंबित कामे तसेच आगामी वर्षातील विकास आराखड्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस जिल्हा प्रशासनातील विविध विभागांचे प्रमुख अधिकारी, नियोजन विभागाचे अधिकारी तसेच संबंधित विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## संक्षिप्त

### जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या बैठकीत अंगणवाडी सेवांच्या गुणवत्तावाढीवर भर; कुपोषण निर्मूलन, एचपीव्ही लसीकरण व डिजिटल कामकाजाबाबत महत्त्वाच्या सूचना

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनीधी

जालना जिल्ह्यात एकात्मिक बाल विकास सेवा (ICDS) योजनेअंतर्गत कार्यरत ग्रामीण बाल विकास प्रकल्प अधिकारी व पर्यवेक्षिकांची आढावा बैठक आज जिल्हाधिकारी आशिमा मित्तल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारिया यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. या बैठकीत अंगणवाडी सेवांची गुणवत्ता वाढविणे, बालकांच्या पोषण स्थितीत सुधारणा करणे, डिजिटल कामकाजाला गती देणे, तसेच शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत महत्त्वपूर्ण निर्देश देण्यात आले. बैठकीत प्रत्येक अंगणवाडी केंद्राला ग्रामपंचायतीच्या सहकार्याने विद्युत जोडणी उपलब्ध करून देण्याच्या सूचनांसह 'सॅम' (तीव्र कुपोषित) आणि 'मॅम' (मध्यम कुपोषित) बालकांच्या पोषण स्थितीत सुधारणा करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यावर भर देण्यात आला. कुपोषित बालकांच्या आहार व्यवस्थापनाबाबत पालकांना नियमित मार्गदर्शन करण्याचे निर्देशही देण्यात आले.

बाल विकास प्रकल्प अधिकारी आणि पर्यवेक्षिकांनी अंगणवाडी भेटीदरम्यान बालकांच्या मातांना पोषण, आरोग्य व संगोपनासंदर्भात मार्गदर्शन करावे. तसेच सॅम बालकांची अद्ययावत प्रोफाईल तयार करून संबंधित पालकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी अंगणवाडी केंद्रांच्या इमारतींचे बांधकाम, शौचालय सुविधा, तसेच केंद्रस्तरावरील ११ प्रकारचे नोंदवही (रजिस्टर) बंद करून सर्व कामकाज 'पोषण ट्रॅकर' या ऑनलाइन ॲपवर करण्याबाबत आढावा घेण्यात आला. याशिवाय प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेअंतर्गत लाभार्थी नोंदणीची प्रगतीही तपासण्यात आली.

जिल्हाधिकारी मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या 'जालना न्यूट्रिशन मिशन' उपक्रमांतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या पर्यवेक्षिकांनी तालुक्यातील उर्वरित पर्यवेक्षिका व सेविकांना प्रशिक्षण देण्याच्या सूचना बैठकीत करण्यात आल्या.

शून्य ते सहा वर्षे वयोगटातील बालके कुपोषणाच्या श्रेणीत जाऊ नयेत यासाठी पालकांना घरभेटीद्वारे योग्य आहार, पूरक पोषण आणि बाल संगोपनाबाबत मार्गदर्शन करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच अंगणवाडी केंद्रांवर पालक बैठका आयोजित करून विविध पाककृतींचे प्रात्यक्षिक दाखविण्याची सूचना करण्यात आली.

बैठकीत १४ ते १५ वर्षे वयोगटातील किशोरवयीन मुलींना मोफत उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या एचपीव्ही (HPV) लसीबाबत व्यापक जनजागृती करण्यावरही भर देण्यात आला. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ . कनवारीया यांनी सर्व पर्यवेक्षिकांना गावपातळीवर एचपीव्ही लसीकरणाबाबत जनजागृती मोहीम प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश दिले. बैठकीच्या शेवटी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी बाल विकास प्रकल्प अधिकारी आणि पर्यवेक्षिकांना शासनाच्या सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून बालकांचे पोषण, आरोग्य आणि विकास याला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आवाहन केले.

### मापेगाव व देवला-सातोना खुर्द बस थांब्यांवरुन विजय चव्हाण आक्रमक; प्रशासनाला आंदोलनाचा अंतिम इशारा!

तभा वृत्तसेवा
परतूर । प्रतिनिधी

परतूर-सेलू राज्य मार्गाचे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत नुकतेच उत्कृष्ट दर्जाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. मात्र, या मार्गावरील बागेश्वरी सहकारी साखर कारखान्याजवळील मापेगाव तसेच देवला-सातोना खुर्द चौफुली या महत्त्वाच्या ठिकाणी आजपर्यंत बस थांबे उभारण्यात आलेले नाहीत. त्यामुळे दररोज प्रवास करणारे विद्यार्थी, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक, कामगार आणि सर्वसामान्य प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत असून रस्त्याच्या कडेला उभे राहून बसची वाट पाहावी लागत आहे. यामुळे अपघाताचा धोकाही दिवसेंदिवस वाढत आहे.

या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा, परतूर तालुका उपाध्यक्ष विजय रमेशराव चव्हाण यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपविभागीय अभियंत्यांना निवेदन सादर करून मापेगाव आणि देवला-सातोना खुर्द चौफुली येथे तातडीने बस थांबे उभारण्याची जोरदार मागणी केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, या दोन्ही ठिकाणी दररोज शेकडो नागरिक प्रवास करतात. बस थांब्यांचा अभाव असल्यामुळे विशेषतः महिला, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना उन्हात, पावसात व रस्त्याच्या कडेला उभे राहून बसची प्रतीक्षा करावी लागते. तसेच भरधाव वाहनांमुळे अपघाताचा गंभीर धोका निर्माण झाला असून, प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे.

विजय चव्हाण यांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा देत सांगितले की, नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न कोणत्याही परिस्थितीत दुर्लक्षित केला जाणार नाही. मापेगाव व देवला-सातोना खुर्द चौफुली येथे तात्काळ बस थांबे उभारण्याबाबत सकारात्मक निर्णय न झाल्यास भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल. या आंदोलनास संपूर्ण परिसरातील नागरिकांचा मोठा पाठिंबा मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या निवेदनाच्या प्रती मा. आमदार बबनराव लोणीकर, भाजपा प्रदेश सचिव राहुल भैया लोणीकर तसेच तहसीलदार, परतूर यांनाही देण्यात आल्या आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासनाने तातडीने सकारात्मक कार्यवाही करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडूनही होत आहे.

# मौजे बाबई येथील सिंचन विहीर प्रकरणात चौकशी करूण दोषींवर कारवाई करावी अन्यथा उपोषण - मनसे नेते सोळंके



तभा वृत्तसेवा
परतुर/प्रतिनीधी

मयत राजामती बापूराव खोसे यांना अद्याप लाभ मिळाला नाही; उर्वरित अनुदानासाठी १४ ऑगस्टपासून आमरण उपोषणाचा इशारा. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत सिंगोना (ता. परतूर) गावातील एकूण १० लाभार्थी शेतकऱ्यांना सिंचन विहिरी मंजूर करण्यात आल्या होत्या. या योजनेअंतर्गत प्रत्येक लाभार्थी शेतकऱ्यास सुमारे रुपये १ लाख ८० हजार इतका लाभ मंजूर करण्यात आला होता. मात्र यापैकी काही लाभार्थी शेतकऱ्यांना मंजूर झालेली संपूर्ण रक्कम प्राप्त झाली असताना उर्वरित आठ लाभार्थी शेतकरी आजही शासनाच्या अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत.

काही लाभार्थी शेतकऱ्यांना रुपये ९० हजार, तर काहींना रुपये ८० हजार इतकी रक्कम अद्याप प्राप्त झालेली नाही. त्यामुळे संबंधित लाभार्थी शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. लाभापासून वंचित राहिलेल्या लाभार्थी शेतकऱ्यांमध्ये सिंधुबाई परमेश्वर ढेरे, सरस्वती रामराव मांगदरे, लक्ष्मण पुंडलिक गरड, रामभाऊ सूर्यभान सोळंके, सोपान उत्तमराव सोळंके, मयत राजामती बापूराव खोसे, द्वारकाबाई सुभाष काटकर आणि गणेश आश्रुबा जाधव यांचा समावेश आहे. सदर लाभार्थी शेतकऱ्यांनी सिंचन विहिरीचे खोदकाम व बांधकाम पूर्ण करण्यासाठी स्वतःकडून खर्च करून तसेच कर्ज काढून कामे पूर्ण केली होती. विहिरीची कामे पूर्ण होऊन अंतिम नोंदी झाल्यानंतरही अनेक महिन्यांपासून उर्वरित अनुदानाची रक्कम प्रलंबित असल्यामुळे संबंधित शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. दरम्यान, लाभार्थी महिला शेतकरी मयत राजामती बापूराव खोसे यांना मंजूर झालेल्या विहिरीच्या उर्वरित अनुदानाचा लाभ त्यांच्या हयातीत मिळाला नाही. विहिरीचे खोदकाम व बांधकाम पूर्ण करण्यासाठी त्यांनी कर्ज काढून काम पूर्ण केले होते. मात्र उर्वरित अनुदानाची रक्कम न मिळाल्यामुळे त्यांच्यावर कर्जाचा मोठा बोजा निर्माण झाला होता. दुर्दैवाने त्यांचे निधन झाले, मात्र त्यांच्या निधनानंतरही त्यांना मिळणे अपेक्षित असलेला उर्वरित लाभ अद्याप प्राप्त झालेला नसल्याची बाब समोर आली आहे.

उर्वरित अनुदानाची रक्कम तात्काळ अदा करावी, निधी वितरणातील अनियमिततेची चौकशी करावी तसेच दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी लाभार्थी शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे केली आहे. तसेच, योग्य वेळेत कारवाई न झाल्यास दिनांक १४ ऑगस्ट २०२६ रोजी पंचायत समिती, परतूर कार्यालयासमोर आमरण उपोषण आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही संबंधित लाभार्थी शेतकऱ्यांनी आपल्या निवेदनाद्वारे प्रशासनाला दिला आहे.

# फटाके सदृश्य आवाज करणाऱ्या बुलेट जप्त केल्या; ही कार्यवाही यापुढेही अशी चालू राहील - पोनि पुरुषोत्तम देशमुख

तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनीधी

शहरात फटाक्यासारखा आवाज काढणारे सायलेन्सर लावलेल्या बुलेट सुसाट वेगाने चालवीत असल्याचे निदर्शनास आले त्यानुसार दोन दिवसांपूर्वी काही बुलेट चालकांच्या गाड्या जप्त केल्या त्यांचे सायलेन्सर बदलून साधे सायलेन्सर लावून घेतले अद्यापही फटाके सदृश्य आवाजाच्या बुलेट गावात असल्याचे समजले त्यानुसार साध्या वेशात पोलीस व खबरी नियुक्त केले असून याबाबत गोपनीय माहिती पोलीस स्टेशनला देतील आणि त्या चालकांवर बुलेट जप्त करून कायदेशीर कार्यवाही केली जाईल शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी तसेच वृद्ध आजारी माणसांचा त्रास टाळण्यासाठी आणि संभाव्य अपघात टाळण्यासाठी ही कार्यवाही करणे गरजेचे आहे त्याचप्रमाणे दुचाकी वर दोन पेक्षा अधिक व्यक्ती आढळल्यास अल्पवयीन मुले मोटरसायकल चालवत असल्याचे आढळल्यास या सर्वावर कायदेशीर कार्यवाही केली जाईल त्यांच्या गाड्या जप्त केल्या जातील पालकांनी याबाबत जागरूक होऊन अल्पवयीन मुलांना दुचाकी चालवण्यास देऊ नये नसता पालक सुद्धा कार्यवाहीस पात्र ठरतील या सर्वांची नोंद घेऊन नागरिकांनी सहकार्य करावे तसेच कोणासही फटाके सदृश्य गाडी आढळल्यास त्याचप्रमाणे नंबर प्लेट वर नंबर नसल्यास पोलीस स्टेशनला कळवावे माहिती देणाऱ्याची नावे गुप्त ठेवली जातील कायदा भंग करणारा वर कठोर कार्यवाही केली जाईल याबाबत कोणाच्याही दबावाला बळी न पडता कार्यवाही होईल याची सर्वांनी नोंद घ्यावी दुचाकी वर दोन पेक्षा अधिक व्यक्ती बसून जात असतील तर तेही कायदेशीर कार्यवाही पात्र ठरतील शहरात वृद्ध माणसे आजारी माणसे तसेच लहान मुले असल्याने अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याचप्रमाणे गॅरेज चालक ऑटो पार्ट यांनी क्रमशः फटाके सदृश्यसायलेन्सर बदलणे किंवा विक्रेता यांनी सायलेन्सर विकणे बंद करावे या सर्व बाबतीत शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे असे आवाहन पो नि पुरुषोत्तम देशमुख यांनी सांगितले

# भोकरदन-जाफ्राबादमधील अवैध वृक्षतोडीवर आमदार संतोष दानवे यांचा विधानसभेत घणाघात; दोषींवर कारवाईचे मंत्र्यांचे आश्वासन

## अतिशय चलाखीने सुरु असलेल्या लाकूड तस्करीचा आणि अधिकारी-व्यापाऱ्यांच्या संगनमताचा सभागृहात पर्दाफाश



तभा वृत्तसवो
भोकरदन प्रतिनिधी

एका बाजूला राज्य सरकार ३०० कोटी वृक्ष लागवडीचे जंगी उद्दिष्ट जाहीर करत असताना, दुसऱ्या बाजूला वृक्षतोडीच्या अटी ११ वरून थेट ५ वर आणून लाकूडतस्करांचे रस्ते मोकळे केले जात आहेत, हा सरकारचा मोठा विरोधाभास आहे. या नियमांच्या शिथिलतेचा गैरफायदा घेऊन जालना जिल्हा आणि भोकरदन-जाफ्राबाद मतदारसंघातील वनसंपदा नष्ट केली जात असल्याचा घणाघाती आरोप महाराष्ट्र पंचायती राज समितीचे अध्यक्ष तथा आमदार संतोष पाटील दानवे यांनी विधानसभेत केला. मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनादरम्यान मतदारसंघातील अवैध वृक्षतोडीच्या गंभीर मुद्द्यावर त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

**तस्करांची नवी 'मोडस ऑपेरंडी' उघड**

या संदर्भात बोलताना आमदार संतोष दानवे यांनी वन अधिकारी आणि लाकूड व्यापाऱ्यांमधील संगनमताचा थेट पर्दाफाश केला. गेल्या एप्रिल-मे महिन्यात आपण स्वतः वन अधिकाऱ्यांना लाकडाने भरलेले २० ते २५ अवैध ट्रॅक्टर्स पकडून दिल्याची माहिती त्यांनी सभागृहाला दिली. हे लाकूडतस्कर कारवाई टाळण्यासाठी गाड्यांच्या बाहेरच्या बाजूला सुबाभूळ किंवा निलगिरीसारखी परवानगी असलेली कायदेशीर लाकडं लावतात आणि आतल्या बाजूला वनक्षेत्रातील मौल्यवान झाडांची छुप्या पद्धतीने तस्करी करतात, अशी तस्करांची नवी कार्यपद्धतीच (मोडस ऑपेरंडी) त्यांनी समोर आणली.

**विदर्भाच्या हद्दीत जंगल, मराठवाड्यात शिरताच गायब!**

आमच्या मतदारसंघाला लागूनच असलेल्या विदर्भाच्या हद्दीत दाट जंगल दिसते, पण मराठवाड्याच्या हद्दीत पाय ठेवताच जंगल गायब होते; हा वन अधिकारी आणि लाकूड व्यापाऱ्यांमधील संगनमताचा थेट पुरावा आहे, अशा अत्यंत कडक शब्दांत आमदार दानवे यांनी प्रशासकीय ढिसाळपणावर बोट ठेवले. आज अत्याधुनिक इलेक्ट्रिक कटरमुळे अवघ्या ५ मिनिटांत भलीमोठी झाडे जमीनदोस्त केली जात असून वनसंपदा धोक्यात आल्याची भीती त्यांनी व्यक्त केली.

**दोषींवर तातडीने कारवाई होणार : वनमंत्री**

या अवैध वृक्षतोडीच्या गंभीर मुद्द्यावर आमदार दानवे यांनी सभागृहात माननीय वनमंत्र्यांना थेट प्रश्न विचारून, यास जबाबदार असलेल्या दोषी अधिकारी व लाकूड व्यापाऱ्यांवर कडक कारवाई करणार का? अशी विचारणा केली. त्यांच्या या प्रश्नाला तातडीने सकारात्मक प्रतिसाद देत, संबंधित दोषी अधिकारी व लाकूड व्यापाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर तातडीने कडक कार्यवाही करण्याचे ठोस आश्वासन माननीय वनमंत्र्यांनी सभागृहात दिले. आमदार संतोष दानवे यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे मतदारसंघातील लाकूडतस्करांचे धाबे दणाणले आहेत.

# गॅस गोडाऊन फोडुन सिलेंडर चोरी करणारी आंतरजिल्हा टोळी जेरबंद जालना व परभणी येथील सिलेंडर चोरीचे गुन्हे उघड करुन रु.१,६६,९२०/- किंमतीच्या ६० गॅस सिलेंडर जप्त स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनीधी**

दिनांक २९/०६/२०२६ रोजी कुंभारपिंपळगांव, ता. घनसावंगी जि. जालना येथे एच.पी. गॅस गोडाऊन फोडुन ६० एच.पी. गॅसचे सिलेंडर अज्ञात इसमांनी चोरी केलेबाबत फिर्यादी नामे गोपाल राधेश्याम लोया, वय-३९ वर्ष, व्यवसाय-व्यापार रा. कुंभार पिंपळगांव, ता. घनसावंगी, जि. जालना यांनी घनसावंगी पोलीस ठाणे गु.र.क्र. ३६०/२०२६ कलम ३०३ (२), ३२४ (२) भा.न्यां.सं. अन्वये गुन्हा दाखल केला होता. सदर गुन्हा उघड करुन गुन्हयातील आरोपी जेरबंद करणेबाबत पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव व पथकास सुचना दिल्या होत्या.

त्यानुषंगाने अज्ञात आरोपीतांचा शोध घेत असतांना मिळालेल्या माहितीचे तांत्रिक विश्लेषण करुन व गुप्तबातमीदाराच्या मदतीने माहिती घेत असतांना सदरचा गुन्हा हा आरोपी नामे राजेश लाला पवार, वय-३४ वर्ष, रा. इंदिरानगर, पाथरी ता. पाथरी जि. परभणी, गणेश प्रभु काळे, वय-२६ वर्ष, रा. इंदिरानगर, पाथरी ता. पाथरी जि. परभणी यांनी त्यांच्या साथीदारासह केला असल्याचे दिसुन आल्याने दोन्हीही आरोपीतांना पाथरी, जि. परभणी येथुन ताब्यात घेतले असुन त्यांच्या ताब्यातुन खालीलप्रमाणे मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच आरोपीतांनी दिनांक २९/०३/२०२६ रोजी खवणे पिंप्री, ता. पाथरी जि. परभणी येथील इंडेन गॅस गोडाऊन सुध्दा फोडुन सिलेंडर चोरी केली असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे आरोपीतांना घनसावंगी पोलीस ठाणे यांच्या ताब्यात पुढील कारवाईकामी दिले आहे.

गुन्हे उघड

१. घनसावंगी पोलीस ठाणे, घनसावंगी, जालना गु.र.नं.३६०/२०२६ कलम ३०३(२),३२४(२) भा.न्यां.सं

२. पाथरी पोलीस ठाणे, पाथरी जि. परभणी गु.र.नं. १५६/२०२६ कलम ३३१(३), ३३१(४), ३०५ (अ) भा.न्यां.सं

जप्त मुददेमाल

१. रु.१,६६,९२०/- किंमतीचे ३६ भरलेले व २४ रिकामे घरगुती एच.पी. गॅस सिलेंडर जु.वा.किं.अ.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग अंबड सिध्देश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि. सचिन खामगळ, पोउपनि. राजेंद्र वाघ यांच्यासह पोलीस अंमलदार सॅम्युअल कांबळे, लक्ष्मीकांत



आडेप, सुधीर वाघमारे, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, शिवप्रसाद एखंडे, सतिष श्रीवास, कैलास चेके, सर्व स्था.गु.शा यांनी केली आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# जिल्हा मध्यवर्ती बँक संचालकांच्या २१ पैकी १३ जागा बिनविरोध : ८ जागांकरीता निवडणूक

## मातब्बरांसह त्यांचे कुटूंबिय बिनविरोध, अनेकांना लागले पराभवाचे धक्के

**परभणी ,/प्रतिनिधी:-** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकांच्या २१ पैकी १३ जागांच्या निवडणूका बिनविरोध झाल्या आहेत. त्यामुळे उर्वरित आठ संचालकांच्या जागांकरीताच आता निवडणूका अटळ ठरल्या आहेत.

जिल्हा बँकेंतर्गत संचालकपदाच्या निवडणूकीतील उमेदवारी अर्ज माघारीच्या आज गुरुवारी अंतीम दिवशी दुपारी ३ वाजेपर्यंतच्या अंतीम मुदतीत पडद्याआड मोठ्या प्रमाणावर एका पाठोपाठ एक घडलेल्या घडामोडीतून एकूण संचालकांच्या २१ जागांपैकी सुमारे १३ जागांच्या निवडणूका या बिनविरोध झाल्या आहेत. त्यातून ज्येष्ठ मातब्बर नेतेमंडळींसह आजी-माजी आमदार व त्यांचे वारसदार हे बिनविरोध निवडून आले आहेत. परंतु, त्यांचे समर्थक हे निवडणूकीच्या आखाड्यात कायम राहीले आहेत.

**सोसायटी मतदारसंघातील १४ पैकी ९ जागा बिनविरोध....**

या बँकेच्या प्राथमिक कृषि पतपुरवठा, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मतदारसंघात परभणी गटातून बँकेचे विद्यमान अध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते सुरेश वरपुडकर हे अपेक्षे प्रमाणे बिनविरोध निवडून आले आहेत. या गटातून त्यांचे सुपुत्र समशेर वरपुडकर यांचा एकमेव उमेदवारी अर्ज होता. अपेक्षेप्रमाणे समशेर वरपुडकर यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. परभणी प्रमाणेच जिंतूर गटातून बँकेचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते रामप्रसाद बोर्डीकर हे ही बिनविरोध निवडून आले. त्यांचे बंधु गंगाधर कदम बोर्डीकर यांनी या गटातून स्वतःचा उमेदवारी अर्ज मागे घेतला. सेलू गटातून जिल्ह्याच्या पालकमंत्री सौ. मेघना साकोरे बोर्डीकर याही बिनविरोध निवडून आल्या. या गटातून राजेंद्र लहाणे यांनी स्वतःचा उमेदवारी अर्ज मागे घेतला. पाथरी गटातून आमदार सईद खान यांचे बंधु पठाण मेहराज खान शेरगुल खान हे बिनविरोध निवडून आले. येथून अन्य उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले. गंगाखेड गटातून विद्यमान आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे हे अंकेश भगवान सानप यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर बिनविरोध निवडून आले. सोनपेठ गटातून विद्यमान आमदार राजेश विटेकर हे बिनविरोध निवडून आले. येथून विठ्ठलराव सूर्यवंशी, विद्या धोंडगे यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला. पालम गटातून तुषार दुधाटे गोळेगांवकर हे बिनविरोध निवडून येणार हे स्पष्टच होते. कारण या गटातून त्यांचाच एकमेव अर्ज दाखल झाला होता. हिंगोली जिल्ह्यातील औंढा गटातून राजेश पाटील गोरेगांवकर हे बिनविरोध निवडून आले. तेथून सोपानराव लव्हेकर यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला. तर त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. रुपाली राजेश पाटील



या सेनगांव गटातून बिनविरोध निवडून आल्या आहेत. परभणी व हिंगोली जिल्ह्यातील एकूण १४ पैकी सोसायटी गटातून ९ जागा बिनविरोध आल्या आहेत. त्यामुळे आता परभणी जिल्ह्यातील पूर्णा व मानवत व हिंगोली जिल्ह्यातील वसमत, हिंगोली व कळमनुरी या पाच गटात निवडणूक अटळ ठरली आहे.

**सुरेशदादा देशमुख कृषि पणन व शेतमाल प्रक्रिया गटातून बिनविरोध...**

कृषि पणन संस्था व शेतमाल प्रक्रिया मतदारसंघातून संतोष बोबडे यांच्या पाठोपाठ अभिजित पारवे, राजेश काळे या तिघांनी आपआपले उमेदवारी अर्ज मागे घेतले. त्यामुळे माजी आमदार सुरेशराव देशमुख यांचा बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला. येथून देशमुख यांनी स्वतःचा अर्ज कायम राखला व त्यांचे सुपुत्र उपमहापौर गणेश देशमुख यांनी माघार घेतली.

**महिला गटातील दोन्ही जागा बिनविरोध..**

महिला गटातून सौ. प्रेरणा समशेर वरपुडकर व भावना सचिन बोर्डीकर-मुंगसे या दोघी बिनविरोध निवडून आल्या आहेत. या गटातील सौ. सुरेखा भिकाजी आवचार, सौ. मीना सुरेश वरपुडकर, जयश्री सुभाष जाधव, सौ. सिंधुताई सोपान बोबडे, सरस्वती गंगाधर पवार, भावना अनिल नखाते, उज्वलाताई विजयप्रकाश तांभाळे, करुणाबाई बालासाहेब कुंडगीर, शोभा रामभाऊ घाटगे, संगीता भगवान सानप, खान फरहाना नसरीन अब्दुल जब्बार, शिला अशोक काकडे, संजीवनी भगवान वटाणे, गीताबाई संतोष शेळके, सुरेखा भिकाजी आवचार यांनी आपआपले उमेदवारी अर्ज मागे घेतले.

भगवानराव वाघमारे इतर मागास प्रवर्गातून बिनविरोध...

इतर मागास प्रवर्ग गटातून ज्येष्ठ नेते तथा माजी उपमहापौर भगवानराव वाघमारे हे बिनविरोध निवडून आले आहे. या गटातून सचिन भोसले, अनिल वाघमारे, रामभाऊ घाटगे, अशोक काकडे, प्रशांत कापसे, बालाजी खैरे, नारायण शिंदे, प्रल्हाद चिंचाणे यांनी स्वतःचे उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत.

इतर शेती संस्था मतदारसंघात सईद खान विरुध्द जामकर लढत...

इतर शेती संस्था मतदारसंघातून संजय बाबाराव देशमुख, समशेर वरपुडकर, विजयकुमार मोरे, विजय जामकर, सुरजितसिंह ठाकूर, संतोष बोबडे, सतीश सोमानी, रमेश सूर्यवंशी, शिवाजीराव भरोसे, शशिकांत रामराव वडकुते, गजानन मुळे, खान फरहाना नरसिंग अब्दुल जब्बार, अशोक काकडे, आमदार सईद खान शेरगुल खान, अजित वरपुडकर, विलास खेडेकर, संदीप काळे, शिवाजीराव गुंडाळे, ज्ञानोबा साबळे, अनंत काळे, सय्यद हरसान हुसैनी सय्यद नोमान, प्रिती सचिन जाधव, शोभाताई बळीराम कावरखे, बळीराम सोरेकर यांचे अर्ज होते. त्यापैकी काहींनी माघार घेतली. अर्ज मागे घेतलेल्यां उमेदवारांची नावे कळाली नाहीत. परंतु, पाच ते सहा उमेदवार रिंगणात आहेत. विशेषतः जामकर विरुध्द आमदार सईद खान अशी लढत अपेक्षित आहे.

**ठाकुर विरुध्द सरोदे लढाई अटळ...**

अनुसूचित जाती/जमाती मतदारसंघातून प्रशास चंद्रशेखर ठाकूर, द्वारकाबाई बाबुराव कांबळे, सिध्दार्थ मुंजाजी वायवळ, मिलींद ज्ञानदेव सावंत, अतूल गोपीनाथ सरोदे, रविंद्र कांबळे, शिवाजीराव मव्हाळे, यशवंतराव वाटोडे, संजय सारणीकर, तुकाराम उमाले, शोभा हनुमंतराव बोबडे यांचे उमेदवारी अर्ज आहेत. त्यापैकी काहींनी माघार घेतली. परंतु, प्रशास ठाकूर विरुध्द अतूल सरोदे अशी लढत अपेक्षित आहेत.

**परिहार विरुध्द कुंडगीर व मायदंळे यांच्यात लढत....**

विमुक्त जाती/भटक्या जमाती/विविध मागास प्रवर्ग गटातून स्वराजसिंह परिहार, सुमित परिहार, विशाल बुधवंत, करुणाबाई कुंडगीर, अभय बालासाहेब कुंडगीर, आकेश भगवान सानप, संगीता भगवान सानप, विक्रमसिंह दहे, भगवान वटाणे, सुनंदा अशोकराव फलके, शेख माजेद शेख अब्दुल अजीज, किरण मायंदळे, दत्तात्रय मायंदळे, गीताबाई संतोष शेळके, शिवदास गोड्डेवार, म. फैसल शेख फरीद, बळीराम रामचंद्र सोरेकर यांचे उमेदवारी अर्ज दाखल झाले. यापैकी काहींनी माघार घेतली परंतु, या मतदारसंघात परिहार विरुध्द मायंदळे व कुंडगिर अशी लढत आहे..

## संक्षिप्त वृत्त...

### सेलूतील देवगिरी नागरी सहकारी बँकेत सहकार सप्ताह उत्साहात : सहकार चळवळीचे महत्त्व पटवून देणारे मार्गदर्शन; बँकेच्या प्रगतीचा आढावा

**सेलू,/प्रतिनिधी :** येथील देवगिरी नागरी सहकारी बँकेच्या वतीने सहकार सप्ताह उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. सहकार क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात सहकार चळवळीचे महत्त्व, व्याप्ती आणि भविष्यातील संधी यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बँकेचे पदाधिकारी होते. प्रमुख पाहुणे म्हणून साईबाबा नागरी सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रामराव लाडाने तसेच तुळजाभवानी अर्बनचे विभागीय अधिकारी शिंगणे उपस्थित होते. यावेळी यशवंत नागरी सहकारी पतसंस्थेचे शाखाधिकारी विवेक सोननेकर, सेलू नागरी पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, माउली अर्बनचे दीपक कदम, श्याम मेहकर, पीपल को-ऑपरेटिव्ह बँक, हिंगोलीचे ओमप्रकाश देवडा तसेच पत्रकार डॉ. शिवाजी शिंदे यांची उपस्थिती होती.

दीपप्रज्वलन व भारतमाता पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. शाखाधिकारी सागर जोशी यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट करत प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. तसेच शाखेच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. रामराव लाडाने, शिंगणे आणि डॉ. शिवाजी शिंदे यांनी आपल्या मनोगतात सहकार क्षेत्राची गरज, त्याची व्याप्ती आणि समाजविकासातील महत्त्वपूर्ण योगदान याविषयी सविस्तर माहिती दिली. सहकार चळवळ ग्रामीण व शहरी अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी कशी उपयुक्त ठरते यावरही त्यांनी प्रकाश टाकला.

यावेळी शाखाधिकारी सागर जोशी यांनी देवगिरी नागरी सहकारी बँकेला नुकतेच प्राप्त झालेले विविध पुरस्कार, आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील व्यवसायवृद्धी तसेच बँकेने सुरू केलेल्या इंटरनेट बँकिंग सुविधेची माहिती दिली. बँकेच्या प्रगतीमध्ये ग्राहकांचे मोलाचे योगदान असल्याचे सांगत त्यांनी बँकेच्या विकासाचा आलेख उपस्थितांसमोर मांडला. कार्यक्रमास विविध सहकारी संस्था, पतसंस्थांचे प्रतिनिधी, सभासद व ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रोखपाल उमेश जाधव यांनी आभार प्रदर्शन केले. चहापानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### महापालिका आयुक्तांची मौलाना आझाद वाचनालयाला भेट :वाचन सुविधांचा आढावा; अनुपस्थित कर्मचाऱ्यास कारणे दाखवा नोटीस देण्याचे आदेश

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिकेचे आयुक्त नितीन नार्वेकर यांनी गुरुवारी मौलाना अबुल कलाम आझाद वाचनालयाला भेट देऊन तेथील पुस्तकसंपदा, वाचन सुविधा आणि प्रशासकीय कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी वाचकांना अधिक दर्जेदार व सुलभ सेवा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना करण्यात आल्या.

वाचनालयातील कर्मचाऱ्यांच्या नियमित उपस्थितीबाबत तक्रारी प्राप्त झाल्यानंतर महापालिकेचे उपायुक्त प्रज्ञावंत कांबळे यांनीही वाचनालयाची अचानक पाहणी केली. या पाहणीदरम्यान कार्यालयीन वेळेत एक कर्मचारी अनुपस्थित आढळून आल्याने संबंधित कर्मचाऱ्यास कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश त्यांनी प्रशासनाला दिले. पाहणीवेळी उपायुक्त कांबळे यांनी विभागप्रमुख रिजवान आणि उपस्थित कर्मचाऱ्यांशी संवाद साधून वाचनालय परिसराची नियमित स्वच्छता राखणे, वाचकांना वेळेत व गुणवत्तापूर्ण सेवा देणे तसेच नागरिकांच्या अडचणी जाणून घेऊन त्यांचे तातडीने निराकरण करण्याच्या सूचना केल्या.

कार्यालयीन वेळेत सर्व कर्मचाऱ्यांनी आपल्या कामाच्या ठिकाणी उपस्थित राहून जबाबदारीने कर्तव्य बजावावे. अन्यथा संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. महापालिकेच्या वाचनालयांमधील सेवा अधिक सक्षम, शिस्तबद्ध आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी यापुढेही अशा प्रकारच्या अचानक पाहण्या सुरू राहणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

### बोरी पोलिसांकडून मोटारसायकल चोरीच्या ८ गुन्ह्यांचा पर्दाफाश : दोन आरोपी जेरबंद; ३ लाख ९५ हजार रुपयांच्या आठ मोटारसायकली जप्त

**जिंतूर,/प्रतिनिधी :** बोरी पोलिसांनी मोटारसायकल चोरीविरोधात मोठी कारवाई करत तब्बल आठ गुन्ह्यांचा उलगडा केला आहे. या कारवाईत दोन आरोपींना अटक करण्यात आली असून चोरीच्या आठ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत. जप्त करण्यात आलेल्या वाहनांची एकूण किंमत सुमारे ३ लाख ९५ हजार रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या सूचनेनुसार मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा तपास सुरू असताना पोलिसांना गोपनीय माहिती प्राप्त झाली. त्यानुसार आडगाव फाटा परिसरात सापळा रचून गजानन जनार्दन कोकाटे (वय २५) आणि बाळासाहेब रामकिशन शिंदे (वय २३, दोघे रा. खानापूर फाटा, परभणी) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून चार चोरीच्या मोटारसायकली जप्त करण्यात आल्या.

दोन्ही आरोपींकडे सखोल चौकशी केली असता त्यांनी यापूर्वी चोरीच्या आणखी चार मोटारसायकली कमी किमतीत विकल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी संबंधित खरेदीदारांचा शोध घेऊन त्यांच्या ताब्यातील चार मोटारसायकलीही जप्त केल्या. त्यामुळे या प्रकरणात एकूण आठ मोटारसायकली हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले. तपासादरम्यान आरोपींनी बोरी, जिंतूर, नवा मोंढा, नानलपेठ तसेच नांदेड जिल्ह्यातील वजीराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतून मोटारसायकली चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी अभिलेखांची पडताळणी केली असता संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये वाहन चोरीचे गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, अपर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल विभुते यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. बोरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रामेश्वर धोंडगे यांच्यासह राजेश जटाळ, प्रताप साळवणे, अमोल मुंढे, संघसेन कांबळे आणि प्रकाश मोरे यांनी ही यशस्वी कारवाई पार पाडली.

### नांदेड-पनवेल एक्स्प्रेसच्या सेवेत तात्पुरता बदल : दौंड-पनवेल दोन्ही गाड्या अंशतः रद्द

**परभणी,/प्रतिनिधी :** परिचालन कारणास्तव दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने हजूर साहिब नांदेड-पनवेल आणि पनवेल-हजूर साहिब नांदेड एक्स्प्रेसच्या सेवेत तात्पुरता बदल जाहीर केला आहे. त्यामुळे या दोन्ही गाड्या दौंड-पनवेल मार्गावर अंशतः रद्द राहणार आहेत.

रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, गाडी क्रमांक १७६१४ हजूर साहिब नांदेड-पनवेल एक्स्प्रेस ही ८ जुलै २०२६ रोजी हजूर साहिब नांदेड येथून सुटल्यानंतर केवळ दौंड स्थानकापर्यंतच धावणार आहे.

## तापवलेले दूध रबरसदृश पदार्थात रूपांतरित; पूर्णेतील प्रकार

**पूर्णा,/प्रतिनिधी-** शहरात दूध भेसळीचा संशय निर्माण करणारी धक्कादायक घटना समोर आली असून, घरात तापवण्यासाठी ठेवलेल्या दुधाचे रबरसदृश घट्ट पदार्थात रूपांतर झाल्याने नागरिकांमध्ये खळबळ उडाली आहे. या प्रकारामुळे दूधाच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून संबंधित विक्रेत्याविरोधात कठोर कारवाईची मागणी होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कोळीवाडा परिसरातील धारेश्वर संतोष भंगे यांनी सराफा बाजार परिसरातील एका खाजगी दूध विक्रेत्याकडून अर्धा लिटर दूध खरेदी केले होते. हे दूध घरी आणून तापवण्यासाठी ठेवले असता काही वेळातच त्याचा रंग व पोत बदलू लागला. त्यानंतर दूध रबरसदृश घट्ट पदार्थात रूपांतरित झाल्याचे निदर्शनास आले. हा प्रकार पाहून कुटुंबीयांना धक्का बसला.

घटनेची माहिती मिळताच पोलिस व अन्न सुरक्षा विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन प्राथमिक चौकशी केली. संशयित दुधाचे नमुने तपासणीसाठी जप्त करण्यात आले असून प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

संबंधित दूध विक्रेत्याची चौकशी सुरू असून प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. तपासादरम्यान दुधात भेसळ किंवा अन्य अनियमितता आढळून आल्यास संबंधितांवर अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार गुन्हा दाखल केला जाऊ शकतो, असे अधिकृत सूत्रांनी सांगितले.

या घटनेनंतर शहरातील खाजगी दूध विक्री व्यवस्थेबाबत नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. दूध विक्री करणाऱ्या सर्व विक्रेत्यांची नियमित तपासणी करून भेसळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, या प्रकरणातील प्रयोगशाळेच्या अहवालाकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## गंगाखेडच्या प्रलंबित विकासकामांचा मुद्दा विधानसभेत

### आ.डॉ.अतुलबाबा भोसलेंनी लक्षवेधीद्वारे मांडला प्रश्न : धानोरा काळे व वझूर पुलांबाबत सरकार सकारात्मक

**गंगाखेड ,/प्रतिनिधी-** स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे हे परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या कामानिमित्त मतदारसंघात उपस्थित असताना त्यांच्या विनंतीवरून येथील विविध प्रलंबित विकासकामांचा मुद्दा कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधीच्या माध्यमातून प्रभावीपणे उपस्थित केला. त्यांच्या या लक्षवेधीला राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी उत्तर देत शासनाने संबंधित विषयांची गंभीर दखल घेतली असून त्यावर लवकरच सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे सभागृहात स्पष्ट केले.

लक्षवेधीत आ. डॉ.भोसले यांनी मौजे धानोरा काळे (ता: पूर्णा) येथील गोदावरी नदीवरील पुलाच्या रखडलेल्या कामाकडे शासनाचे लक्ष वेधले. सन २०२१ पासून सुरू असलेल्या या पुलाचे सुमारे ९८ टक्के काम पूर्ण झाले असले तरी दोन्ही बाजूंच्या भरावाचे काम अपूर्ण असल्यामुळे पूल अद्याप वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेला नाही. परिणामी, विशेषतः पावसाळ्यात नागरिकांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागत असून दळणवळणावरही गंभीर परिणाम होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

याचबरोबर डिग्रस बंधाऱ्यात पूर्ण क्षमतेने पाणीसाठा करता येत नसल्याने परिसरातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी आवश्यक पाणी उपलब्ध होत नसून त्याचा थेट परिणाम शेती उत्पादनावर आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होत असल्याचेही आ. भोसले यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणले. या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी केली. तसेच मौजे वझूर (ता. पूर्णा) येथील गोदावरी नदीवरील पुलाचे कामही २०२१ पासून सुरू असून निर्धारित मुदत उलटूनही ते अद्याप अपूर्ण आहे. शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होऊनही ही दोन्ही महत्त्वाची विकासकामे रखडलेली असल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ही बाब केवळ प्रशासकीय दिरंगाई नसून जनतेच्या विश्वासालाही धक्का देणारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दोन्ही पुलांची उर्वरित कामे तातडीने पूर्ण करणे, कामातील विलंबाची सखोल चौकशी करणे, दोषी ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करणे तसेच या प्रकल्पांचे कालबद्ध नियोजन सभागृहासमोर सादर करावे, अशीही ठाम मागणी आ.डॉ. अतुलबाबा भोसले यांनी केली.

गंगाखेड विधानसभा मतदारसंघातील जनतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे प्रश्न आ.डॉ.गुट्टे यांच्या विनंतीवरून विधानसभेच्या पटलावर प्रभावीपणे मांडल्याबद्दल कराड दक्षिणचे आमदार डॉ.अतुलबाबा भोसले यांच्याबद्दल मतदारसंघातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, शासनाने आता प्रत्यक्ष कृती करून रखडलेल्या विकासकामांना गती द्यावी, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

दरम्यान, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी या सर्व बाबींची शासनाने गंभीर दखल घेतली असून संबंधित प्रकरणांवर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे सभागृहात सांगितले. त्यामुळे धानोरा काळे व वझूर येथील रखडलेल्या पुलांच्या कामांना लवकरच गती मिळेल, असा विश्वास आ.डॉ.गुट्टे यांनी व्यक्त केला.

## मानवतात गावगुंडांचा हैदोस? नागरिकांचा पोलिसांकडे धाव; कठोर कारवाईची मागणी

**मानवत,/प्रतिनिधी-:** मानवत शहरातील वाढती गुंडगिरी, अवैध धंदे, भरधाव वाहनचालकांचा त्रास आणि सार्वजनिक ठिकाणांवरील अतिक्रमण यामुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी थेट पोलिस निरीक्षकांकडे धाव घेत कठोर कारवाईची मागणी केली आहे. यासंदर्भात गुरुवारी सविस्तर निवेदन सादर करण्यात आले असून शहरातील कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नावर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, मानवत शहरातील काही कथित गावगुंड आणि त्यांच्या साथीदारांकडून नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण केले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. भरधाव वेगाने दुचाकी चालविणे, सर्वसामान्य नागरिकांना त्रास देणे, अवैध धंदे चालविणे आणि सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे निवेदनात म्हटले आहे. विशेष म्हणजे, ८ जुलै रोजी शिवसेना गटनेते तथा नगरसेवक ॲड. विक्रमसिंह मधुकरराव दहे आणि त्यांचे बंधू अभयसिंह दहे यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याचा उल्लेख करत नागरिकांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे. शहरातील एका लोकप्रतिनिधीवरच भरदिवसा हल्ला होत असेल, तर सामान्य नागरिकांच्या सुरक्षेचे काय, असा सवाल निवेदनातून उपस्थित करण्यात आला आहे. निवेदनात पुढे असेही नमूद करण्यात आले आहे की, शहरात अनेक ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा असूनही गुन्हेगारी प्रवृत्तीच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. काही भागांत अवैध दारूविक्री, सावकारी, नागरिकांच्या मालमत्तांवर बेकायदेशीर ताबा मिळविण्याचे प्रकार आणि सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणे वाढल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित व्यक्तींची चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, शहरातील अवैध धंद्यांवर धडक मोहीम राबवावी आणि नागरिकांमध्ये निर्माण झालेली भीती दूर करण्यासाठी पोलिस प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी निवेदनकर्त्यांनी केली आहे. या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलिस अधिकारी आणि तहसीलदार यांनाही पाठविण्यात आल्या आहेत. या वेळी माजी शिवसेना प्रमुख अनिल जाधव , व्यंकटेश चौधरी , जनार्धन कीर्तने , माजी नगरसेवक शिवाजी पाटील , नरसय्या कुरपटवार , शंकर कच्छवे , प्रा. अनंत गोलाईत हे उपस्थित होते. या निवेदनावर ॲड् सतीश चव्हाण, कपिल मुडपे , मोहन बाराहाते, प्रकाश कुलथे ,राजेश कच्छवे , वामन चव्हाण, तुकाराम चव्हाण ,दिगंबर दहे ,संदीप दहे संकेत कच्छवे , रघुवीर लाड , सार्थक दहे , शुभम दहे , अविनाश दहे , आकाश दहे , भारत देशमाने , रतन दहे, मोहन दहे, प्रताप दहे, अमर पतंगे , उमेश महाडिक व गजानन दहे यांच्यासह शंभर ते दीडशे नागरिकांच्या सह्या होत्या

''दहशतीखाली शहर किती दिवस?''

मानवत शहरात वाढत्या गुंडगिरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता वाढत आहे. लोकप्रतिनिधींवर हल्ले, अवैध धंद्यांचे आरोप, भरधाव वाहनांचा त्रास आणि सार्वजनिक ठिकाणांवरील बेकायदेशीर हालचाली यामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पोलिस प्रशासनाने आता केवळ तक्रारींची नोंद न घेता प्रत्यक्ष कारवाई करून शहरातील गुन्हेगारी प्रवृत्तींना लगाम घालावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

सोलापूर तरुण भारत
arat.com, epaper.dainiktarunbharat.com
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख

# शांततेच्या शत्रूंची शिरजोरी

जागतिक स्तरावर आर्थिक आणि भू-राजकीय अस्थिरता माजविणाऱ्या इराण-अमेरिका युद्धाचे ढग तात्पुरते निवळल्यावर जगाने टाकलेला निःश्वास पूर्ण होण्याआधीच पुन्हा एकदा या दोन देशांनी परस्परांविरोधात सुरू केलेल्या लष्करी कारवायांचे पडसाद जगभर उमटू लागले आहेत. अमेरिका आणि इराण यांच्यातील तात्पुरत्या युद्धविरामाचा फुगा फुटल्यानंतर बुधवारी उभे जग अक्षरशः हादरून गेले. हा संघर्ष पुन्हा एकदा टोकाला पोहोचला असून, युद्धाचे ढग गडद झाले आहेत. जागतिक व्यापारक्षेत्राची जीवनवाहिनी असलेल्या 'होर्मुझ सामुद्रधुनी'वरील कब्जाच्या संघर्षाने जागतिक भू-राजकारण आणि अर्थकारणाला एका मोठ्या संकटाच्या उंबरठ्यावर आणून उभे केले आहे. बुधवारी अमेरिका आणि इराणमध्ये वार-पलटवार सुरू झाले आणि पश्चिम आशियामधील तणावाची जुनी स्थिती पुन्हा गडद झाली. इराणसोबतचे युद्ध थांबविण्याच्या तात्पुरत्या समझोत्याची मुदत संपल्याचे अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी तुर्कियेमधील अंकारा येथे नाटो परिषदेत जाहीर करताच जगभराच्या अर्थक्षेत्राला हादरे बसू लागले. येत्या काही दिवसांत युद्धाची कारवाई अधिक तीव्र करण्याचे आणि आर्थिक नाड्या आवळण्याचे संकेतही ट्रम्प यांनी दिले आणि लगेचच अमेरिकेच्या सैन्याने होमुर्झच्या सामुद्रधुनीमधून होणाऱ्या वाहतुकीकडे मोर्चा वळविला. इराणच्या सैनिकी तळांवर जोरदार हवाई हल्ले चढविले आणि जगभरातील अर्थक्षेत्र घायाळ झाले. अमेरिकेकडून मारले गेलेले इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्लाह खामेनेई यांच्यावर इराणमध्ये अन्त्यसंस्कार सुरू असतानाच सूडाच्या या भावनेने उचल खाल्ली आणि आता प्रत्यक्ष युद्धाच्या भडक्यात होरपळण्याची वेळ जगावर येऊन ठेपली आहे.

अमेरिकेने इराणी लष्करी तळांवर हल्ले केल्यानंतर इराणने कुवैत आणि बहरीनवर हल्ले चढवून अमेरिकी तळांना लक्ष्य केले आणि इराणच्या तेलावरील अमेरिकेचे निर्बंध पुन्हा जारी झाले. जगातील सुमारे २० टक्क्यांहून अधिक खनिज तेलाची आणि द्रवरूप वायूची वाहतूक करणाऱ्या होर्मुझच्या सामुद्रधुनीत पुन्हा एकदा वाहतूक संकट निर्माण झाल्याने जागतिक पुरवठा साखळी कोलमडण्याची चिन्हे दिसू लागली आहेतच, पण भारतासह जगभरातील अनेक देशांच्या उंचावणाऱ्या विकासदराचे आलेख पुन्हा एकदा मान टाकताना दिसू लागल्याने जागतिक आर्थिक वृद्धीचे अगोदरचे सारे अंदाज पुन्हा कोलमडणार आहेत. विशेषतः, आपल्या एकूण गरजेच्या ८५ टक्क्यांहून अधिक कच्च्या तेलासाठी आयातीवर अवलंबून असलेल्या भारताच्या अर्थचक्राची पूर्वपदावर येणारी घडी पुन्हा विस्कळीत होणार आहे. देशातील ९० टक्के एलपीजीची आयात होर्मुझ सामुद्रधुनीतून होते. हा वाहतूक मार्ग सुरक्षित राहिलेला नाही, हे आता स्पष्ट झाले आहे. युद्धविरामाच्या तात्पुरत्या करारानंतर तेल आणि गॅसपुरवठा सुरळीत होऊन परिस्थिती पूर्वपदावर येण्याच्या अपेक्षा उंचावल्या होत्या. आता त्या मावळत चालल्या असून हा पुरवठा खंडित झाल्यास काही महिन्यांपूर्वीप्रमाणे पुन्हा घरगुती गॅस सिलेंडरच्या किमती भडकतील, कदाचित टंचाईच्या भीतीने जनजीवन विस्कळीत होईल आणि व्यावसायिक क्षेत्रावरील ताण वाढून मंदीच्या लाटा तडाखे देऊ लागतील. गेल्या काही महिन्यांत भारतीय रुपयावरील दबाव वाढत असल्याने त्याचे अवमूल्यन सुरू आहे. साहजिकच, आयात कराव्या लागणाऱ्या वस्तूंसाठी मोठी किंमत मोजावी लागणार असून याच परिस्थितीचे परिणाम शेअर बाजारावर दिसू लागले आहेत. जागतिक अनिश्चिततेमुळे परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारातून काढता पाय घेण्यास सुरुवात केली, तर बाजारात कशी पडझड होऊ शकते याची एक लहानशी चुणूक बुधवारी शेअर बाजाराला अनुभवायला मिळाली. बाजारातील अस्थिरतेचे हे लक्षण अर्थक्षेत्राच्या उभारीच्या आत्मविश्वासास नख लावणारे ठरले, तर अमेरिका-इराण संघर्षाचा मोठा फटका भारताला थेटपणे बसणार हे स्पष्ट असल्याने, नव्या संकटाचे संधीत रूपांतर करण्याचे नवे आव्हान भारतासमोर उभे राहिले आहे.

हे युद्ध सुरू झाल्यानंतर लगेचच भारतात त्याचे परिणाम दिसू लागताच राजकीय मुत्सद्देगिरी आणि आर्थिक लवचीकतेच्या उपाययोजनांमुळे युद्धस्थितीच्या पहिल्या टप्प्यात अर्थव्यवस्थेची पुरती वाताहत रोखण्यात भारताला यश आले होते. ऊर्जासंकटातून तोडगा काढण्यासाठी रशियाकडून कच्च्या तेलाची आयात वाढवितानाच, देशांतर्गत ऊर्जा स्त्रोतांच्या निर्मितीला प्रोत्साहन देण्याचे धोरण भारताने स्वीकारले. त्याचे सकारात्मक परिणाम दिसू लागले आणि जागतिक संकटाचा हा फटका भारताच्या दृष्टीने बराचसा सौम्य झाला. या युद्धकाळातही भारताने अमेरिकेशी असलेले धोरणात्मक संबंध आणि इराणशी असलेले ऐतिहासिक ऋणानुबंध यामध्ये कमालीचा समतोल साधला आहे. भारताच्या जहाजांचे संरक्षण करण्यासाठी नौदलाने 'ऑपरेशन संकल्प' सक्रिय ठेवले आहे. तरीही, पश्चिम आशियातील ही तात्पुरती शस्त्रसंधी किंवा तणाव निवळावा ही सद्यःस्थितीची गरज असली, तरी भारतासाठी हा एक मोठा धडा आहे. भविष्यात स्वतःला सुरक्षित ठेवण्यासाठी भारताला ऊर्जेच्या गरजेसाठी आखाती देशांवर अवलंबून न राहता पर्यायी ऊर्जाक्षेत्रांच्या स्वावलंबनाचे नवे प्रयत्न सुरू करावे लागतील. इंधनाचे पर्यायी साठे निर्माण करावे लागतील, हरित ऊर्जा आणि जलविद्युत, सौरऊर्जा यांसारख्या स्त्रोतांच्या उभारणीचा वेग वाढवावा लागेल. त्यामुळे पुन्हा डोके वर काढलेले हे संकट म्हणजे भारताच्या 'आत्मनिर्भर' बनण्याच्या प्रवासातील एक कठीण परीक्षा ठरणार आहे. जागतिक युद्धाच्या छायेत स्वतःचे हितसंबंध जपत आर्थिक गती कायम राखणे, हेच भारताच्या आगामी काळातील परराष्ट्र आणि आर्थिक धोरणाचे खरे यश असेल. कारण, भारताची भौगोलिक आणि आर्थिक परिस्थिती पाहता, तेलाच्या किमतींमधील किरकोळ चढ-उतारही देशाच्या विकासाचा वेग बदलू शकतात. कच्चे तेल महाग झाले की पेट्रोल आणि डिझेलचे दर वाढून वाहतूक खर्चात होणाऱ्या वाढीमुळे भाजीपाला, अन्नधान्य, दुधापासून ते कारखान्यांमध्ये तयार होणाऱ्या प्रत्येक वस्तूची किंमत वाढते. ही महागाई नियंत्रणात राखण्यासाठी व्याजदर वाढल्यास गृहकर्जे, व्यावसायिक कर्जे महाग होऊन काटकसर आणि बचतीचे पर्याय स्वीकारावे लागतात आणि चलनवलन थंडावल्याने मंदीचा वेग वाढतो.

त्यामुळे, हा चक्रव्यूह भेदण्यासाठी आत्मनिर्भरता हाच सध्याच्या स्थितीत एकमेव पर्याय असल्याने त्याकरिता दीर्घकालीन योजना आखणे ही भारताच्या दृष्टीने पहिली गरज ठरणार आहे. पेट्रोल-डिझेलसारख्या इंधनाची आयात कमी करण्यासाठी उसाच्या चिपाडापासून किंवा धान्यापासून तयार होणाऱ्या इथेनॉलचा वापर वाढविण्याच्या पर्यायास प्राधान्य दिले जात असताना, त्या धोरणाभोवती वादाची वलये उमटू लागली आहेत. वाहतुकीवर खर्च होणाऱ्या इंधनाची बचत करण्यासाठी विजेवर चालणाऱ्या स्वयंचलित वाहनांचा वापर वाढविण्याची गरज जनतेच्या गळी उतरविण्यात अपेक्षित गती साध्य झालेली दिसत नाही. सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि ग्रीन हायड्रोजनसारख्या भविष्यातील इंधनावर सुरू केलेल्या गुंतवणुकीचे लाभ मिळविण्यासाठी काही कालावधी द्यावा लागणार आहे. त्यामुळे, जोवर भारत ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होत नाही, तोपर्यंत जागतिक स्तरावर घडणाऱ्या घडामोडी भारताच्या आर्थिक गतीवर प्रभाव टाकत राहतील, हे वास्तव स्वीकारलेच पाहिजे. देशाच्या अर्थकारणाचा डोलारा जर केवळ कच्च्या तेलाच्या अर्थकारणावर अवलंबून असेल, तर आज उद्भवलेल्या स्थितीचे आव्हान स्वीकारावे लागेल. युद्ध हा शांतता प्रस्थापित करण्याचा मार्ग नसतो. युद्धातून शांतता प्रस्थापित करणे हा वर्चस्ववादी मार्ग असतो. सध्याच्या युद्धस्थितीत वर्चस्ववादाचा मुद्दा अधिक गडद झालेला असल्याने, तोडग्यासाठीच्या संवादाचे मार्ग संकुचित झाले आहेत. ही स्थिती जागतिक शांततेसाठी धोकादायकच असल्याने, भारताने अधिक सतर्कतेने आत्मनिर्भरतेच्या धोरणास गती देण्याची गरज आहे. ■

## अर्थविशेष

**हितेश पारसे**

# टीसीएस आणि आयकराचे नियम

आजकाल उच्च शिक्षण, नोकरी किंवा व्यवसायासाठी अनेक भारतीय विद्यार्थी व युवक परदेशात वास्तव्यास आहेत. त्यांच्या शिक्षणाचा खर्च, राहणीमान, वैद्यकीय खर्च किंवा इतर गरजांसाठी पालकांकडून नियमितपणे पैसे पाठविले जातात. मात्र, ''परदेशात पैसे पाठविल्यावर आयकर लागतो का?'', ''टीसीएस म्हणजे काय?'', ''किती रकमेपर्यंत कर नाही?'' असे अनेक प्रश्न नागरिकांच्या मनात निर्माण होतात. चला, हे नियम सोप्या भाषेत समजून घेऊया.

परदेशात मुलगा किंवा मुलीला पैसे पाठवता येतात का?

होय. भारतातील निवासी व्यक्तीला रिझर्व्ह बँकेच्या उदारीकृत प्रेषण योजना (एलआरएस) अंतर्गत परदेशात विविध कारणांसाठी पैसे पाठविण्याची परवानगी आहे.

यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश होतो -

उच्च शिक्षणासाठी, राहणीमान व दैनंदिन खर्चासाठी, वैद्यकीय उपचारासाठी, भेट (गिफ्ट) म्हणून, गुंतवणूक करण्यासाठी, प्रवासासाठी, जवळच्या नातेवाईकांच्या देखभालीसाठी.

सध्या एका आर्थिक वर्षात एका निवासी भारतीय व्यक्तीस २,५०,००० अमेरिकन डॉलर्स (सुमारे २ कोटींपेक्षा अधिक) पर्यंत रक्कम एलआरएस अंतर्गत पाठविण्याची परवानगी आहे.

मुलगा किंवा मुलीला मिळालेली रक्कम करपात्र असते का?

नाही. जर आई-वडिलांनी आपल्या मुलगा किंवा मुलीला पैसे पाठविले असतील तर ती रक्कम भेट म्हणून गणली जाते.

आयकर कायद्यानुसार आई-वडील हे जवळचे नातेवाईक असल्यामुळे अशा भेटीवर कोणताही आयकर लागत नाही.

म्हणजेच, पालकांनी पैसे पाठविले, मुलाने किंवा मुलीने ते स्वीकारले...

...यावर भारतात कोणताही भेटवस्तू कर किंवा आयकर लागत नाही.

मात्र त्या पैशातून पुढे व्याज, भाडे, शेअर्सवरील नफा किंवा इतर उत्पन्न मिळाल्यास त्या देशातील कर कायद्यानुसार कर लागू शकतो.

टीसीएस म्हणजे नेमके काय? परदेशात पैसे पाठविताना अनेकांना वाटते की टीसीएस म्हणजे अतिरिक्त कर भरावा लागतो. परंतु हे पूर्णपणे चुकीचे आहे. टीसीएस (स्त्रोतावर गोळा केलेला कर) म्हणजे बँक किंवा अधिकृत डीलर तुमच्या वतीने आगाऊ कर गोळा करतो. हा अतिरिक्त कर नसून पुढे आयकर विवरणपत्र (आयकर विवरणपत्र) भरताना त्याचा पूर्ण क्रेडिट मिळतो. जर तुमच्यावर कर देय नसेल तर ही रक्कम परत (परतावा) देखील मिळू शकते.




टीसीएस कधी लागू होतो? सध्याच्या नियमांनुसार एका आर्थिक वर्षात एलआरएस अंतर्गत एकूण रुपये १० लाखांपर्यंत परदेशात पैसे पाठवल्यास टीसीएस लागत नाही. मात्र १० लाखांपेक्षा जास्त रक्कम पाठविल्यास, त्या व्यवहाराच्या स्वरूपानुसार लागू असलेल्या दराने टीसीएस आकारला जातो.

**शिक्षणासाठी पैसे पाठविताना :** जर मुलाच्या किंवा मुलीच्या परदेशातील शिक्षणासाठी पैसे पाठविले जात असतील तर शिक्षणाशी संबंधित व्यवहारांवर आयकर कायद्यात विशेष तरतुदी आहेत. काही प्रकरणांमध्ये (शिक्षण कर्जाद्वारे) रक्कम पाठविल्यास टीसीएसचा दर सवलतीचा असू शकतो. राहणीमानासाठी पैसे पाठविताना भाडे, जेवण, होस्टेल, दैनंदिन खर्च किंवा इतर देखभालीसाठी पाठविलेली रक्कम देखील एलआरएस अंतर्गतच येते. जर एका आर्थिक वर्षातील एकूण रक्कम १० लाखांच्या मर्यादेपेक्षा जास्त झाली, तर टीसीएसचे नियम लागू होतात.

**भेट म्हणून पैसे पाठविल्यास :** पालकांकडून मुलाला किंवा मुलीकडे पाठविलेली रक्कम गिफ्ट म्हणून आयकरमुक्त असली, तरी एलआरएसअंतर्गत एकूण रक्कम १० लाखांपेक्षा जास्त झाल्यास टीसीएस लागू होऊ शकतो. म्हणूनच भेटवस्तू कर आणि टीसीएस या दोन पूर्णपणे वेगळ्या बाबी आहेत.

टीसीएसचे दर काय आहेत? १ एप्रिल २०२६ पासून लागू असलेल्या नियमांनुसार, एलआरएस अंतर्गत एका आर्थिक वर्षात एकूण १० लाखांपर्यंत परदेशात रक्कम पाठविल्यास कोणताही टीसीएस लागू होत नाही. मात्र, १० लाखांपेक्षा जास्त रक्कम पाठविल्यास रेमिटन्सच्या उद्देशानुसार टीसीएस आकारला जातो. स्वतःच्या निधीतून परदेशातील शिक्षणासाठी रक्कम पाठविल्यास १० लाखांवरील रकमेवर २ टक्के टीसीएस लागू होतो. जर शिक्षणासाठीची रक्कम निर्दिष्ट वित्तीय संस्थेकडून घेतलेल्या शैक्षणिक कर्जातून पाठविली जात असेल, तर टीसीएस लागू होत नाही. त्याचप्रमाणे, परदेशातील वैद्यकीय उपचारासाठी पाठविलेल्या रकमेवर १० लाखांवरील भागावर २ टक्के टीसीएस आकारला जातो. मात्र, मुलगा किंवा मुलीच्या राहणीमानाचा खर्च, देखभाल, भेट , गुंतवणूक किंवा इतर सर्वसाधारण एलआरएस व्यवहारांसाठी १० लाखांवरील रकमेवर २० टक्के टीसीएस लागू होतो. परदेशी टूर पॅकेज खरेदी केल्यास संपूर्ण रकमेवर २ टक्के टीसीएस आकारला जातो. येथे एक बाब लक्षात ठेवणे आवश्यक आहे की १० लाखांची मर्यादा ही एका आर्थिक वर्षात एलआरएसअंतर्गत केलेल्या सर्व परदेशी रेमिटन्सची एकत्रित मर्यादा आहे. तसेच, टीसीएस हा अतिरिक्त कर नसून आगाऊ कर संकलन आहे. आयकर विवरणपत्र भरताना या टीसीएसचा पूर्ण कर म्हणून लाभ मिळतो आणि कर देय नसल्यास संबंधित रक्कम परताव्याच्या स्वरूपातही मिळू शकते.

**टीसीएसची रक्कम परत मिळते का?**

होय. ज्या व्यक्तीच्या पॅनवरून पैसे पाठविले जातात, त्या व्यक्तीला - आयकर भरताना टीसीएसचा क्रेडिट मिळतो, अंतिम करातून समायोजन करता येते, किंवा कर देय नसल्यास परतावा मिळतो.

**पैसे पाठविताना कोणती कागदपत्रे आवश्यक असतात?**

सामान्यतः बँक खालील कागदपत्रे मागते - पॅन कार्ड, फॉर्म ए २ एलआरएस घोषणा, शिक्षणासाठी प्रवेशपत्र, फीची पावती, पासपोर्ट, व्हिसा (लागू असल्यास), केवायसी (कागदपत्रे)

उदाहरण : समजा एका आर्थिक वर्षात पालकांनी -

शिक्षण शुल्कासाठी ८ लाख, राहणीमानासाठी ५ लाख

अशी एकूण १३ लाख रक्कम परदेशात पाठविली.

एकूण रक्कम १० लाखांपेक्षा जास्त झाल्यामुळे, लागू असलेल्या नियमांनुसार अतिरिक्त रकमेवर टीसीएस आकारला जाऊ शकतो.

**लक्षात ठेवाव्यात अशा महत्त्वाच्या गोष्टी :** मुलगा किंवा मुलीला पाठविलेली रक्कम भारतात आयकरपात्र नाही. पालकांकडून मिळालेली भेट पूर्णपणे करमुक्त असते. टीसीएस म्हणजे अतिरिक्त कर नव्हे; तो फक्त आगाऊ कर संकलन आहे. पैसे पाठविताना स्वतःचा पॅन वापरणे आवश्यक आहे. बँकेची पावती, एलआरएस कागदपत्रे आणि फीची कागदपत्रे जतन करून ठेवा. वर्षभरात पाठविलेल्या एकूण रकमेवर लक्ष ठेवा.

**निष्कर्ष :** परदेशात शिक्षण किंवा नोकरी करणाऱ्या मुला-मुलींना आर्थिक मदत करणे ही आज अनेक भारतीय कुटुंबांची गरज बनली आहे. आयकर कायद्यानुसार अशा मदतीवर मुलाच्या किंवा मुलीच्या हातात कर लागत नाही. मात्र, परदेशी रक्कम पाठविताना एलआरएस आणि टीसीएसचे नियम समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. योग्य नियोजन, आवश्यक कागदपत्रे आणि आयकर विवरणपत्रामध्ये टीसीएसचा योग्य लाभ घेतल्यास अतिरिक्त आर्थिक भार न पडता परदेशात निधी पाठविणे शक्य होते. ■

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## दखल


**डॉ. हेमंत जांभेकर**

# इथेनॉल मिश्रित पेट्रोल आणि तथ्य

सध्या संपूर्ण देशात इथेनॉल मिश्रित पेट्रोलसंबंधी चुकीच्या बातम्या सातत्याने येत आहेत व सामान्यजनाच्या मनात संभ्रम निर्माण करण्याचा व त्यातून देशातील नेतृत्वाची छबी बिघडविण्यासाठी अनेक मंडळी प्रयत्न करीत आहेत. वस्तुस्थिती खरंच काय आहे हे कळावे म्हणून हा लेखनप्रपंच.

हायड्रोकार्बनची सुरुवात मिथेनपासून होते. ज्याचा उपयोग सीएनजीमध्ये इंधन म्हणून करण्यात येतो. पेट्रोल हे याचेच मोठ स्वरूप आहे. ऑक्टेन म्हणजे सी८एच१८ हा घटक आपल्या पेट्रोलचा बहुतांश हिस्सा आहे. पुढे कार्बन नंबर वाढला की सी१२-सी१४ हे डिझेल म्हणून वापरले जाते.

देशातील बहुतांश इंधन आपण विदेशातून विकत घेतो. ज्यासाठी आपल्या विदेशी मुद्रा वापरण्यात येतात व देशावर आर्थिक ताण पडतो. यासाठी देशात २०१४ नंतर आपण इथेनॉल नावाचा घटक सी२एच५ओएच पेट्रोलमध्ये टाकण्यास सुरुवात केली. इथेनॉल व पेट्रोल हे सहज एकरूप होतात. त्यामुळे इंधन टाकीत एकत्र राहतात व कार किंवा स्वयंचलित वाहनाच्या कार्बोरेटर, जेथे इंधनाचे ज्वलन होते तेथे एकत्र असतात.




मी माझी हिरो होंडा स्कूटर प्रयोगासाठी वापरली व २००८ ते २०११ पर्यंत ई-५, ई-१०, ई-२० आणि ई-३५ पर्यंत प्रयोग केले. तसेच २०११ ते २०१८ पर्यंत माझी कार (मारुती ८००) ही पण ई-३० म्हणजे ३० टक्के इथेनॉल टाकून चालवली. आजही २५ वर्ष जुनी (२००१-चे पासिंग आहे) अजूनही सुस्थितीत आहे.

माझी स्कूटर किंवा कार संपूर्ण कालावधीत कधीच बंद पडली नाही किंवा खराब झाली नाही. तसेच स्कूटर (होंडाच्या) टाकीत किंवा कारच्या टाकीत कधीच पाणी जमा झाले नाही. ती कार मी अजूनही चालवत आहे. पेट्रोल व इथेनॉल ई-२०चे मिश्रणात कधीच पाणी नसते. इथेनॉल (हायग्रोस्कोपिक) पाणी शोषून घेणारे द्रव्य आहे. त्यामुळे हवेतील पाणी ओढू शकते. पण ते प्रमाण अत्यल्प असते. त्यामुळे आज होत असलेले आरोप जाणून केले जात आहेत.

ब्राझील, बँकॉक इत्यादी देशांत हे प्रयोग यशस्वी झाले आहेत. आपण आपल्या देशाची आर्थिक स्थिती यामुळे सुदृढ करीत आहोत. तसेच इथेनॉल हे उसापासून बनते. त्यामुळे येथील शेतकरी समृद्ध होत आहेत.

आजचे गढूळ वातावरण खोट्या बातम्या प्रसारित करून देशाचाच नव्हे तर शेतकऱ्यांचा पण घात करीत आहे. सोबतच इथेनॉल मिश्रित इंधन हे प्रदूषण कमी करण्यास मदत करते असे आढळून आले आहे. यातील अनेक प्रयोग देशातील प्रख्यात केंद्रासोबत मी स्वतः केले आहेत. त्यामुळे आज सरकारला बदनाम करण्याचा प्रयत्न करू नये, तसेच ज्यांना या संबंधात शंका असतील त्यांनी माझी स्कूटर किंवा कार स्वतः चालवून पाहावी व नंतर निर्णय करावा व बातम्या प्रसारित कराव्या ही विनंती. ■

## डिजिटल जागृती

**सीए अभय सगदेव**

# डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण कायदा

**(तुमची वैयक्तिक माहिती : डीपीडीपी कायदा प्रत्येक नागरिकासाठी का महत्त्वाचा आहे?)**

हा अगदी नेहमीसारखा दिवस होता. सकाळी राजेश डॉक्टरांकडे गेला. दुपारी त्याने मोबाईल ॲपवरून किराणा मागवला, मुलीची शाळेची फी ऑनलाईन भरली, यूपीआयद्वारे पैसे पाठवले, रेल्वेचे तिकीट आरक्षित केले आणि रात्री मित्रांशी सोशल मीडियावर संवाद साधला. दिवस संपेपर्यंत त्याने नकळत आपली वैयक्तिक माहिती अनेक संस्थांशी शेअर केली होती.

आता स्वतःलाच एक साधा प्रश्न विचारा. ही माहिती कोणाकडे गेली? ती का गोळा करण्यात आली? ती किती काळ जपून ठेवली जाणार? ती इतरांना दिली जाऊ शकते का? गरज संपल्यावर ती दुरुस्त किंवा हटविण्याची मागणी आपण करू शकतो का? या सर्व प्रश्नांच्या केंद्रस्थानी डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण कायदा, २०२३ (डीपीडीपी ॲक्ट) आहे.

आजचे जीवन डिजिटल झाले आहे. डॉक्टरांकडे नोंदणी, शाळेत प्रवेश, बँक व्यवहार, ऑनलाईन खरेदी, वीज बिल भरणे, टॅक्सी बुक करणे किंवा विमा घेणे-प्रत्येक ठिकाणी आपली वैयक्तिक माहिती वापरली जाते. डिजिटल सुविधा आपले जीवन सोपे करतात परंतु त्यासाठी आपण माहिती हाताळणाऱ्या संस्थांवर विश्वास ठेवतो. डीपीडीपी कायदा संस्थांना वैयक्तिक माहिती गोळा करण्यास मनाई करत नाही. आजच्या काळात ते शक्यही नाही. मात्र हा कायदा सांगतो की माहिती योग्य कारणासाठी गोळा करावी, ती का घेतली जाते हे स्पष्ट करावे, योग्य सुरक्षा उपायांनी तिचे संरक्षण करावे आणि तिचा जबाबदारीने वापर करावा.

सुरुवातीलाच एक महत्त्वाची गोष्ट समजून घेणे आवश्यक आहे. डीपीडीपी कायदा हा मुख्यतः डिजिटल वैयक्तिक माहितीचा कायदा आहे. तो संकेतस्थळे, मोबाईल ॲप्स, सॉफ्टवेअर, ई-मेल, इलेक्ट्रॉनिक नोंदी आणि क्लाऊड प्रणाली याद्वारे गोळा किंवा वापरल्या जाणाऱ्या वैयक्तिक माहितीला लागू होतो. एखादी माहिती प्रथम कागदावर घेतली असली, पण नंतर ती संगणक, एक्सल शीट, क्लिनिक मॅनेजमेंट सिस्टिम किंवा इतर कोणत्याही डिजिटल नोंदीमध्ये टाकली गेली, तरीही हा कायदा लागू होऊ शकतो. मात्र, पूर्णपणे कागदी स्वरूपात ठेवलेल्या आणि कधीही डिजिटल न केलेल्या फाईल्स किंवा रजिस्टरवर हा कायदा सामान्यतः थेट लागू होत नाही. तरीही अशा कागदी नोंदींबाबत इतर कायदे, व्यावसायिक गोपनीयतेची कर्तव्ये आणि संस्थेच्या जबाबदाऱ्या लागू राहू शकतात.

या लेखमालेत काही तांत्रिक संज्ञा वारंवार येतील. डाटा प्रिंसिपल (ज्या व्यक्तीची वैयक्तिक माहिती प्रक्रिया केली जाते ती व्यक्ती), डाटा फिडीशिअरी (वैयक्तिक माहिती कोणत्या उद्देशासाठी आणि कशी वापरायची हे ठरवणारी व्यक्ती किंवा संस्था), कन्सेंट (योग्य त्या प्रसंगी माहिती प्रक्रिया करण्यासाठी दिलेली संमती) आणि नोटीस (माहिती का व कशी वापरली जाणार आहे याची पूर्वकल्पना देणारी सूचना). या सर्व संज्ञा आपण पुढील लेखांत सोप्या उदाहरणांद्वारे समजून घेऊ.

हा कायदा केवळ मोठ्या तंत्रज्ञान कंपन्यांसाठी नाही. बँका, रुग्णालये, दवाखाने, शाळा, महाविद्यालये, व्यावसायिक, गृहनिर्माण संस्था, स्वयंसेवी संस्था आणि ऑनलाईन व्यवसाय - हे सर्व डिजिटल वैयक्तिक माहितीवर काम करतात. त्यामुळे हा कायदा प्रत्येक नागरिकाशी तसेच प्रत्येक संस्थेशी संबंधित आहे.

या लेखमालेचा उद्देश एकच आहे - कायदा सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत सांगणे. आवश्यक त्या ठिकाणी कायद्यातील तांत्रिक शब्द वापरले जातील परंतु त्यांचा सोपा अर्थ कंसात दिला जाईल. प्रत्येक लेखात आपल्या दैनंदिन जीवनातील उदाहरणे असतील.

डिजिटल गोपनीयता हा आता केवळ वकील किंवा तंत्रज्ञान तज्ज्ञांचा विषय राहिलेला नाही. स्मार्टफोन वापरणाऱ्या, यूपीआयद्वारे पैसे भरणाऱ्या, डॉक्टरांकडे जाणाऱ्या, ऑनलाईन खरेदी करणाऱ्या प्रत्येक नागरिकाशी तो संबंधित आहे. आपल्या हक्कांबरोबरच जबाबदाऱ्या समजून घेतल्या तर आपण अधिक सुरक्षित डिजिटल भविष्य घडवू शकतो.

**दैनंदिन जीवनातील डीपीडीपी :** तुम्ही दवाखान्यात जाता. स्वागत कक्षावर तुमचे नाव, मोबाईल क्रमांक, पत्ता, वय आणि ई-मेल विचारले जाते. आपण कधी विचार करता का की ही प्रत्येक माहिती का आवश्यक आहे? डीपीडीपी कायदा संस्थांनी पारदर्शकपणे माहिती मागावी आणि नागरिकांनीही माहितीचा वापर कसा होणार आहे याबाबत जागरूक राहावे, असा संदेश देतो.

**लक्षात ठेवण्यासारखे मुद्दे :** डीपीडीपी कायदा डिजिटल सेवांना अडथळा निर्माण करण्यासाठी नसून वैयक्तिक माहितीचा जबाबदारीने वापर सुनिश्चित करण्यासाठी आहे.

- हा कायदा नागरिक आणि माहिती प्रक्रिया करणाऱ्या संस्था दोघांनाही लागू होतो.
- कायद्यातील काही मूलभूत संकल्पना समजल्या तर आपल्या हक्कांची जाणीव वाढते.
- जागरूकता ही डिजिटल गोपनीयतेच्या संरक्षणाची पहिली पायरी आहे.

**विचार करा... :** पुढच्या वेळी कोणी तुमचा मोबाईल क्रमांक, आधारची माहिती किंवा वैद्यकीय माहिती मागितली तर एक क्षण थांबा आणि स्वतःला विचारा- ही माहिती का आवश्यक आहे आणि तिचे संरक्षण कसे केले जाणार आहे? हाच प्रश्न डीपीडीपी कायद्याचा मूलभूत विचार आहे. ■

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# भाषा, गुन्हे आणि फेन्या

एखादी भाषा 'बोलण्यावरून' आणि 'वाचण्यावरून' सध्या आपल्याकडे बराच धुरळा उडाला आहे. विशिष्ट भाषा बोलण्याचा हा आग्रह आता दुराग्रह बनतो आहे. आपल्या संस्कृतीप्रमाणेच आपली भाषाही सर्वसमावेशक आहे आणि म्हणूनच कालौघात आलेले बदल स्वीकारून ती अद्ययावत होत राहिलेली आहे. आता युवा पिढीने मातृभाषेत एक नवीच बाराखडी जोडून, अलगद जेन झी भाषा अस्तित्वात आणली. पण, जागतिक इतिहासात सगळ्याच भाषांची जडणघडण कदाचित इतकी सोपी नव्हती. रशियाच्या तुरुंगात फेन्या नावाची भाषा कैद्यांनी जन्माला घातली आणि आज ती सायबर गुन्हेगारांच्या संवादाचे माध्यम बनली आहे. अभिजाततेच्या आजच्या टप्प्यावर फेन्याच्या विकासातील टप्प्यांचा वेध घेण्याचा हा प्रयत्न!

सोव्हिएत युनियनच्या कम्युनिस्ट पार्टीचे महासचिव जोसेफ स्टॅलिन यांच्या गुलाग तुरुंगांमध्ये फेन्याचा जन्म झाला. ही सांकेतिक भाषा तुरुंगातील गार्ड्सना गोंधळात टाकण्यासाठी वापरली जात असे. फेन्याचा प्रसार होण्यामागे स्टॅलिनचा काळ आणि गुलाग व्यवस्थाच कारणीभूत ठरली. म्हणूनच ही भाषा जगातील सर्वाधिक पसरलेल्या गुप्त भाषांपैकी एक बनली. ही गुन्हेगारांची भाषा शेकडो वर्षांपासून अंडरवर्ल्डमधील लोक इतरांना गोंधळात टाकण्यासाठी, अटक टाळण्यासाठी किंवा पळवाटा शोधण्यासाठी वापरत आहेत. पूर्वी ही भाषा तुरुंगातील रक्षकांना गोंधळात टाकण्यासाठी वापरली जात होती तसेच, आता हीच भाषा इंटरनेटवर सायबर गुन्हेगार आपले हेतू लपवण्यासाठी आणि अधिकाऱ्यांना गोंधळात टाकण्यासाठी वापरत आहेत. उदाहरणार्थ, रशियन भाषेत मायकॉप म्हणजे साधारणपणे कचरा असा अर्थ होतो. पण, फेन्या भाषेत आज त्याचा अर्थ पोलिस असा घेतला जातो. एका लोकप्रिय पण वादग्रस्त सिद्धांतानुसार, या भाषेची सुरुवात ओफेनी नावाच्या रशियाभर पायी फिरून धार्मिक वस्तू विकणाऱ्यांपासून झाली. सतराव्या शतकात एका धार्मिक वादानंतर विक्रेत्यांच्या वस्तूंना धर्मविरोधी ठरवण्यात आले. त्यामुळे या भटक्या विक्रेत्यांनी संवाद साधण्यासाठी बोलण्याची गुप्त पद्धत विकसित केली. फेन्या भाषेत सुमारे १० ते २७ हजार शब्द आहेत. झारशाहीच्या अखेरच्या काळात, समाजातील सुशिक्षित आणि बुद्धिजीवी लोकांना गुन्हेगारांच्या या गुप्त जगाविषयी खूप कुतूहल, आकर्षण वाटू लागले. याच आकर्षणातून व्हॅगाबॉण्ड म्युझिक हा संगीतप्रकार लोकप्रिय झाला. १९२२ मध्ये रशियन गृहयुद्ध जिंकून सोव्हिएत संघाची स्थापना केल्यानंतर बोल्शेविकांनी तुरुंग छावण्यांचा विस्तार केला. या छावण्यांमध्ये गुन्हेगारांसोबत सामान्य लोकांनाही ठेवल्यामुळे अनेकांना फेन्या प्रत्यक्ष ऐकण्याची आणि शिकण्याची संधी मिळाली. १९५३ मध्ये सामूहिक माफी जाहीर झाल्यामुळे १० लाखांहून अधिक कैदी तुरुंगातून मुक्त झाले. हे छोटे गुन्हेगार मोठ्या संख्येने गुलागमधून बाहेर पडले आणि ते आपल्या घरी परतले. ते फेन्या भाषा आपल्यासोबत घेऊन आले. १९९१ मध्ये सोव्हिएत संघाचे विघटन होईपर्यंत, फेन्या ही भाषा लोककथेचा भाग बनून रुजली होती. गंमत म्हणजे, तुरुंगांमध्ये फेन्या भाषा बोलण्यावर बंदी होती, परंतु सरकारी अधिकाऱ्यांनी स्वतः मात्र याच भाषेत बोलणे सुरू ठेवले. २१व्या शतकाच्या सुरुवातीला फेन्या दैनंदिन भाषेत मिसळली आणि त्याच वेळी डिजिटल क्रांतीमुळे तिचा एका नव्या क्षेत्रातही विकास झाला. त्यांच्या मुद्दामहून केलेल्या चुकीच्या स्पेलिंग्स आणि रचनांमधून पडोंकी नावाची नवी स्लँग भाषा तयार झाली. दर महिन्याला लाखो लोक ऑनलाईन ही भाषा वापरतात. त्यामुळे अनेक रशियन लोकांना ही भाषा समजते, पण त्यापैकी सगळेच गुन्हेगार नसतात. ही भाषा मुद्दाम रशियन भाषेचे संकेत मोडते. इंग्रजीमधून घेतलेले शब्दही वापरले जातात, पण त्यांचे अर्थ बदलून वेगळ्या अर्थाने वापरले जातात. जेव्हा फेन्या भाषेतील शब्द सायबर जगतात दिसतात, तेव्हा त्यामागे एक वेगळाच एकत्रित प्रभाव असू शकतो. फेन्या भाषा आणि सायबर गुन्हेगारांची बोलीभाषा मिळून एक गुंतागुंतीचे आणि समजायला कठीण असे भाषिक जाळे तयार होते. या सगळ्या पृष्ठभूमीवर आपल्याला 'तयार' मिळालेल्या समृद्ध मायमराठीची जपणूक करणेही जमणार नसेल तर... ■

९२२३७००२७७

## वाचक पत्र

### अवतार मेहेर बाबांच्या १०१ व्या मौनदिनानिमित्त

प्रत्येकाच्या ह्दयात सुप्त असलेले ईश्वरी प्रेमाचे बीज जागृत करण्यासाठी मेहेरबाबांनी १० जुलै १९२५ पासून महामौनास प्रारंभ केला. ३१ जानेवारी १९६९ पर्यंत अर्थात भौतिक शरीर त्यागेपर्यंत अखंड ४४ वर्षे मौन पाळले. मौन ही ईश्वराचा मूळ स्वभाव आहे. या संपूर्ण विश्वामध्ये अखंड ४४ वर्षे मौन राहून जगाला मौनामध्ये किती प्रचंड शक्ती साठविली असल्याची जाणीव करून दिली. मेहेरबाबांचे मौन सर्वार्थाने अलौकिक होते. साधक हा स्वतःकरिता आध्यात्मिक दृष्टीने मौन पाळतो. परंतु, अवतार हा संपूर्ण विश्व कल्याणार्थ मौन पाळतो. या अवतार काळात वैखरी वाणीचा उपयोग केला नाही. आता दिलेले उपदेश आचारणामध्ये आणण्याची आज गरज आहे. एका संदेशात बाबा म्हणतात, मी शिकविण्याकरिता नसून जागृत करण्याकरिता आलो आहे. भगवद्गीतेत मौन मी आहे. ज्ञानीजनामध्ये ज्ञान मी आहे. भगवान श्री कृष्णाने गीतेमध्ये मौन हे सर्वश्रेष्ठ असल्याचे प्रतिपादन केले. त्याचप्रमाणे संत ज्ञानेश्वर महाराज सांगतात. 'म्हणोणी माझी वैखरी मौनाचेही मौन करी.' ईश्वराला जाणण्याचा मार्ग मौनच आहे. मौन हे ऊर्जास्त्रोताचे भरपूर भांडार आहे. मौनास प्रमाणिकपणे सुरुवात केली तर विचाराला तिथे थाराच नसतो. प्रत्येकाने थोड्या प्रमाणात का होईना १० जुलैला अवतार मेहेरबाबांच्या दैवी आनंदाचा लाभ घ्यावा. अवतार मेहेरबाबांच्या मौन दिनानिमित्त कोटी कोटी प्रमाण. ■

**अरुण पोथे**/संयोजक, मेहेर सत्संग वर्धा

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# पंकजाताई मुंडेंनी घेतली उप मुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची भेट

## बीड जिल्हयातील विविध विकासाच्या मुद्द्यावर चर्चा



**मुंबई दि. १० :** राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आज उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांची भेट घेऊन बीड जिल्हयाच्या विविध विकास प्रश्नांवर सकारात्मक चर्चा केली. परळी येथे होणाऱ्या नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या भूमिपूजनाचे निमंत्रण त्यांनी यावेळी सुनेत्राताईंना दिले.

ना. पंकजाताई मुंडे यांनी आज दुपारी देवगिरी बंगल्यावर उप मुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची भेट घेतली. या प्रसंगी बीड जिल्ह्याच्या विविध विकासकामांच्या संदर्भात त्यांच्याशी अतिशय सकारात्मक चर्चा झाली.या भेटी दरम्यान, परळी वैजनाथ येथे नव्यानेच होत असलेल्या 'पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या' भूमिपूजन सोहळ्याचे आग्रहाचे निमंत्रणही त्यांनी सुनेत्राताईंना दिले. जिल्ह्याच्या प्रगतीसाठी आणि लोककल्याणाच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरेल, असा विश्वास ना.पंकजाताईंनी यावेळी व्यक्त केला.

# आकांक्षित तालुका कार्यक्रमाचा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी घेतला आढावा

**बीड, दि. 09 (जिमाका):-** केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी आकांक्षित तालुका कार्यक्रम अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या संपूर्णता अभियान २.० चा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात सविस्तर आढावा घेतला. वडवणी तालुक्याचा विकास आराखडा गतिमान करतानाच, यामध्ये कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा त्यांनी यंत्रणेला दिला.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीला प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी दिव्यांक गुप्ता, जिल्हा नियोजन अधिकारी शिला मिसाळ, पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किशोर काळे, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी राधाकिसन इघारे यांच्यासह विविध संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी श्री.जॉन्सन यांनी वडवणी तालुक्यातील आरोग्य, शिक्षण, जन्म-मृत्यू दर आणि शेतीविषयक प्रयोगांची सखोल माहिती घेतली. तालुक्यात जलसंधारणाची कामे अधिक प्रभावीपणे होणे गरजेचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. ग्लोबल विकास ट्रस्टकडून झालेले नदी खोलीकरणाचे काम कौतुकास्पद असून, त्यांना सोबत घेऊन काम करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. तसेच, तालुक्यातील नाला खोलीकरण आणि शेततळे खोलीकरणाच्या कामांना अधिक गती देण्यासाठी गटविकास अधिकाऱ्यांनी स्वतः विशेष प्रयत्न करावेत, असे आदेश त्यांनी दिले.

कृषी विभागाचा आढावा घेताना जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी पोकरा योजनेतील त्रुटींवर बोट ठेवले. वडवणी तालुक्यात पोकरा अंतर्गत रेशीम शेतीचे प्रमाण अत्यंत नगण्य असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. आगामी काळात रेशीम शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढवण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे आदेशही त्यांनी दिले. यासोबतच, शासनाच्या धोरणानुसार मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून प्रत्येक पात्र शेतकऱ्याला सौर पंप उपलब्ध करून देण्याची सूचना त्यांनी कृषी व महावितरणच्या अधिकाऱ्यांना केली.

ग्रामीण भागातील जीवनमान उंचावण्यासाठी आरसेटी प्रशिक्षणे, मुद्रा बँक कर्ज योजना, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, आणि प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या आर्थिक योजनांचा लाभ तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचे निर्देशही देण्यात आले. याशिवाय, ग्रामीण भागातील प्रलंबित घरकुलांची कामे तातडीने पूर्ण करणे आणि आरोग्य उपकेंद्रांच्या दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करण्याबाबत त्यांनी संबंधित यंत्रणेला सूचना दिल्या.

# कास्ट व्हॅलेडीटीसाठी लाच स्वीकारताना एसीबीच्या जाळ्यात

बीड(प्रतिनिधी) दिनांक १० जुलै शुक्रवार रोजी दुपारी बीड येथील समाज कल्याण कार्यालयातील जात पडताळणी (कास्ट व्हॅलिडिटी) विभागातील अधिकारी अण्णासाहेब राठोड याने जात पडताळणी प्रमाणपत्राच्या कामासाठी ₹३ हजारांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात पकडले. ही कारवाई त्यांच्या स्वतःच्या कार्यालयात करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, जात पडताळणीचे काम करून देण्यासाठी तक्रारदाराकडे ₹३ हजारांची मागणी करण्यात आली होती. तक्रारदाराने एसीबीकडे तक्रार दिल्यानंतर सापळा रचण्यात आला. त्यामध्ये अण्णासाहेब राठोड लाचेची रक्कम स्वीकारताना जेरबंद झाले.

बीड शहरातील जात पडताळणी विभागात मागील काही महिन्यांपासून विद्यार्थी आणि नागरिकांकडून जात प्रमाणपत्र व जात पडताळणीच्या कामांसाठी व पडताळणी मधील त्रुटी काढण्यासाठी पैशांची मागणी होत असल्याच्या तक्रारी होत होत्या. मात्र, अनेक नागरिक तक्रार करण्यास धजावत नसल्याचे बोलले जात होते. अखेर एसीबीच्या कारवाईमुळे या चर्चांना पुष्टी मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

गेल्या काही महिन्यांत बीड शहर आणि जिल्ह्यात विविध शासकीय कार्यालयांतील लाचखोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे चित्र असून, पैसे दिल्याशिवाय काम होत नसल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत आहेत. त्यामुळे प्रशासनातील पारदर्शकता आणि जबाबदारीबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

ही कारवाई उपअधीक्षक सोपान चिटमपल्ली यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पथकाने केली. पथकात मच्छिंद्र बिडकर, अमोल खरसाडे, पांडुरंग काचगुंडे, प्रदीप सुरवसे, बिभीषण सांगळे, राजकुमार आघाव आणि अंबादास पुरी यांचा समावेश होता. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# पंकजाताई मुंडेंमुळे परळी तालुक्यातील कौठळी, नंदनज, दौनापूर, डिग्रससह पाच ग्रामपंचायतींना मिळणार स्वतंत्र इमारत

## एक कोटी 10 लाखाचा निधी मंजूर

**परळी वैजनाथ दि. ०९ :** राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्यामुळे तालुक्यातील पाच ग्रामपंचायतींना स्वतंत्र इमारत मिळणार असून त्यासाठी एक कोटी १० लाखाचा निधी मंजूर झाला आहे. ग्रामविकास विभागाने तसा जीआर निर्गमित केला आहे.

ना. पंकजाताई मुंडे यांनी बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेतंर्गत परळी तालुक्यातील ज्या गावांना ग्रामपंचायतीची स्वतंत्र इमारत नाही अशांना स्वतंत्र इमारत द्यावी अशी शिफारस केली होती, त्यांनी केलेल्या शिफारशीनुसार कौठळी (२५ लाख) नंदनज (२० लाख) डिग्रस (२० लाख) दौनापूर (२५ लाख) आणि परचुंडी (२० लाख) या ग्रा.प. ना निधी मंजूर झाला आहे, यातील परचुंडी ग्रामपंचायतीला यापूर्वी इमारत बांधकामासाठी निधी मंजूर झाला असल्याने त्याऐवजी दादाहरी वडगाव ग्रा. पं.सुचविण्यात आली आहे, त्याचे शुध्दीपत्रक लवकरच निर्गमित होणार आहे. दरम्यान गेल्या कित्येक वर्षांपासूनची ग्रामस्थांची मागणी पूर्ण झाल्याबद्दल संबंधित गावच्या सरपंच व ग्रामस्थांनी ना. पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले आहेत.

# संत श्री गजानन महाराजांच्या पालखीचे स्वागत करून राजकिशोर मोदींनी घेतले दर्शन

## टाळ-मृदुंगाच्या गजरात अंबानगरीत संत श्री गजानन महाराजांच्या पालखीचे आगमन

**अंबाजोगाई :** संतश्रेष्ठ श्री गजानन महाराज यांच्या पालखीचे अंबाजोगाई शहरात शुक्रवारी टाळ - मृदुंगाच्या गजरात, विठू नामाच्या गजरात मोठ्या उत्साहात आगमन झाले. शहरात आगमन होताच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे नेते व अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन राजकिशोर मोदी यांनी संत श्री गजानन महाराज यांच्या पालखीस पुष्पहार व महाराजांच्या मूर्तीस पुष्पअर्पण करून स्वागत केले. तसेच यावर्षी मुबलक प्रमाणात पाऊस पडावा, बळीराजा शेतकरी सुखी, समृद्धी होवून जिल्हासह महाराष्ट्र राज्याची धनधान्याने, मुबलक जलसंपदा होवून भरभराट व्हावी अशी प्रार्थना मोदी यांनी विठुरायाकडे केली.



यावेळी पापा मोदी यांच्या समवेत नगरसेवक आकाश कराड, शैलेश गोस्वामी, अंकुश हेडे, शैलेश गारठे आदीजण उपस्थित होते. शहरात पालखीच्या स्वागतासाठी रस्त्यावर जागोजागी सुंदर रांगोळी काढून अंबानगरी सज्ज झाली होती. काही दिवसांपूर्वीच आषाढी वारीसाठी संत श्री गजानन महाराजांच्या पालखीचे शेगाव येथून प्रस्थान झाले आहे. दोनच दिवसांच्या परळी येथील मुक्कामानंतर पालखीचे आज शुक्रवार, दिनांक १० जुलै रोजी दुपारी अंबाजोगाई शहरात आगमन झाले. टाळ-मृदंगाच्या तालावर शेकडो वारकर्यांनी ज्ञानेश्वर माऊली, ज्ञानराज माऊली तुकारामांच्या नामाचा गजर करून ठेका धरला. पंढरीनाथ महाराज की जय, विठ्ठल विठ्ठल श्रीहरी विठ्ठल, संत गजानन महाराज की जय, गण गण गणात बोते या जयघोषांनी आसमंत उजळून निघाला होता. एकापाठोपाठ सुंदर अशा चालीवर भजन करीत या वारकर्यांनी अंबाजोगाई शहर अक्षरशः दणाणून सोडले. यासंदर्भात आपल्या स्वागतपर भावना व्यक्त करताना पापा मोदी म्हणाले की, पूर्वीपासून अंबाजोगाई शहरात या पालखी सोहळ्यामध्ये हत्ती, घोडे असा लवाजमा पहायला लहान थोर सर्व गर्दी करायचे परंतु, गेल्या काही वर्षांपासून फक्त आश्वच या सोहळ्यामध्ये सहभागी होत आहे.

प्रस्थानाच्या मार्गावर विविध गावांमध्ये शहरांमध्ये संत गजानन महाराज पालखीचे उत्स्फूर्तपणे स्वागत आणि पूजा केली जाते. पालखीत शेगाव येथून शेकडो वारकरी, अश्व आणि सहभागी होतात. यात काही टाळकरी तर काहींच्या हाती भगव्या पताका आहेत.

संत गजानन महाराज पालखी सोहळा हा अत्यंत शिस्तबद्ध रीतीने मार्गक्रमण करणारा म्हणून ओळखला जातो. श्री संत गजानन महाराज पालखीचा मुक्काम अंबाजोगाई शहरात होणार असून पुढे संत गजानन महाराज यांच्या पालखीचे पंढरपूरसाठी अंबाजोगाई शहरातून प्रस्थान होईल. असे अंबाजोगाईचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी सांगितले.

# शहर पाणी पुरवठा योजनेचा उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याकडून आढावा

## दोषी कंत्राटदारावर कारवाईचे निर्देश

**बीड दि.9,(जिमाका):** महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांनी अमृत-१ योजनेअंतर्गत बीड शहर पाणी पुरवठा योजनेचा सविस्तर आढावा घेतला. योजना मंजूर होऊनही बीड शहराला अद्याप पाणी मिळत नसल्याबद्दल त्यांनी तीव्र खंत व्यक्त केली. या योजनेची पूर्ण जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची असल्याने, कामचुकार आणि दोषी संबंधित कंत्राटदारावर नियमानुसार तातडीने योग्य ती कारवाई करावी, असे कडक निर्देश त्यांनी यंत्रणेला दिले आहेत. आढावा बैठकीत नगरपरिषदेच्या थकबाकीचा मुद्दाही समोर आला. नगरपरिषदेची वीज बिलाची थकबाकी असल्याने महावितरणकडून वाढीव विद्युत भार मंजूर केला जात नाही, ज्यामुळे ही पाणी पुरवठा योजना सध्या पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होऊ शकलेली नाही, अशी माहिती यावेळी देण्यात आली. या बैठकीला जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे हे प्रत्यक्ष उपस्थित होते. तर बीडचे खासदार बजरंग सोनवणे, आमदार विजयसिंह पंडित, आमदार प्रकाश सोळंके, आमदार सुरेश धस, आणि आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासह संबंधित विविध यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी ऑनलाइन पद्धतीने या बैठकीत सहभागी झाले होते.

# वॉर्ड क्रमांक 25 मध्ये 'एसआयआर मॅपिंग' नोंदणी आणि पडताळणी शिबिराचे विशेष आयोजन

**बीड (प्रतिनिधी):-** लोकशाही बळकट करण्यासाठी आणि आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक नागरिकाचे नाव मतदार यादीत अचूक असणे अत्यंत आवश्यक आहे. हीच बाब लक्षात घेऊन बीड शहरातील वॉर्ड क्रमांक 25 मध्ये 'एसआयआर मॅपिंग' नोंदणी आणि पडताळणी शिबिराचे विशेष आयोजन युवा नेते नगरसेवक ॲड. गोविंदा भैया शिराळे पाटील यांचे जनसंपर्क कार्यालय, ओम नमो सदन, जिजाऊ नगर, रेणू हॉस्पिटल समोर, बार्शी रोड बीड या ठिकाणी बीड येथे शनिवार दि. 11 व रविवार 12 जुलै ठिक सकाळी 11.30 ते सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत करण्यात आले आहे. वॉर्डातील सर्व नागरिकांनी आपल्या कुटुंबियांसह या शिबिराला उपस्थित राहून आपली नोंदणी पूर्ण करावी, असे जाहीर आवाहन भाजपा नगरसेवक नगरसेवक ॲड. गोविंदा भैया शिराळे पाटील यांनी केले आहे.ङ्घया विषयी सविस्तर माहिती अशी की, बीड शहरातील वॉर्ड क्रमांक 25 मध्ये 'एसआयआर मॅपिंग' नोंदणी आणि पडताळणी शिबिराचे विशेष आयोजन करण्यात आले आहे. वॉर्डातील सर्व नागरिकांनी आपल्या कुटुंबियांसह या शिबिराला उपस्थित राहून आपली नोंदणी पूर्ण करावी, नागरिकांच्या सुविधेसाठी आणि ही प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी शिबिरस्थळी अधिकृत बीएलओ (एसआयआर) अधिकारी आणि बूथस्तरीय कार्यकर्ते पूर्ण वेळ उपलब्ध राहणार आहेत.

# टाळ मृदुंगाच्या गजरात संत गजानन महाराजांच्या पालखीचे अंबाजोगाईत आगमन :भाविकांनी घेतले दर्शन

**अंबाजोगाई :** शेगाव येथून पंढरपूरकडे निघालेल्या संत गजानन महाराजांच्या पालखीचे टाळ – मृदुंगाच्या गजरात आज शुक्रवार दिनांक 10 जूलैला दुपारी शहरात आगमन झाले आहे. पालखीच्या स्वागतासाठी अंबाजोगाई नगरी सज्ज झाली होती. ठिकठिकाणी मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात भाविकांनी पालखीचे स्वागत करत दर्शन घेतले. त्यामुळे शहरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. महिलांनीही पालखीच्या स्वागतासाठी रांगोळ्या काढल्या होत्या.



संत गजानन महाराजांची पालखी अंबाजोगाई येथे अनेक वर्षांपासुन येत आहे व त्या पालखीचे स्वागत मोठ्या उत्साहात भाविकांच्या वतीने करण्यात येते. त्याच बरोबर या पालखीच्या निमित्ताने विविध कार्यक्रमही शहरात घेतली जातात.

जून महिन्यात आषाढी वारीसाठी संत गजानन महाराजांच्या पालखीचे शेगाव येथुन प्रस्थान झाले आहे. आज 10 जूलैला पालखीचे अंबाजोगाईत आगमन झाले. पालखीचे हे 56 वे वर्ष असून शेगाव येथून मोठ्या प्रमाणात वारकरी पालखीत सहभागी आहेत. यात काही टाळकरी तर काहींच्या हातात भगवा पताका आहे. संत गजानन महाराज पालखी सोहळा हा अत्यंत शिस्तबद्ध म्हणून ओळखला जातो.

पालखीचा मुक्काम अंबाजोगाई शहरात होणार असून रात्री भजन –कीर्तन कार्यक्रम होणार आहे. तर सकाळी 8 वाजता पालखीचे पंढरपूरसाठी अंबाजोगाई शहरातून प्रस्थान होईल.

# पेठ बीड पोलिसांचा गुटखा माफियाला पुन्हा दणका

## 10.57 लाखांचा गुटखा व दोन वाहने जप्त

**बीड(प्रतिनिधी) :** पेठ बीड पोलिसांनी प्रतिबंधित गुटखा वाहतुकीविरोधात सलग दुसऱ्यांदा मोठी कारवाई करत तब्बल 10 लाख 57 हजार 840 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील गुटखा माफियात मोठी खळबळ उडाली असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हा क्रमांक 226/2026 हा भारतीय न्याय संहितेच्या कलम 123, 223, 274, 275, 3(5) अन्वये दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात मोसीन सलाउद्दिन शेख (वय 34, रा. मोमीनपुरा, पेठ बीड) आणि अरबाज मुसा शेख (वय 22, मूळ रा. उफळी, ता. वडवणी, सध्या युनूस पार्क, तेलगाव रोड, बीड) यांना आरोपी करण्यात आले आहे.

दि. 9 जुलै 2026 गुरुवार रोजी रात्री सुमारे 9.30 वाजण्याच्या सुमारास बीड-बार्शी रोडवरील लॉ कॉलेजसमोर पेठ बीड पोलिसांच्या डीबी पथकाने सापळा रचून ही कारवाई केली. आरोपी त्यांच्या ताब्यातील स्विफ्ट कार व इनोव्हा वाहनातून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला हिरा पान मसाला, रॉयल तंबाखू व इतर गुटखा विक्रीच्या उद्देशाने वाहतूक करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. कारवाईदरम्यान पोलिसांनी प्रतिबंधित गुटखा, दोन वाहने असा एकूण 10,57,840 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पोलीस हवालदार नितीन माणिकराव राठोड यांनी फिर्याद दिली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मन्सूर शहा यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत,अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख व उपविभागीय पोलीस अधिकारी वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निलेश केळे यांच्या नेतृत्वाखाली api उबाळे,psi मन्सूर शहा,पोलीस हवालदार नितीन राठोड,पो.अं.अल्ताफ शेख,मोटे,औदुंबर गिरी,पांडुरंग परझने तसेच चालक नवले यांनी सहभाग घेतला.

विशेष म्हणजे, अवघ्या चार दिवसांपूर्वीही पेठ बीड पोलिसांनी बार्शी नाका परिसरात गुटखा वाहतूक करणारी कार पकडली होती. सलग दुसऱ्यांदा झालेल्या या धडक कारवाईमुळे जिल्ह्यातील गुटखा तस्करांचे धाबे दणाणले असून, अवैध गुटखा व्यापाराविरोधातील पोलिसांची मोहीम अधिक तीव्र झाल्याचे दिसून येत आहे.

# बीएलओंच्या उत्कृष्ट कार्याचा जिल्हाधिकारी यांच्या हस्ते सन्मान

**बीड दि.10(जिमाका):** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात सध्या सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम-२०२६ अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचा (बीएलओ) बीडचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते अभिनंदन प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन विशेष गौरव करण्यात आला. या प्रसंगी उपजिल्हा निवडणूक अधिकारी मनोज घोडे पाटील यांची उपस्थिती होती.

भारत निवडणूक आयोगाच्या १४ मे २०२६ च्या पत्रानुसार महाराष्ट्र राज्यात ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत बीएलओमार्फत घरोघरी भेटी देऊन गणना अर्जांचे वितरण आणि संकलन करण्याचा अत्यंत महत्त्वाचा उपक्रम राबविला जात आहे. या पार्श्वभूमीवर, बीड जिल्ह्यातील मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी आपल्या नियुक्त यादी भागातील सर्व मतदारांना प्रत्यक्ष गणना अर्जांचे वितरण करून ते स्वीकारले. तसेच, आयोगाच्या 'ECINET' संगणक प्रणालीमध्ये बीएलओ ॲपद्वारे सर्व गणना अर्जांचे डिजिटल वितरण व स्वीकृतीची १०० टक्के प्रक्रिया अत्यंत जबाबदारीने आणि कार्यक्षमतेने पूर्ण केली.

विशेष म्हणजे दि.२९ जुलै २०२६ पर्यंत चालणाऱ्या या मोहिमेचे संपूर्ण कामकाज या अधिकाऱ्यांनी नियोजित मुदतीपूर्वीच म्हणजेच दि.१० जुलै २०२६रोजी यशस्वीरित्या पूर्ण केले. बीएलओंच्या या तत्परता, प्रामाणिकपणा आणि उत्कृष्ट कार्यक्षमतेमुळे निवडणूक प्रक्रियेला गती मिळाली असून त्यांच्या या उल्लेखनीय योगदानाबद्दल जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांचे कौतुक केले. तसेच भविष्यातही याच समर्पित भावनेने काम करण्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# धर्म वेगवेगळा असला तरी कायदा एकच!' महाराष्ट्रात समान नागरी कायद्याच्या दिशेने ऐतिहासिक पाऊल

## डॉ. प्रशांत पाटील यांच्याकडून देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन!

**बीड :** "धर्म कोणताही असला तरी कायदा सर्वांसाठी एकच असेल. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानातील समानतेच्या तत्त्वाला बळ देण्यासाठी महाराष्ट्र सरकारने मोठे पाऊल उचलले आहे," अशी ऐतिहासिक घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली. महाराष्ट्रात समान नागरी कायदा (UCC) लागू करण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने आता अधिकृतपणे एका उच्चस्तरीय अभ्यास समितीची नियुक्ती केली आहे.

सरकारच्या या धाडसी आणि दूरगामी निर्णयाचे भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ. प्रशांत पाटील यांनी जाहीर स्वागत केले असून, या ऐतिहासिक पावलासाठी त्यांनी देवेंद्र फडणवीस यांचे मनापासून अभिनंदन व आभार व्यक्त केले आहेत.

निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेत समिती!

**या कायद्याचा सखोल अभ्यास करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीत नामांकित कायदेतज्ज्ञ आणि विचारवंतांचा समावेश आहे:**

**अध्यक्ष:** न्यायमूर्ती रंजना देसाई

**सदस्य:** न्यायमूर्ती आर. सी. चव्हाण, न्यायमूर्ती एस. जी. मेहरे, डी. के. जैन, बिरेन्द्र सराफ, रमेश पतंगे आणि डॉ. सुवर्णा रावल.

"महाराष्ट्रात समान नागरी कायदा लागू होणारच, ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे! संविधानाने दिलेल्या समानतेच्या अधिकाराची ही खरी अंमलबजावणी असून, या क्रांतीकारी निर्णयासाठी मी भारताचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडणवीस लोकनेत्या व कॅबिनेट मंत्री पंकजाताई मुंडे यांच्यासह महाराष्ट्र सरकारचे मन:पूर्वक अभिनंदन करतो आणि त्यांचे आभार मानतो."

— डॉ. प्रशांत पाटील (भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य)

# संपादक राजेंद्र होळकर यांना मातृशोक

**बीड (प्रतिनिधी):-** दै. अभिमानचे संपादक राजेंद्र होळकर, संजय होळकर यांच्या मातोश्री द्वारकाबाई बाबुराव होळकर (वय 76) यांचे वृद्धापकाळाने गुरुवारी सायंकाळी राहत्या घरी निधन झाले.

गेल्या काही महिन्यांपासून त्या आजारी होत्या. उपचारा दरम्यान त्यांची गुरुवारी प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार दि. 10 जुलै रोजी सकाळी 9 वाजता भगवानबाबा प्रतिष्ठाण जवळील स्मशानभूमी, बार्शी रोड, बीड येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात मुले, मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# आपत्ती सौम्यीकरणाच्या कामांसाठी बाजारभावानुसार प्रस्ताव सादर करा

## जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या बैठकीत अधिकाऱ्यांना सूचना

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० जुलै**



जिल्ह्यात अलिकडच्या काळात वारंवार भूकंपाचे धक्के जाणवत असल्याच्या पार्श्वभूमीवर तसेच इतर नैसर्गिक आपत्तींचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पूर्वतयारी अधिक सक्षम करण्यावर भर दिला आहे. नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत त्वरित सूचना व इशारे देण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक गावात पब्लिक ॲड्रेस सिस्टीम कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक प्रस्ताव तयार करून सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समितीची आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी रोहित कंजे तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत भूकंपाच्या हालचालींचे वैज्ञानिक पद्धतीने निरीक्षण करण्यासाठी भूकंपग्रस्त गावांच्या परिसरात सिस्मो मशीन बसविण्याबाबत प्रस्ताव तयार करून शासनाकडे सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित यंत्रणांना दिले. या यंत्रणेमुळे भूकंपविषयक नोंदी संकलित होऊन भविष्यातील नियोजन आणि आपत्ती व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करता येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करावे, पूर्वतयारीला सर्वोच्च प्राधान्य द्यावे आणि नागरिकांच्या जीवित व वित्तहानीचे प्रमाण कमीत कमी राहील, यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबवाव्यात, असे निर्देशही जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

बैठकीत आपत्ती सौम्यीकरण योजनेअंतर्गत प्राप्त विविध प्रस्तावांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. संभाव्य नैसर्गिक आपत्तींचा प्रभाव कमी करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत चर्चा करण्यात आली. तसेच दुष्काळग्रस्त भागांमध्ये जलसंधारण व आपत्ती सौम्यीकरणाच्या दृष्टीने नालाखोलीकरण व सरळीकरणाची कामे हाती घेण्यासाठी प्राप्त प्रस्तावांचाही आढावा घेण्यात आला. यामध्ये हिंगोली तालुक्यातील कलगाव, खांबाळा, वैजापूर, भांडेगाव तसेच औंढा नागनाथ तालुक्यातील काकडधाबा आणि पांगरा तर्फे लाख या गावांमध्ये नालाखोलीकरण व सरळीकरणाची कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत.

यावेळी सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांमधील अंदाजित दर बाजारभावाच्या तुलनेत अधिक असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे संबंधित विभागांनी प्रत्यक्ष बाजारभावाचा आधार घेऊन वाजवी दराने सुधारित प्रस्ताव तातडीने सादर करावेत, अशा स्पष्ट सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिल्या. शासन निधीचा पारदर्शक, काटेकोर व परिणामकारक वापर होण्यासाठी प्रस्ताव वास्तववादी, तांत्रिकदृष्ट्या योग्य आणि बाजारभावाशी सुसंगत असणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

# डेंटल कॉलेजकडे जाणाऱ्या पर्यायी रस्त्याची तत्काळ दुरूस्ती करा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० जुलै**

हिंगोली शहरातून बळसोंड मार्गे डेंटल कॉलेजकडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या दुरवस्थेची तात्काळ डागडुजी करणे व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणावर जबाबदारी निश्चित करण्याबाबतचे निवेदन जिल्हाधिकार राहुल गुप्ता यांच्याकडे हिंगोली जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने देण्यात आले.सदर निवेदनाची तात्काळ दखल घेऊन जिल्हाधिकारी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सदर रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करा नसता प्रशासकीय कार्यवाही केल्या जाईल या शब्दात खडे बोल सुनावले.

हिंगोली शहरातून बळसोंड मार्गे डेंटल कॉलेजकडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाचे सध्या काम सुरू आहे. परंतु, सध्या वाहतुकीसाठी जो पर्यायी किंवा अस्तित्वातील रस्ता वापरला जात आहे, तो अत्यंत निकृष्ट दर्जाचा झाला आहे. या रस्त्यावर सलग आणि मोठे खड्डे पडले असल्यामुळे दुचाकी व चारचाकी वाहनधारकांना प्रवास करताना अत्यंत कठीण परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. सध्याची परिस्थिती अशी आहे की, या रस्त्यावरून चालकांना साधी दुचाकी चालवणेही अशक्य झाले आहे. वाहनचालकांचे नियंत्रण सुटून रोज लहान-मोठे अपघात घडत आहेत.

या राष्ट्रीय महामार्गाच्या कडेलाच दंत वैद्यकीय महाविद्यालय आहे या महाविद्यालयात शिक्षण घेणारे शेकडो विद्यार्थी, प्राध्यापक आणि रुग्णालय कर्मचारी यांना दररोज सक्तीने याच धोकादायक रस्त्यावरून प्रवास करावा लागतो. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे भविष्यातील डॉक्टरांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असून, अपघाताच्या भीतीमुळे विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर आणि शैक्षणिक कामकाजावर याचा विपरीत परिणाम होत आहे. रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांचे हाल तर अधिकच हाल अपेष्टांचे झाले आहेत.

पाऊस सुरू झाल्यानंतर या खड्ड्यांमध्ये पाणी साचून रस्त्याची परिस्थिती अत्यंत भयावह, चिखलमय आणि जीवघेणी होत आहे. त्यामुळे पावसाळा पूर्णपणे सक्रिय होण्यापूर्वी या रस्त्याची तात्काळ डागडुजी (खड्डे भरणे) करणे अत्यंत गरजेचे आहे.

महामार्गाचे काम करत असताना सुरक्षित आणि सुस्थितीतील पर्यायी रस्ता देणे ही संबंधित यंत्रणेची जबाबदारी आहे. या रस्त्यावर (विशेषतः कॉलेज परिसराच्या अवतीभवती) भविष्यात एखादा गंभीर किंवा प्राणांतिक अपघात झाल्यास, त्याला सर्वस्वी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (छकअख) आणि संबंधित कंत्राटदार जबाबदार असतील, याची नोंद घेण्यात यावी असेही निवेदनात नमुद आहे. निवेदनाची दखल घेऊन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी संबंधित यंत्रणेचे अधिकारी यांना दूरध्वनीवर संपर्क साधून सदर रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करावी नस्ता प्रशासना तर्फे कठोर कारवाई केल्या जाईल व ती वेळ प्राधिकरणाने येऊ देऊ नये याची दक्षता घ्यावी कशा कडक शब्दात सुनावले निवेदनावर हिंगोली जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष नंदकिशोर तोष्णीवाल, उपाध्यक्ष राजेश बगडीया यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शेतखरडणी अनुदान वितरणप्रकरणी अनियमितता, गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० जुलै**

कळमनुरी तालुक्यातील मौजे पिंप्री बु., कृष्णापूर आणि येगाव येथील बाधित शेतकऱ्यांना शेतखरडणी अनुदान वितरणात अनियमितता झाल्याप्रकरणी संबंधित सहायक कृषी अधिकारी एस. एस. संगमवार यांच्याविरुद्ध प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) दाखल करण्यात आला असून, संबंधित ग्राम महसूल अधिकारी श्री. एकनाथ कदम यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. तहसीलदार, कळमनुरी यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, शेतखरडणी अनुदान वितरणासाठी तयार करण्यात आलेल्या लाभार्थी यादीत सातबारा उताऱ्यावर नावे नसलेल्या व्यक्तींचा समावेश करण्यात आला होता. तसेच काही लाभार्थ्यांना प्रत्यक्ष क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्र दाखवून अतिरिक्त अनुदान वितरित करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.

या प्रकरणात संबंधित सहायक कृषी अधिकारी श्री. एस. एस. संगमवार यांनी शासकीय कामकाजात कसूर केल्याचे निष्पन्न झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे त्यांच्या जबाबदारीची निश्चिती करून पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याची शिफारस तहसीलदार, कळमनुरी यांनी केली होती.

त्यानुसार संबंधित सहायक कृषी अधिकारी एस. एस. संगमवार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यासाठी तहसीलदार, कळमनुरी यांना प्राधिकृत करण्यात आले होते. त्या अनुषंगाने तहसीलदारांनी संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) दाखल केला आहे.

याशिवाय या प्रकरणातील संबंधित ग्राम महसूल अधिकारी (बाळापूर सज्जा) एकनाथ कदम यांच्याविरुद्धही विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली असून, नियमानुसार पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यात येणार आहे.

शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता व उत्तरदायित्व राखण्यासाठी अनियमितता करणाऱ्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा प्रशासनाने इशारा दिला आहे.



**हिंगोली– शहरालगत असलेल्या प्रवीण नगर येथील रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असून पावसाचे पाणी या खड्डयात साचत असल्यामुळे रहीवाशांना वाहने चालवितांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तत्काळ रस्त्यांची दुरूस्ती करण्याची मागणी होत आहे. छाया– विजय गुंडेकर**

# नांदेड येथे आयुक्तालय स्थापनेबाबत लोकप्रतिनिधींनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० जुलै**

छत्रपती संभाजी नगर महसुली विभागाचे विभाजन करून नांदेड येथे मंजूर झालेल्या मराठवाड्यातील दुसऱ्या आयुक्तालयाची स्थापना करण्यात यावी या मागणीसाठी शुक्रवार दि १० जुलै रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली.

यावेळी नांदेड जिलह्यातील आमदारांनी आपल्या मागण्या त्यांच्यासमोर मांडल्या . मराठवाड्यातील छत्रपती संभाजी नगर येथे मागील अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या विभागीय मसूल आयुक्त कार्यालयाचे विभाजन करून या विभागातील नांदेड. परभणी, लातूर हिंगोली या चार जिल्ह्यासाठी स्वतंत्र महसूल आयुक्तालय नांदेड येथे स्थपन करण्याचा निर्णय जानेवारी २००९ मध्ये तत्कालीन शासनाने घेतला होता. आत सोळा वर्ष उलटून सुद्धा यावर कोणतीही कार्यवाही झाली नसल्याने आयुक्तालया अभावी अनेक अडचणीचा सामना करावा लागत असल्याची बाब मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिली. आयुक्तालय स्थापनेचा प्रश्न मार्गी लावण्याची विनंती केली.

नांदेड-मुंबई विमानसेवा दररोज (नियमित) सुरू करणे,

नवी मुंबई येथील नवीन विमानतळामुळे आता मुंबई विमानतळावर स्लॉट्स उपलब्ध होऊ शकतात. त्यामुळे नागरिकांच्या, व्यापाऱ्यांच्या आणि विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सकाळी नांदेड ते मुंबई आणि रात्री मुंबई ते नांदेड अशी दररोज नियमित विमानसेवा सुरू करण्यात यावी. यामुळे नांदेडसह लातूर, हिंगोली, परभणी या शहरांनाही मोठा फायदा होईल. यावेळी आमदार हेमंत पाटील, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, बाबुराव कदम कोहळीकर,आमदार आनंदराव पाटील तिडके, बालाजी कल्याणकर, आमदार राजेश पवार, आमदार तुषार राठोड, आमदार भीमराव केराम, यांची उपस्थिति होती.

# पाच हजारांची लाच प्रकरणी कंत्राटी अभियंत्यावर कार्यवाही

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० जुलै**

मंजूर गाय गोठ्याचे बांधकामाची मोजमाप पुस्तिका लिहून पुढे त्यांची सही करून व इतर कार्यवाही पूर्ण करून दोन हप्त्याचे पैसे मिळवून देण्यासाठी ५ हजारांची लाच मागितल्याप्रकरणी वसमतच्या कंत्राटी अभियंत्याविरोधात लाचलूचपत प्रतिबंधक पथकाने कार्यवाही केली आहे.

तक्रारदाराच्या तक्रारीवरून वसमत पंचायत समितीचे अभियंता गणेश बप्पसाहेब गुजर यांनी तक्रारदाराच्या नावे मंजूर गाय गोठ्याचे बांधकामाची मोजमाप पुस्तिका लिहून पुढे त्यांची सही करून व इतर कार्यवाही पूर्ण करून दोन हप्त्याचे पैसे मिळवून देण्यासाठी ५ हजार रूपये लाचेची मागणी केली होती. लाचलूचपत प्रतिबंधक विभागाने पडताळणी करण्याकरिता तक्रारदार यांना पंचासह गणेश गुजर यांची भेट घेण्याकरिता पाठविले असता भेटी दरम्यान गणेश गुजर यांनी तक्रारदार यांना ५ हजाराची लाचेची मागणी केल्याची पडताळणी कार्यवाहीमध्ये निष्पन्न झाले.

दि २२ जून रोजी टोकाई देवीच्या टेकडीवर गणेश गुजर व तक्रारदार यांची भेट झाली परंतू गूजर यांना काहीतरी संशय आल्याने त्यांनी तक्रारदाराकडून लाच रक्कम न स्विकारता निघून गेले. त्यानंतर तक्रारदार यांनी ६ जूलै रोजी जबाब दिला की, गुजर यांना भेटण्यासाठी आजपर्यंत त्यांचा ठावठिकाणा घेवून शोध घेतला असता ते भेटत नाहीत, मोबाईलवर संपर्क केला असता फोन उचलत नाहीत. अखेर तक्रार व त्यावरून करण्यात आलेली लाच मागणी पडताळणी कार्यवाही वरून लोकसेवक गणेश गुजर यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करावी असा जवाब दिल्याने सरकारतर्फे पोलिस निरीक्षक राजेश मलपिल्लू यांनी गणेश गुजर यांच्याविरोधात वसमत शहर पोलिस ठाण्यात तक्रार देऊन त्यांना अटक करण्यात आली.

सदरची कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक आश्विनी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली उपाधीक्षक विकास घनवट, पोलिस निरीक्षक राजेश मलपिल्लू, बालाजी तिप्पलवाड, सपोउपनि युनुस शेख, विजय शुक्ला, रवींद्र वरणे, राजाराम फुपाटे, भगवान मंडलीक, गजानन पवार, गोविंद शिंदे, अकबर शेख, योगिता अवचार, पुंडगे, अमोल जाधव यांनी केली आहे.

# अतिरिक्त जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ. दिपक मोरे यांचा दिल्लीत विकसित भारत २०२६ पुरस्काराने गौरव

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० जुलै**



वैद्यकीय क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी आणि रुग्णसेवेतील समर्पित योगदानाबद्दल हिंगोली जिल्हा सामान्य रुग्णालयाचे अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक (एडीसीएच) डॉ. दीपक मोरे यांचा नवी दिल्ली येथे दिमाखदार सोहळ्यात राष्ट्रीय पातळीवर सत्कार करण्यात आला. नवी दिल्ली येथील प्रसिद्ध हॉटेल हयात रीजन्सी येथे आयोजित विशेष सोहळ्यात त्यांना 'विकसित भारत २०२६' या अत्यंत प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

दिल्ली विधानसभेचे सभापती विजेंद्र गुप्ता यांच्या हस्ते डॉ. दीपक मोरे यांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.

डॉ. दीपक मोरे यांनी हिंगोली जिल्हा सामान्य रुग्णालयात कार्यरत असताना आरोग्य सेवा सामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि रुग्णालयातील आरोग्य सुविधांचा दर्जा सुधारण्यासाठी महत्त्वपूर्ण प्रयत्न केले आहेत. त्यांच्या याच प्रशासकीय आणि वैद्यकीय कौशल्याची दखल घेऊन त्यांची या राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. नवी दिल्लीतील या दिमाखदार सोहळ्याला देशातील विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ.प्रतिभा दिपक मोरे, डॉ. प्रणील मोरे, डॉ. प्रतिक्षा प्रणील मोरे आदी उपस्थित होते.

डॉ. दीपक मोरे यांना हा मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल हिंगोली जिल्ह्यात आणि वैद्यकीय वर्तुळात आनंदाचे वातावरण आहे. त्यांच्या या यशाबद्दल डॉ. चक्रधर मुंगल (अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, हिंगोली), डॉ. नितीन तडस (जिल्हा शल्य चिकित्सक, हिंगोली), गोपाल कदम, डॉ. मनिष बगडिया, डॉ.गणेश सोळंके, डॉ.बालाजी भाकरे, डॉ.भालेराव, डॉ.नगरे, डॉ.नितीन पुरोहित, डॉ.बोधगिरे, डॉ.कर्वा, डॉ. विठ्ठल रोडगे, डॉ.यशवंत पवार, डॉ.राम मुंडे, डॉ. महेश घुले, दिपक लोखंडे, देवराव लोथे यांच्यासह जिल्ह्यातील इतर वरिष्ठ अधिकारी, डॉक्टर्स, वैद्यकीय कर्मचारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी डॉ. मोरे यांचे प्रत्यक्ष व सोशल मीडियाच्या माध्यमातून अभिनंदन केले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. डॉ. मोरे यांना मिळालेल्या या यशामुळे हिंगोलीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# हिंगोलीत काँग्रेस कार्यकर्त्यांचे रघुपती राघव राजाराम आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० जुलै**



आयोध्या येथील श्री प्रभू रामंचद्रांच्या दान पेटी व देणगीमधील कोट्यावधी रूपयांची चोरी झाली आहे. सदरील चोरीवर भाजपमधील शीर्ष नेते काहीच बोलत नाहीत. याप्रकरणी संबंधितांवर गुन्हा दाखल करावा तसेच या घटनेच्या विरोधात काँग्रेस कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी येथील हनुमान मंदिरासमोर रघुपती राघव राजाराम आंदोलन केले.

आयोध्या येथील श्रीरामजन्मभूमी असलेल्या प्रभू श्रीरामचंद्र यांच्या मंदिरात लाखो भाविक मोठ्या श्रध्देने दान देतात परंतु या दान पेटीतील पैसा आणि दागीने चोरीला गेल्यामुळे भाविकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. याप्रकरणी मंदिर संस्थानच्या विश्वस्तांवर अजूनही कोणता गुन्हा दाखल झाला नाही. तसेच भाजप केवळ रामाच्या नावाचा राजकीय स्वार्थासाठी करीत असल्याचा आरोप करीत या प्रकरणी भाजपचे शीर्ष नेते चकार अक्षरही बोलत नाहीत. या विरोधात काँग्रेस पक्षाच्यावतीने आंदोलन करीत संबंधित विश्वस्तावर कार्यवाही करण्याची मागणी करीत आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष डॉ सतीश पाचपुते, माजी जिल्हाध्यक्ष सुरेशअप्पा सराफ, प्रदेश सचिव साहेबराव देवकते, विशाल इंगोले, मिलींद उबाळे, बंटी नागरे, एकनाथ शिंदे आदींची उपस्थिति होती.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# काँग्रेसचे रघुपती राघव राजाराम सत्याग्रह

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १० जुलै -**

अयोध्या येथील प्रभू श्रीराम मंदिराच्या करोडो रुपयांच्या चंदा चोरी विरोधात, खा. रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात व उत्तर जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांच्या पुढाकाराने नांदेड शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने महावीर चौक येथील हनुमान मंदिर परिसरात शुक्रवार (ता.१०) रोजी रघुपती राघव राजाराम सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. यावेळी टाळ मृदुंगच्या गजरात अभंगातून प्रभू श्रीरामाचा जयघोष करण्यात आला.

यावेळी खा.रवींद्र चव्हाण उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे व महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांनी श्री राममंदिर चोरी विरोधात जोरदार निषेध व्यक्त केला. यावेळी माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, प्रदेश सरचिटणीस डॉ. रेखाताई चव्हाण, सुरेंद्र घोडसकर, एकनाथराव मोरे, आनंद चव्हाण, तिरुपती पाटील कोंढेकर, बालाजी गाडे, श्रीनिवास मोरे, महेश देशमुख तरोडेकर, सत्यपाल सावंत, मधूकर दिघे, अजिज कुरेशी, बाबुभाई खोकेवाले, फारुख भाई, शेर अली, आनंदराव कल्याणकर, बापूसाहेब पाटील, दीपकसिंग हुजुरीया, जसपालसिंग तबेलेवाले, बाळासाहेब आंबेगावकर, मधूकर सोनटक्के, संजय वाघमारे, गगन यादव, नागराज सुलगेकर, अतुल पेदेवाड, शंकर शिंदे, आंबादास रातोळे, गणेश कोकाटे, अक्षय नळगे, गोविंद पाटील, जेशिका शिंदे, ज्योती कदम, सुरेखा वैद्य, विमलताई कीर्तने, मुरलीधर कल्याणकर, एस.पी. कुभारे, गौतम सिरसाट, प्रबुद्ध चिते, प्रकाश दिपके, प्रसेनजित वाघमारे, सचिन टाले, गंगाधर आडेराव, संजय कौठेकर, गंगाधर डांगे, प्रितम जोंधळे, कलिम शेख, धनंजय उमरीकर, आदीसह इतर काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच पावडेवाडी येथील भजनी मंडळ हभप गोपीनाथ महाराज पावडेवाडीकर, हभप मोरे महाराज सोनखेडकर, रंजन पावडे, सोपान शिंदे, गंगाधर शिंदे, पांडुरंगराव पावडे, अशोक पावडे, ध्यानेश्वर पावडे आदीजण उपस्थित होते.



(छाया: नरेंद्र गडप्पा)

# किनवट-माहूरच्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचा आ. भीमराव केराम यांचा निर्धार

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. १० जुलै -**

किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत सातत्याने आक्रमक भूमिका घेणारे आमदार भीमराव केराम यांनी पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या न्यायासाठी शासन दरबारी जोरदार आवाज उठवला आहे. मतदारसंघातील हजारो पात्र शेतकरी अद्यापही प्रलंबित पीक विम्याच्या लाभापासून वंचित असल्याने त्यांना तातडीने विम्याची रक्कम वितरित करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कृषी मंत्री दत्ता भरणे यांच्याकडे स्वतंत्र पत्रांद्वारे केली आहे.

आमदार केराम यांनी आपल्या निवेदनात स्पष्ट केले आहे की, इस्लापूर, जलधरा, मांडवी, सिंदगी, वानोळा, माहूर, सिंदखेड आणि वाई बाजार या महसूल मंडळांतील हजारो शेतकरी सर्व निकष पूर्ण करूनही आजही पीक विम्याच्या प्रतीक्षेत आहेत. राज्यातील आणि नांदेड जिल्ह्यातील इतर भागांमध्ये पीक विम्याचे वितरण सुरू असताना किनवट-माहूरमधील शेतकऱ्यांना मात्र अद्याप लाभ मिळालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून शासनाने याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.



आमदार केराम यांनी आपल्या पत्रात शेतकऱ्यांच्या सध्याच्या बिकट परिस्थितीचे वास्तवही शासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे. नापिकी, सतत वाढणारा शेतीखर्च, अपुरा वीजपुरवठा, पीककर्ज मिळण्यात येणाऱ्या अडचणी, कर्जबाजारीपणा आणि आर्थिक संकटामुळे शेतकरी अक्षरशः हवालदिल झाले आहेत. अशा कठीण परिस्थितीत पीक विम्याची रक्कम हा त्यांच्यासाठी मोठा आर्थिक आधार ठरू शकतो. मात्र मंजूर झालेली रक्कमही लाभार्थ्यांच्या खात्यात जमा न झाल्याने शेतकऱ्यांचा शासनाच्या योजनांवरील विश्वास डळमळीत होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री आणि कृषी मंत्र्यांकडे संबंधित विमा कंपनी, कृषी विभाग आणि जिल्हा प्रशासनाला तात्काळ निर्देश देण्याची मागणी केली आहे. आवश्यक निधी उपलब्ध करून सर्व पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात युद्धपातळीवर पीक विम्याची रक्कम जमा करावी, वितरणासाठी निश्चित कालमर्यादा जाहीर करावी आणि त्याच्या अंमलबजावणीचा अहवाल शासनाकडे सादर करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करणारे लोकप्रतिनिधी म्हणून आमदार भीमराव केराम यांनी पुन्हा एकदा आपल्या मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहत शासनाकडे प्रभावी भूमिका मांडली आहे. शेतकऱ्यांना त्यांचा हक्काचा लाभ मिळवून देण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असल्याचे या निवेदनातून पुन्हा स्पष्ट झाले आहे. यावेळी आमदार केराम म्हणाले, शेतकऱ्यांच्या हक्काचा एकही रुपया अडवून ठेवला जाणार नाही. किनवट-माहूरमधील प्रत्येक पात्र शेतकऱ्याला पीक विम्याची रक्कम मिळेपर्यंत मी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करणार आहे. शेतकऱ्यांच्या न्यायासाठी माझा लढा कायम राहील असा निर्धार आमदार केराम यांनी केला.



## मुदखेड-पंढरपूर 'मधुबन पायी दिंडी'चे काँग्रेसतर्फे उत्साहपूर्ण स्वागत

**मुदखेड** -मुदखेड येथून प्रथमच पंढरपूरकडे निघालेल्या मधुबन पायी दिंडीचे शहरात भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. ठाकरे चौक येथे मुदखेड शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने दिंडीतील वारकऱ्यांचा सत्कार करून त्यांना फळांचे वाटप करण्यात आले, तसेच पुढील प्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी दिंडी चालक गजानन उचले, बालाजी महाराज मेंडकेकर, विजय चंद्रे, होनाजी महाराजबा साळवाडीकर, नारायण निर्मले, श्रीराम गंगासागरे, लालाजी पुरबाजी वसुरे यांच्यासह वारकरी बांधवांचा पुष्पहार घालून सन्मान करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी वारकरी संप्रदायाची भक्ती, श्रद्धा, समता आणि सामाजिक ऐक्याची परंपरा ही समाजाला प्रेरणा देणारी असल्याचे सांगितले. मुदखेड ते पंढरपूर अशी प्रथमच आयोजित करण्यात आलेली मधुबन पायी दिंडी ही वारकरी परंपरा आणि अध्यात्मिक संस्कृती जपणारा स्तुत्य उपक्रम असून अशा उपक्रमांमुळे समाजात धार्मिक आणि सामाजिक सलोखा अधिक दृढ होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. कार्यक्रमास जिल्हा सचिव गिरीश कोत्तावार, गटनेते प्रतिनिधी मुजीब पठाण, नगरसेवक अविनाश चौदंते, शिवानंद देवके, रमेश बोडके, विठ्ठल आचार्य, सेवादल तालुकाध्यक्ष गंगाधर मगरे, सुभाष चौदंते, मोईन भाई, अनिस भाई, रामदास तेलंगे, वेदांत शेवटे, उमेश स्वामी, राघवेंद्र पबीतवार, बाबुराव पांचाळ, गोविंद नातेवाड, अतुल काचावर, माधव पानकोळी, बापूराव पोशटी, माधव तेलंगे, काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# चर्मकार समाजासाठी सुसज्ज जागा विनामूल्य उपलब्ध

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १० जुलै -**

श्री गुरु गोविंदसिंघजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या आणि गोदावरी मातेचे वरदान लाभलेल्या नांदेड शहरालगतच्या बळीरामपूर येथे चर्मकार समाजातील वंचित, दुर्लक्षित व उपेक्षित समाजबांधवांसाठी एक महत्त्वपूर्ण सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. संतगुरु रविदास महाराज तीर्थक्षेत्र (वर्ग 'ब') च्या माध्यमातून विविध सामाजिक कार्यक्रमांसाठी सर्व मूलभूत सुविधांनी सुसज्ज अशी जागा समाजबांधवांना पूर्णपणे विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सुमारे आठ गुंठे क्षेत्रफळ असलेल्या या परिसरात विवाह सोहळे, साखरपुडा, वाढदिवस, हळदी-कुंकू समारंभ, समाजप्रबोधनपर कार्यक्रम, चर्चासत्रे तसेच विविध सामाजिक उपक्रम आयोजित करता येणार आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाही सन्मानाने कार्यक्रम आयोजित करता यावेत, या सामाजिक उद्देशातून हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

# किनवटच्या वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यास माहितीसह न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहण्याचे आदेश !

**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर, दि. १० जुलै -**

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत मागवलेली माहिती देण्यास टाळाटाळ करणे आणि राज्य माहिती आयुक्तांच्या आदेशाची अवहेलना करणे नांदेड जिल्ह्यातील किनवट येथील वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याला चांगलेच महागात पडले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने (छत्रपती संभाजीनगर) या बेजबाबदार वर्तनाची गंभीर दखल घेतली आहे. न्यायमूर्ती एस. जी. चपळगावकर यांनी ६ जुलै २०२६ रोजी दिलेल्या एका अत्यंत महत्त्वपूर्ण आदेशात, प्रतिवादी क्रमांक चार म्हणजेच जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी किनवट, जिल्हा नांदेड यांना राज्य माहिती आयुक्तांच्या निर्देशानुसार संपूर्ण माहितीसह न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहण्याचे अन्यथा आदेशाचे पालन नकरण्याचे कारण स्पष्ट करणारे प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे कडक आदेश दिले आहेत.

**सात वर्षांपासून माहितीसाठी संघर्ष**

या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी की, याचिकाकर्ते तथा अपिलार्थी काशिनाथ नारायणराव शिंदे यांनी २० जुलै २०१९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या विहित जोडपत्राद्वारे वन परिक्षेत्राधिकारी किनवट, जिल्हा नांदेड यांच्याकडे काही महत्त्वपूर्ण माहिती मागितली होती. मात्र, वनविभागाच्या प्रशासनाकडून ही माहिती देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करण्यात आली. माहिती न मिळाल्याने शिंदे यांनी कायद्यातील तरतुदीनुसार अपीलीय प्रक्रिया पूर्ण करत राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे धाव घेतली होती.

**माहिती आयुक्तांच्या आदेशालाही केराची टोपली**

या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत राज्य माहिती आयुक्तांनी किनवट वन विभागाला जोडपत्र 'क' च्या निर्णयात संबंधित माहिती १५ दिवसांच्या आत याचिकाकर्त्याला विनामूल्य पुरवण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. मात्र, वरिष्ठ स्तरावरील या कायदेशीर आदेशालाही जन माहिती अधिकाऱ्याने पूर्णपणे न जुमानल्याने अपिलार्थी शिंदे यांनी माहिती अधिकार कायद्याच्या कलम १८ अन्वये राज्य माहिती आयोगाकडे पुन्हा दाद मागितली. त्यावर २ऊ सप्टेंबर २०२४ रोजी माहिती आयुक्तांचा अंतिम निर्णय आला होता. तरीही जन माहिती अधिकाऱ्याने माहिती देण्यास नकार दिला.

**अखेर हायकोर्टात 'रिट याचिका' दाखल**

शासकीय अधिकाऱ्याच्या या आडमुठ्या आणि बेकायदेशीर भूमिकेमुळे संतप्त झालेल्या काशिनाथ शिंदे यांनी आपल्या वकिलामार्फत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका क्रमांक ८७८५/२०२५ दाखल केली. या याचिकेवर काल दि. सहा जुलै रोजी न्यायमूर्ती एस. जी. चपळगावकर यांच्यासमोर सुनावणी झाली.

**न्यायालयाचा कडक पवित्रा:**

सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, गेल्या सात वर्षांपासून एक नागरिक माहितीसाठी शासकीय 0कार्यालयाचे उंबरठे झिजवत आहे. माहिती आयुक्तांचे आदेश असूनही अधिकारी दाद देत नाहीत, हा माहिती अधिकार कायद्यचा अवमान आहे. हा युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने नांदेड जिल्ह्यातील किनवटच्या वनपरिक्षेत्राधिकार्याला फैलावर घेत व थेट मूळ माहितीसह न्यायालयात हजर राहण्याचे फर्मान सोडवले.

या महत्त्वपूर्ण प्रकरणात याचिकाकर्त्यांच्या वतीने ड. चंद्रकांत थोरात आणि ड. ए. आर. कानडे व ड.ओ. डी. तोटावाड यांनी बाजू मांडली, तर सरकार पक्षाकडून सहाय्यक सरकारी वकील ड. श्रीमती आर. आर. तांदळे यांनी काम पाहिले.

न्यायालयाच्या या कडक भूमिकेमुळे माहिती अधिकार कार्यकर्त्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून, किनवट परिसरातील सुस्त प्रशासनाला चांगलाच हादरा बसला आहे.

# डॉ. बास्टेवाड यांचे आरोप बिनबुडाचे : सकवान

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १० जुलै -**

रेणुकाई हॉस्पिटलचे संचालक डॉ. निलेश बासटवार यांनी अनामत रक्कम परत केली नाही, महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजनेच्या पैशांचे स्पष्टीकरण दिले नाही उलट व्यक्तिगत पातळीवर सकवान परीवारावर बिनबुडाचे आरोप केल्याची प्रतिक्रिया अनुज सकवान व आशिष सकवान यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भागीदारी, बँक व्यवहार,आर्थिक हिशोब हे प्रश्न अनुत्तरीत असताना रेणुका हॉस्पिटलमध्ये असलेले मेडिकल त्यांनी दुसऱ्याला दिले. या मेडिकलचे ६० लाख रुपये अनामत रक्कम परत करण्यात आली नाही. त्यातच दोन कोटीच्या मागणीबाबत चुकीचा प्रचार करण्यात येत आहे. त्यांच्या व्यवहारामुळे हॉस्पिटलमध्ये असलेल्या भागीदारांचे मोठे नुकसान झाले आहे असे असतानाही उलटते सकवान परिवारावर बिनबुडाचे व चुकीचे आरोप करण्यात येत असून हॉस्पिटल मधील भागीदारी व महात्मा ज्योतिबा फुले योजनेच्या पैसे संबंधाने चौकशी करण्यात यावी अशी मागणी अनुज सकवान व आशिष सकवान यांनी पत्रकार परिषदेत केली.

## पत्रकार किशोरकुमार वागदरीकर यांना 'स्वाभिमान लेखणी' पुरस्कार

**नांदेड** -पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल टाईम्स न्यूज २४ या वृत्तपोर्टलचे संपादक तथा पत्रकार किशोरकुमार शिवाजीराव वागदरीकर यांची 'स्वाभिमान लेखणी' पुरस्कारासाठी निवड झाली आहे. आर्यारवी एंटरटेनमेंट यांच्या वतीने आयोजित 'पत्रकार, मुक्त पत्रकार, संपादक, कला, साहित्य, समाजसेवक पुरस्कार सोहळा-२०२६' या कार्यक्रमात १२ जुलै रोजी मुंबई येथे त्यांचा सन्मान करण्यात येणार असल्याची माहीती आयोजक तथा अभिनेते महेश तेटांबे यांनी दिली. पत्रकारितेत निर्भीड, वस्तुनिष्ठ आणि जनहिताच्या प्रश्नांवर सातत्याने प्रभावी वृत्तांकन केल्याबद्दल वागदरीकर यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.



डिजिटल माध्यमातून सामाजिक, प्रशासकीय आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडत त्यांनी पत्रकारितेत स्वतंत्र आणि विश्वासार्ह ओळख निर्माण केली आहे. वागदरीकर यांनी आपल्या पत्रकारिता कारकिर्दीत दै. सकाळ, दै. भास्कर, दै. देशोन्नती तसेच दै. लोकमंच क्रांती या वृत्तपत्रांमध्ये विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. सध्या ते 'टाईम्स न्यूज २४' या वृत्तपोर्टल आणि युट्यूब चॅनेलच्या माध्यमातून जनहिताच्या प्रश्नांवर निर्भीड व विश्वासार्ह वृत्तांकन करत आहेत. यापूर्वीही त्यांच्या पत्रकारितेतील कार्याची दखल घेत विविध प्रतिष्ठित संस्थांकडून त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. 'स्वाभिमान लेखणी' पुरस्कारामुळे त्यांच्या कार्याचा आणखी एक मानाचा टप्पा गाठला गेला असून, नांदेडच्या पत्रकारितेसाठी ही अभिमानाची बाब मानली जात आहे.

## टीईटी परीक्षेतून सूट देण्यासाठी राज्यसभा खा. डॉ अजित गोपछडे यांना साकडे

**नांदेड** -नांदेड येथे राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे यांना महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (प्रा) चे प्रांताध्यक्ष मधुकर उन्हाळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने भेटून सन २०१३ पूर्वी नियुक्त शिक्षकांना TET परीक्षेतून मुक्त करण्यासाठी संसदेत विधेयक आणून कायदा पारित करण्यात अशी मागणी महाराष्ट्राची शिक्षक परिषदेचे प्रांताध्यक्ष मधुकर उन्हाळे यांनी या प्रसंगी केली RTE act २००९ नुसार ढएढ बंधनकारक नसताना सुप्रीम कोर्टाच्या निर्देशानुसार देशातील सर्व शिक्षकांना टीईटी परीक्षा उतीर्ण होणे बंधनकारक केलेले आहे.त्यामुळे महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद( प्रा)च्या वतीने महाराष्ट्रातील सर्व पक्षीय खासदार यांना निवेदन देऊन या संदर्भात येणाऱ्या पावसाळी अधिवेशनात संसदेत विधेयक मांडून २०१० पूर्वी नियुक्त शिक्षकांना टीईटी परीक्षेतून सूट देण्यात यावी व त्यांच्या सेवाना संरक्षण देण्यात यावे. या संदर्भात निवेदन देण्याची मोहीम राबविण्यात येत आहे.त्या अनुषंगाने काल नांदेड येथे राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे यांना निवेदन देण्यात आले.यावेळी खासदार डॉ. गोपछडे यांनी येत्या पावसाळी अधिवेशनात हा महत्वपूर्ण विषय मांडणार असल्याचे सांगुण सकारात्मक प्रतिसाद दिला. याप्रसंगी भाजपा जिल्हा सरचिटणीस उमाकांत गोपछडे,भाजपाचे बिलोली तालुका अध्यक्ष चंद्रशेखर पाटील सावळीकर ,महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद( प्रा) चे प्रांतप्रवक्ते डी.एम. पांडागळे,मराठवाडा अध्यक्ष संजय कोठाळे,जिल्हाध्यक्ष व्यंकट गंदपवाड,जिल्हा कार्यवाह प्रल्हाद राठोड, जिल्हा कोषाध्यक्ष धोंडीबा पांडागळे, जिल्हा वरिष्ठ कार्याध्यक्ष बालाजी पांपटवार, जिल्हा संघटन मंत्री संजय मोरे, बालाजी गोपछडे इत्यादी उपस्थित होते असे एका प्रसिद्धी पत्रकार जिल्हा प्रसिद्ध प्रमुख विठ्ठल मुखेडकर यांनी कळविले आहे.

# विद्यार्थ्यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊन जीवनात यशस्वी व्हावे: माजी आ.भोसीकर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १० जुलै -**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाची ज्योत प्रज्वलित केली. त्यांचा आदर्श समोर ठेवून विद्यार्थ्यांनी जिद्द, परिश्रम आणि शिस्त यांच्या बळावर गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊन आपल्या कुटुंबासह समाजाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन माजी आमदार ईश्वरराव भोसीकर यांनी केले.

प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा, नेहरूनगर (लिंबोटी), ता. लोहा येथे माजी आमदार ईश्वरराव भोसीकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. यापूर्वी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना माजी आमदार भोसीकर यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी उच्च ध्येय ठेवून सातत्यपूर्ण परिश्रमाच्या बळावर यश संपादन करावे, असे मार्गदर्शन केले.



यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्या तथा नांदेड जिल्हा महिला काँग्रेसच्या उपाध्यक्षा सौ.वर्षाताई भोसीकर यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास माजी जिल्हा परिषद सदस्या तथा नांदेड जिल्हा महिला काँग्रेसच्या उपाध्यक्षा वर्षाताई भोसीकर, संजय शिक्षण संस्था, कंधारचे उपाध्यक्ष कृष्णाभाऊ भोसीकर, मुख्याध्यापक अशोक सापनर, तानाजी मारकवाड यांच्यासह शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले.

# लोहा ठाण्याचा कारभार लवकरच नविन इमारतीतुन सुरु होणार

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, दि. १० जुलै -**

पोलीस ठाण्याच्या नूतन इमारतीचे बांधकाम तब्बल १४ वर्षांपासून निधीअभावी रखडले होते. अखेर नांदेड जिल्हा नियोजन समितीमार्फत १ कोटी ६० लाखांचा निधी मंजूर झाल्याने या रखडलेल्या कामाला गती मिळण्याची दाट शकेत आहे. त्यामुळे १४ वर्षांपासून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या डाक बंगल्यातून सुरू असलेला पोलीस ठाण्याचा कारभार आता लवकरच नव्या इमारतीत हलविण्याचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता आहे.१९८९ मध्ये पोलीस चौकीची स्थापना झाली होती. वाढते शहर व वाढती लोकसंख्या आणि कायदा-सुव्यवस्थेची जबाबदारी लक्षात घेऊन या चौकीला पुढे पोलीस ठाण्याचा दर्जा देण्यात आला. पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात शहरासह ४६ गावे, वाड्या व तांडे असून जवळपास सव्वा लाख नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी केवळ ५६ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर आहे. वाढत्या लोकसंख्येनुसार पोलीस मनुष्यबळ वाढविण्याचीही गरज व्यक्त होत आहे

**निवासस्थानांचा प्रश्न कायम**

नवीन पोलीस ठाण्याच्या इमारतीला निधी मिळाला असला तरी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी शासकीय निवासस्थानांचा प्रश्न अद्याप कायम आहे. दिवस-रात्र जनतेच्या सुरक्षेसाठी कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांना आजही शासकीय वसाहतीची सुविधा उपलब्ध नाही. पोलीस ठाण्याच्या इमारतीप्रमाणेच निवासस्थानांचा प्रश्नही शासनाने तातडीने सोडवावा, अशी मागणी कर्मचारी वर्गातून होत आहे.

इमारतीचे मुख्य बांधकाम पूर्ण झाले; मात्र वाढत्या महागाईमुळे अंतर्गत कामे रखडली. त्यानंतर शासनाकडून अतिरिक्त निधी न मिळाल्याने इमारत १४ वर्षे अपूर्णच राहिली. आता विद्यमान आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या पाठपुराव्यामुळे जिल्हा नियोजन समितीकडून १.६० कोटींचा

निधी मंजूर झाला असून उर्वरित काम पूर्ण होण्याची आशा निर्माण झाली आहे.

# साधु महाराजांच्या दिंडीच्या अडी-अडचणी सोडविण्यासाठी आ. चिखलीकर सदा तत्पर

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, दि. १० जुलै -**

गेल्या ३०० वर्षांची परंपरा असलेल्या श्री साधु महाराज कंधारकर संस्थानाच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर हे सदैव तत्पर आहेत असे प्रतिपादन युवानेते प्रविण प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी माळेगाव यात्रा तालुका लोहा येथे कंधार ते पंढरपुर आषाढी एकादशी श्री विठ्ठू माऊलींच्या यात्रेनिमित्त जाणाऱ्या दिंडीचे माळेगाव यात्रा येथे स्वागत करताना केले.

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त कंधार येथील श्री संत साधू महाराज कंधारकर यांच्या सुमारे ३०० वर्षांची अखंड परंपरा लाभलेल्या दिंडीचे नांदेड जिल्ह्याच्या सीमेवरील माळेगाव (यात्रा) येथे शुक्रवारी भक्तिमय वातावरणात उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. लोहा-कंधार मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वतीने वारकरी भाविकांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते.



दरवर्षीप्रमाणे यंदाही हजारो वारकरी टाळ, मृदंग, वीणा आणि हातात भगवा ध्वज घेऊन ज्ञानोबा-तुकारामच्या अखंड नामघोषात पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करत होते. संपूर्ण परिसर हरिनामाच्या गजराने दुमदुमून गेला होता. वारकऱ्यांचा उत्साह, शिस्त आणि भक्तिभाव यामुळे माळेगाव परिसराला जणू पंढरीचे स्वरूप प्राप्त झाले होते.

या स्वागत सोहळ्यास दिंडीचे प्रमुख ज्ञानोबा माऊली कंधारकर, ह.भ.प. एकनाथ महाराज, भास्कर महाराज कंधारकर, माजी जिल्हा परिषद सभापती युवानेते प्रवीण पाटील चिखलीकर, सचिन पाटील चिखलीकर,लोहा न.प. चे नगराध्यक्ष शरद पाटील पवार, लोहा पं. स.चे माजी सभापती आनंदराव पाटील शिंदे, माजी पं.स. सदस्य बालाजी राठोड, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक साहेबराव पाटील काळे,उपनगराध्यक्ष करीम शेख, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, नगरसेवक केशवराव मुकदम, गटनेते भास्कर पवार, नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, शामआण्णा पवार, , माजी जिल्हा परिषद सदस्य हंसराज पाटील, अर्जुन राठोड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच मोठ्या संख्येने वारकरी भाविकांनी या सोहळ्यात सहभाग नोंदविला.

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे वडील कै. गोविंदराव पाटील चिखलीकर यांच्या काळापासून गेली ६० वर्षांपासून कंधार येथुन पंढरपूरला जाणाऱ्या श्री साधु महाराज कंधारकर संस्थानाच्या दिंडीचे स्वागत करण्याची परंपरा चालू आहे.

स्वागतानंतर वारकऱ्यांना स्नेहभोजनाचा प्रसाद देण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी वारकरी संप्रदायाच्या शेकडो वर्षांच्या परंपरेला जपणाऱ्या दिंडीबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या सर्व वारकऱ्यांना शुभेच्छा दिल्या.यानंतर मान्यवरांनी दिंडीला नांदेड-लातूर जिल्ह्याच्या सीमेपर्यंत भावपूर्ण निरोप दिला. भक्तिरस, हरिनामाचा अखंड गजर आणि वारकऱ्यांचा उत्साह यामुळे संपूर्ण वातावरण विठ्ठलमय झाले असून, परंपरा, श्रद्धा आणि सामाजिक ऐक्याचा सुंदर संगम या सोहळ्यात अनुभवायला मिळाला आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## एसआयआर कामाचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा; 100 टक्के काम करणाऱ्या तीन शिक्षकांचा सन्मान



तभा वृत्तसेवा

कन्नड - दि. १० जुलै - विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) मोहिमेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी शुक्रवारी (दि. १०) कन्नड तालुक्याचा आढावा घेत विविध ठिकाणी भेटी देऊन कामकाजाची पाहणी केली. सकाळी त्यांनी अंधानेर गावाला भेट देत प्रत्यक्ष कामाचा आढावा घेतला. त्यानंतर अंकुर रोपवाटिका येथे भेट देऊन आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले. समाजाप्रती संवेदनशीलता जपत प्रशासनाने राबविलेला हा स्तुत्य उपक्रम उपस्थितांकडून कौतुकास पात्र ठरला.

यानंतर उपविभागीय अधिकारी कार्यालयात तालुक्यातील सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन एसआयआर मोहिमेच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. कामकाज अधिक परिणामकारक आणि वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विभागांना दिल्या.

बैठकीस उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसीलदार सारिका भगत, गटविकास अधिकारी ओमप्रसाद रामावत, नायब तहसीलदार दिलीपकुमार सोनवणे, प्रशांत काळे, तालुका कृषी अधिकारी संदीप शिरसाठ, गटशिक्षणाधिकारी मोहम्मद सबहात तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी एसआयआर मोहिमेत १०० टक्के काम पूर्ण करणाऱ्या तालुक्यातील तीन शिक्षकांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यामध्ये प्रकाश थोरात (जि.प. शाळा, माळेगाव लोखंडी), स्वाती बाबूलाल रोकडे (जि.प. शाळा, कोळसवाडी) आणि वर्षा महेश गावंडे (जि.प. शाळा, कविटखेडा) यांचा समावेश होता.

# तांडा वाड्यातील अनेकांच्या स्वप्नांना शिक्षणाचे पंख देणारे प्राचार्य राठोड सदैव स्मरणात राहतील- मंत्री संजय राठोड

छत्रपती संभाजीनगर, दि.१०(जिमाका)- येथील वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे माजी प्राचार्य राजाराम राठोड (वय ९०) यांच्या पार्थिवावर आज महाविद्यालयाच्या प्रांगणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे गुरुवारी (दि.९) दुपारी निधन झाले होते. शासनाच्या वतीने मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन केले. तांडा वाड्यातील अनेकांच्या स्वप्नांना शिक्षणाचे पंख देणारे प्राचार्य राठोड सदैव स्मरणात राहतील, अशा शब्दात मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी त्यांना श्रद्धांजली वाहीली.

अंत्यसंस्कार समयी खा. डॉ. कल्याण काळे, माजी खा. इम्तियाज जलील, आ.राजेश राठोड, माजी मंत्री राजेंद्र दर्डा, माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड, प्राचार्य संजीव रेड्डी, गौरसेना अध्यक्ष संजय चव्हाण, बंजारा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष बापुराव राठोड, बापू घडमोडे, प्रा. सुसिंग जाधव, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, वसंतराव नाईक महाविद्यालय, बळीराम पाटील विद्यालय येथील शिक्षक, कर्मचारी, आजी माजी विद्यार्थी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री संजय राठोड यांनी श्रद्धांजलीपर शोकाकूल समुदायासमोर आपल्या भावना व्यक्त करतांना सांगितले की, काही माणसं आयुष्य जगत नाहीत, तर हजारो आयुष्यांना जगण्याचा अर्थ देतात. काही व्यक्ती स्वत:साठी इतिहास घडवत नाहीत, तर समाजाच्या भवितव्याचा इतिहास घडवतात. अशीच एक तेजस्वी ज्ञानज्योत आज अनंतात विलीन झाली.प्राचार्य राजारामजी राठोड यांनी वंचित, शोषित, भटक्या-विमुक्त, तांडा-वाडीतील असंख्य मुलांच्या डोळ्यांतील स्वप्नांना त्यांनी शिक्षणाची पंखे दिली. अनेकांच्या हातात पुस्तक दिले, अनेकांच्या मनात आत्मविश्वास जागवला आणि अनेक कुटुंबांच्या भविष्याला उज्ज्वल दिशा दिली. वसंतरावजी नाईक यांनी समाजातील उपेक्षित घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे जे स्वप्न पाहिले, त्या स्वप्नाचे आयुष्यभर निष्ठेने संवर्धन करणाऱ्या थोर शिलेदारांमध्ये प्राचार्य राजारामजी राठोड यांचे स्थान अग्रक्रमाचे राहील. त्यांनी त्यांनी केवळ महाविद्यालय उभे केले नाही, तर माणसे घडवली; पदवीधर नव्हे तर जबाबदार नागरिक घडवले. वाड्या, वस्त्या, तांडे आणि झोपडपट्ट्यांतील गरीब, गरजू, वंचित मुलांना त्यांनी शिक्षणाचा अधिकार दिला. हजारो विद्यार्थ्यांच्या यशामागे त्यांच्या प्रेरणेचा, त्यागाचा आणि मायेचा हात कायम राहिला.

प्राचार्य राठोड यांच्या पश्चात मुलगे ॲड. अभय राठोड, नितीन राठोड, डॉ. बिपीन राठोड, जावई डॉ. अशोक चव्हाण, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

प्राचार्य राठोड यांनी १९६० ते जून १९६९ दरम्यान उदगीर तालुक्यातील विद्यानिधी हायस्कूल येथे मुख्याध्यापक म्हणून काम केले. १९६६ ते १९७२ दरम्यान उदगीरच्या शिवाजी महाविद्यालयात प्राचार्य, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचे संघटन सचिव, १९७२ ते १९९७ या कालावधीत वसंतराव नाईक महाविद्यालयात प्राचार्य म्हणून त्यांनी काम केले. १९६० मध्ये मराठवाड्यात वसतिगृह सुविधा सुरू केली. १९७२ मध्ये वसंतराव नाईक महाविद्यालयाची, तर १९८३ मध्ये बळीराम पाटील प्राथमिक शाळेची स्थापना केली. सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या उपेक्षित भटक्या आणि विमुक्त समाजासाठी त्यांनी भरीव काम केले. अखिल भारतीय बंजारा सेवा संघाचे सचिव म्हणून त्यांनी भरीव काम केले.

## एमजीएममध्ये आजपासून 'इंडोसर्ज-2026' राष्ट्रीय परिषद; अत्याधुनिक एंडोस्कोपी तंत्रज्ञानावर भर



तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : एमजीएम मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटलच्या एमजीएम सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी अँड ॲडव्हान्स्ड मिनिमल ॲक्सेस सर्जरीतर्फे आणि औरंगाबाद सर्जिकल सोसायटीच्या सहकार्याने ११ व १२ जुलै रोजी चौथ्या 'इंडोसर्ज-२०२६' राष्ट्रीय परिषद व एंडोस्कोपी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. 'एव्हरीथिंग अबाउट एंडोस्कोपी फॉर सर्जन्स' ही यंदाच्या परिषदेची संकल्पना असून एंडोस्कोपी क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञान, उपचारपद्धती आणि कौशल्यांचा सर्वांगीण आढावा यामध्ये घेतला जाणार आहे.

दोन दिवसीय परिषदेत २५ हून अधिक लाईव्ह एंडोस्कोपी प्रक्रिया, आधुनिक उपचारपद्धतींचे थेट प्रात्यक्षिक, वैज्ञानिक व्याख्याने आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे. देशभरातील ३०० हून अधिक शल्यचिकित्सक, सुपर-स्पेशालिस्ट, वैद्यकीय शिक्षक, रेसिडेंट डॉक्टर्स व विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

परिषदेचे प्रमुख आकर्षण म्हणजे रशियातील ख्यातनाम एंडोस्कोपिक सर्जन डॉ. अलेक्सी कार्पोव्ह यांची प्रथमच छत्रपती संभाजीनगर येथे उपस्थिती. तसेच चेन्नईचे ज्येष्ठ तज्ज्ञ डॉ. बी. कृष्णा राव 'व्हाय सर्जन्स शुड डू एंडोस्कोपी' या विषयावर प्रतिष्ठेचे ओरेशन सादर करणार आहेत.

शनिवार, ११ जुलै रोजी सायंकाळी ४ वाजता एमजीएममध्ये उद्घाटन समारंभ होणार असून महापौर समीर राजूरकर यांच्या हस्ते उद्घाटन होईल. एमजीएमचे सचिव अंकुशराव कदम, उपाध्यक्ष डॉ. पी. एम. जाधव आणि अधिष्ठाता डॉ. आर. बी. बोहरा यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. आधुनिक एंडोस्कोपी तंत्रज्ञान आणि संशोधनाची देवाणघेवाण घडवून आणणारे हे राज्य व देशातील शल्यचिकित्सकांसाठी महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार असल्याचे आयोजनाध्यक्ष डॉ. प्रवीण सूर्यवंशी यांनी सांगितले.

## सिल्लोडमध्ये अवैध वाळू वाहतुक; ट्रॅक्टर-ट्रॉलीसह 7.56 लाखांचा मुद्देमाल जप्त

**सिल्लोड, दि. 9 :** सिल्लोड शहर पोलिसांनी अवैध गौण खनिज (वाळू) वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर-ट्रॉलीवर कारवाई करून सुमारे 7 लाख 56 हजार 500 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवार (दि. 9) रोजी दुपारी 3.20 वाजण्याच्या सुमारास भराडी रोडवरील हॉटेल अर्जुन परिसरात ही कारवाई करण्यात आली. यामध्ये डोंगरगाव (ता. सिल्लोड) येथील बालू नामदेव बोरेडे तसेच सिल्लोड येथील होरेख जहिर होरेख इब्रेश यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 303(2), 49 तसेच गौण खनिज (खान खनिज) अधिनियम, 1957 मधील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाईदरम्यान लाल रंगाचा 241 DI मॅसी फर्ग्युसन ट्रॅक्टर (क्र. MH-34-L-6520), ट्रॉली आणि अंदाजे एक ब्रास वाळू असा एकूण 7 लाख 56 हजार 500 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अनधिकृतरित्या वाळूची वाहतूक करून आर्थिक फायदा मिळविण्याच्या उद्देशाने हा प्रकार केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

## खरी ताकद ही मूल्ये आणि प्रामाणिकपणात असते

सोनी सबचं पुष्पा इम्पॉसिबल आपल्या दमदार कथाकथनामुळे प्रेक्षकांच्या मनाला भिडत आहे, जिथे प्रत्येक आव्हान पुष्पाच्या धैर्याची आणि तिच्या ठाम विश्वासांची परीक्षा घेतं. कुटुंब वाढत्या भावनिक गोंधळ आणि न सुटलेल्या संघर्षांना सामोरं जात असताना, पुष्पा (करुणा पांडे) पुन्हा एकदा आपल्या तत्त्वांवर ठाम राहण्याचा निर्णय घेते, जरी त्यासाठी तिला स्वतःला परिणामांना सामोरं जावं लागलं तरी.

## कमी-कार्बन रासायनिक उत्पादनाला चालना

**छत्रपती संभाजीनगर ::** अदाणी समूहाची प्रमुख कंपनी अदाणी एंटरप्रायझेस लिमिटेड (एईएल) आणि रासायनिक उत्पादन क्षेत्रात विशेष प्राविण्य असलेली फ्रेंच स्वच्छ-तंत्रज्ञान कंपनी डायऑक्सीकल यांनी आज भारतात कमी-कार्बन रासायनिक उत्पादन विकसित करण्यासाठी आणि त्याचा विस्तार करण्यासाठी दीर्घकालीन भागीदारीची घोषणा केली.या उपक्रमाची सुरुवात अदाणी समूहाच्या एका प्रकल्पस्थळी प्रायोगिक (पायलट) सुविधेपासून होणार असून, या सुविधेमध्ये पकडलेल्या कार्बन डायऑक्साइड आणि नवीकरणीय विजेचा वापर करून फॉर्मिक ॲसिडचे उत्पादन केले जाईल. यशस्वी पडताळणीनंतर, दोन्ही भागीदार या तंत्रज्ञानाचा व्यावसायिक उत्पादनासाठी विस्तार करण्याची योजना आखत आहेत.फॉर्मिक ॲसिड आणि त्याची व्युत्पन्न उत्पादने वस्त्रोद्योग, कृषी आणि उत्पादन उद्योगासह विविध क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरली जातात. या प्रकल्पाचा उद्देश पकडलेल्या कार्बन उत्सर्जनाचे स्वच्छ ऊर्जेच्या सहाय्याने मूल्यवर्धित उत्पादनांमध्ये रूपांतर कसे करता येते, हे दाखवून देणे हा आहे.

## घोसला परिसरात पावसाने उघडीप दिल्यानंतर शेतात बैलांच्या जोडीने आंतरमशागतीची कामे करताना शेतकरी

तभा.वृत्तसेवा

**सोयगाव दि.१० जूलै :** गेल्या काही दिवसांपासून सोयगाव शहरासह सह तालुक्यात सुरू असलेल्या सततच्या पावसानंतर,कालपासून पावसाने विश्रांती उघडीप दिली आहे.यामुळे शेतामध्ये खोळंबलेल्या आंतरमशागतीच्या कामांना कमालीचा वेग आला आहे.चालू खरीप हंगामात गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा कापूस पिकाच्या लागवडीमध्ये मोठी वाढ झाल्याचे पाहायला



मिळत आहे.पावसाने उघडीप देताच शेतकरी आता कापूस, मका, सोयाबीन या पिकांची कोळपणी, खुरपणी आणि खत व्यवस्थापनाच्या कामात जोमाने गुंतला आहे.

**रासायनिकऐवजी 'सेंद्रिय' आणि 'गट शेती'वर भर द्या:** कृषी विभाग चालू वर्षाच्या खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर कृषी मंडळाधिकारी प्रदिप पाटील यांनी शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीचा अवलंब करण्याचा मोलाचा सल्ला दिला आहे. पाटील म्हणाले की, "शेतकऱ्यांनी रासायनिक शेतीवर होणारा मोठा खर्च आणि जमिनीचा घसरणारा पोत लक्षात घेता, सेंद्रिय शेतीकडे अधिक भर देणे गरजेचे आहे. तसेच, शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतीपेक्षा 'गट शेती' अवलंबल्यास त्यांना खते, बियाणे खरेदीपासून ते थेट बाजारपेठेपर्यंत मोठा आर्थिक फायदा होईल."

## भाजप अनुसूचित जाती मोर्चाच्या शहर जिल्हा सरचिटणीसपदी अभय सिद्धार्थ मगरे यांची नियुक्ती

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चाच्या छत्रपती संभाजीनगर शहर जिल्हा सरचिटणीसपदी अभय सिद्धार्थ मगरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



या नियुक्तीचे पत्र अनुसूचित जाती मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष सचिन लालाजी मिसाळ यांनी प्रदान केले. नियुक्तीपत्रात अभय मगरे यांना पक्ष संघटनेने दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि पक्षहित जपून पार पाडावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

या नियुक्तीबद्दल सचिन लालाजी मिसाळ यांनी अभय मगरे यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच भारतीय जनता पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष किशोर दादा शितोळे यांनीही त्यांचे अभिनंदन करून संघटन बळकटीसाठी प्रभावी कार्य करावे, असा विश्वास व्यक्त केला.

## खरीप हंगामासाठी प्रधानमंत्री फसल विमा योजना

### सात जिल्ह्यांत एचडीएफसी अर्गोकडून अंमलबजावणी

तभा वृत्तसेवा

**हिंगोली :** खरीप हंगाम २०२६ साठी प्रधानमंत्री फसल विमा योजनेची अंमलबजावणी अकोला, धुळे, हिंगोली, जळगाव, पुणे, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांत एचडीएफसी अर्गो जनरल इन्शुरन्स कंपनीमार्फत केली जाणार आहे. कर्जधारक व बिगर कर्जधारक शेतकरी या योजनेचा लाभ घेऊ शकतात. दुष्काळ, पूर, अतिवृष्टी, गारपीट, कीड, रोग आदी नैसर्गिक आपत्तींमुळे होणाऱ्या पीक नुकसानीस विमा संरक्षण मिळणार असून नुकसानभरपाई क्रॉप कटिंग प्रयोगांच्या (सीसीई) आधारे दिली जाईल. पेरणीपूर्व, कापणी व कापणीनंतरच्या जोखमींचाही योजनेत समावेश आहे. अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ असून शेतकऱ्यांनी बँका, सीएससी केंद्रे किंवा अधिकृत प्रतिनिधींमार्फत तसेच पीएमएफबीवाय पोर्टलवर नोंदणी करावी.

# जिल्हा मध्यवर्ती बँकेवर भुमरेंचे वर्चस्व

तभा वृत्तसेवा

**पैठण दि १० :-** औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदाच्या निवडणुकीत पैठण तालुक्याने यंदा नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. प्रथमच तालुक्यातील तीन संचालकांची बँकेवर निवड झाली असून, आमदार विलास भुमरे हे सोसायटी मतदार संघातुन बिनविरोध निवडून आले आहे. तर शिवाजी नागरी बँकेचे अध्यक्ष रवींद्र काळे आणि मुक्ताबाई तांगडे यांची भरघोस मतांनी निवड झाली आहे. या निवडीमुळे जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात पैठण तालुक्याचे राजकीय आणि सहकारी वर्चस्व अधिक ठळकपणे समोर आले आहे.



> जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणूकीत खासदार संदीपान भुमरे व आमदार विलास यांनी संधी दिल्याने हा विजय झाला आहे. जिल्हा बँकेत पैठण तालुक्यातील शेतकऱ्यांचे काम तातडीने कसे मार्गी लागेल यासाठी आपण प्रयत्नशील राहणार
> -- रवींद्र काळे, नवनिर्वाचित संचालक, जिल्हा सहकारी बँक, पैठण.

यापूर्वी सलग पाच कार्यकाळ आमदार असताना विद्यमान खासदार संदीपान भुमरे यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर संचालक म्हणून प्रतिनिधित्व केले होते. त्यांच्या जागी आता त्यांचे पुत्र आमदार विलास भुमरे यांची बिनविरोध निवड झाल्याने भुमरे कुटुंबाचे सहकार क्षेत्रातील नेतृत्व कायम असल्याचे स्पष्ट झाले आहे.

यंदाच्या निवडणुकीत पैठण तालुक्यातील तीन संचालकांची निवड झाल्याने तालुक्याची जिल्हा सहकारी बँकेतील ताकद लक्षणीयरीत्या वाढली आहे. तीन संचालक पदाच्या निवडीमुळे जिल्ह्यातील सहकाराच्या राजकारणात पैठण तालुका आघाडीवर असल्याची चर्चा राजकीय व सहकारी वर्तुळात सुरू आहे.

गेल्या २० वर्षांत पैठण विधानसभा मतदारसंघातील विविध सहकारी संस्थांवर भुमरे गटाने प्रभावी वर्चस्व निर्माण केले आहे. त्यानंतर आता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतही आमदार विलास भुमरे आणि खासदार संदीपान भुमरे यांच्या नेतृत्वाला बळ मिळाले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सहकाराच्या राजकारणात भुमरे गटाचे स्थान आणखी मजबूत झाल्याचे मानले जात आहे.

या निवडीमुळे पैठण तालुक्याच्या सहकार क्षेत्राला निर्णय प्रक्रियेत अधिक प्रभावी प्रतिनिधित्व मिळणार असून, भविष्यात विकासाभिमुख निर्णयांना गती मिळेल, अशी अपेक्षा सहकार क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

### जाहीर प्रगटण / सायटेशन नोटीस
**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब क स्तर न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए. क्र.२६०/२०२६

अर्जदार:- १) तुकाराम पुंजाजी सोनवणे वय ७४ वर्षे धंदा शेतीरा. भावसिंगपुरा, औरंगाबाद २) वाल्मिक पुंजाजी सोनवणे वय ६५ वर्षे धंदा शेती रा. तांदुळवाडी ता. गंगापुर ह.मु. म्हाडा कॉलनी, गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद ३) अशोक पुंजाजी सोनवणे, वय ६८ वर्षे धंदा शेती रा. नागसेन नगर, उस्मानपुरा, औरंगाबाद ४) चंद्रकला भ्र. आसाराम सोनवणे वय ६३ वर्षे, धंदा गृहिणी, रा. मुकुंदवाडी, औरंगाबाद ५) सौ. संगिता बाळु त्रिभुवन वय ४५ वर्षे धंदा गृहिणी रा. मुकुंदवाडी, औरंगाबाद ६) सौ. सुनिता संजु निकाळजे, वय ४३ वर्षे धंदा गृहणी रा. नवनाथ नगर, गारखेडा परिसर, औरंगावद ७) विनोद पि. आसाराम सोनवणे वय ४२ वर्षे धंदा मजुरी ८) सतिष पि. आसाराम सोनवणे वय ४० वर्षे धंदा मजुरी, दोघे रा. मुकुंदवाडी, औरंगाबाद ९) शोभावाई भ्र. पोपट सोनवणे वय ६२ वर्षे धंदा गृहिणी रा. आंबेडकर नगर, सिडको, औरंगाबाद १०) सौ. उज्वला विलास रोकडे वय ४३ वर्षे, धंदा गृहिणी रा. बकवाल नगर, नायगाव ता. गंगापुर जि. औरंगाबाद ११) दिनेश पोपट सोनवणे वय ३९ वर्षे धंदा मजुरी रा. आंबेडकर नगर, सिडको, औरंगाबाद १२) दिपक पोपट सोनवणे वय ३७ वर्षे धंदा मजुरी रा. आंबेडकर नगर, सिडको, औरंगाबाद १३) सिमा भ्र. प्रमोद सोनवणे वय ३३ वर्षे धंदा गृहिणीरा. सिकंदर कॉलनी, मिसरवाडी, औरंगाबाद १४) राजन पि. प्रमोद सोनवणे वय १५ वर्षे, धंदा शिक्षण द्वारा अ.पा.क. आई अर्जदार क्र.१३ १५) कोमल पि. प्रमोद सोनवणे वय १३ वर्षे, धंदा शिक्षण द्वारा अ.पा.क. आई अर्जदार क्र.१३

विरुद्ध

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण:- कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. डि. के. तारु यांच्या मार्फत अर्ज सादर केला की, अर्जदार हे वर नमुद ठिकाणचे रहिवाशी असून अर्जदार क्र.१ ते ३ यांचे वडील नामे पुंजाबा उर्फ पुंजाजी लक्ष्मण सोनवणे हे दिनांक ०५/०५/२००२ रोजी मौजे दिनवाडा ता. गंगापुर येथे मयत झालेले असुन अर्जदार क्र.१ ते ३ यांची आई नामे सुंदराबाई या देखील दिनांक ३१/०७/२०१३ रोजी मयत झालेल्या आहेत. पुंजाबा उर्फ पुंजाजी यांची आई नामे गोदावाई या पुंजावा यांच्या पुर्वी मयत झालेल्या आहे. मयत पुंजाबा आणि सुंदराबाई यांना अर्जदारांशिवाय अन्य दोन मुले आसाराम व पोपट ही देखील होती त्यापैकी आसाराम हे दिनांक १२/०८/२०१३ रोजी तर पोपट हे दिनांक २६/०४/२०१७रोजी मयत झालेले आहे. मयत आसाराम यांच्या पश्चात अर्जदार क्र.४ ते ८ हे वारस असुन अर्जदार क्र.४ ही अर्जदार क्र.५ ते ८ यांची आई आहे. त्याच प्रमाणे पोपट यांचे मृत्यु पश्चात अर्जदार क्र.९ ही विधवा पत्नी तर अर्जदार क्र.१० ते १२ ही अपत्ये आणि अन्य एक मुलगा नामे प्रमोद जो दिनांक १७/०७/२०२२ रोजी मयत झालेला आहे, त्यास अर्जदार क्र.१३ ही विधवा पत्नी तर अर्जदार क्र.१४ व १५ ही अपत्ये आहेत. मयत पुंजाबा उर्फ पुंजाजी लक्ष्मण सोनवणे यांना वर नमुद अर्जदारांशिवाय अन्य कोणीही ज्ञात कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन अर्जदारांनी या न्यायालयात वारसप्रमाणपत्राची मागणी केली आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदाराच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप, उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप, उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २२/०४/२०२६ दिले. प्रकरणात पुढील तारीख दिनांक १९/०६/२०२६ रोजीची ठेवण्यात आलेली आहे.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक. सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर गंगापूर




### मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.
**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: 64/2026

अर्जदारः- 1) कविता प्रभाकर जाधव वय- 35 वर्षे धंदा-मजुरी रा.डाभा ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) ह.मु. संतोष किराणा स्टोअर भीम सेवक संघ, टाटानगर, गोवंडी, शिवाजीनगर मुंबई पीन कोड नं. 400043 2) संचिता पिता-प्रभाकर जाधव वयः-19 वर्षे, धंदा-शिक्षण रा. वरीलप्रमाणे

// विरूध्द //

गैरअर्जदारः- कोणीही नाही.

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळवीण्यात ते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. अर्जदार नं. 1 ची अजलसासू (सासुची सासू) व अर्जदार नं. 2 ची आजीची सासू नामे. कस्तुराबाई भीका हिवाळे ह्या दि. 28/09/2016 मौजे डाभा (ग्रामपंचायत हद्दीत) ता. सोयगांव जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असुन त्यांच्या पश्यात वरील सर्व अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहे. यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र हे अर्जदारांना शासकीय कामासाठी व शासकीय लाभासाठी मे. कोर्टाकडुन वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. करीता, अर्जदार यांना कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता, सदर अर्ज अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांकः- 5/8/2026).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसीध्द झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रासह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर रित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांकः- 8/7/2026 ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद

### मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.
**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: 170/2025

अर्जदारः- 1) समृध्दीन उर्फ समशोद्दीन अमीर तडवी वयः 45 वर्षे, धंदाः- मजुरी 2) जंगलु अगीर तडवी वय 40 वर्षे, धंदा मजुरी वरील सर्व अर्जदार राघोसला ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर

// विरूध्द //

गैरअर्जदारः- कोणीही नाही.

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळवीण्यात ते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब सोयगांव तां. सोयगांव जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत कै. इनस्ताजबी उर्फ इनताजबी अमीर तडवी ह्या दि. 07/05/2021 व अर्जदारांचे वडील मयत नामेकै अमीर समशेर तडवी हे दि.06/08/2004 ला मौजे घोसला ता. सोयगांव जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असुन अर्जदारांचे वडील मयत नामे कै अमीर समशेर तडवी हे दि.06/08/2004 व आई मयत नामे कै. इनस्ताजबी उर्फ इनताजबी अमीर तडवी ह्या दि. 07/05/2021 ला मौजे घोसला (ग्रामपंचायत हद्दीत) ता. सोयगांव जि. औरंगाबाद येथे मरण पावलेले असुन त्यांच्या पश्यात वरील सर्व अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहे, असा अर्ज न्यायालयात वकीला मार्फत दाखल केलेला आहे. सर्व अर्जदार हे मयत नामे कै. इनस्ताजबी उर्फ इनताजबी अमीर तडवी व अमीर समशेर तडवी यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र हे अर्जदारांना शासकीय कामासाठी व शासकीय लाभासाठी मे. कोर्टाकडुन वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. करीता, अर्जदार यांना कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता, सदर अर्ज अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. (पुढील दिनांकः-23/07/2026).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसीध्द झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रासह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर रित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक 8/7/26 ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद

### मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.
**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.:-67/2026.

अर्जदारः- 1) अरूण साहेबराव पाटील (खैरनार) वय 40 वर्षे, धंदा शेती 2) सरलाबाई साहेबराव पाटील (खैरनार) वय 70 वर्षे, धंदा शेती दोन्ही रा बनोटी ता. सोयगाव जि. औरंगाबाद

// विरूध्द //

गैरअर्जदारः- कोणीही नाही.

अर्ज वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळवीण्यात ते की, उपरोक्त अर्जदारानी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत कै. साहेबराव नंथु पाटील (खैरनार) हे दिनांक- 14/07/2005 ला मौजे बनोटी ता. सोयगांव जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असुन अर्जदार नं. 1 चे वडील व अर्जदार नं. "चे पती नामें सहिँबराव नथु पाटील (खैरनार) हे दि. 14/07/2005 ला मौजे बनोटी (ग्रामपंचायत हद्दीत) ता. सोयगांव जि. औरंगाबाद येथे मरण पावलेले असुन त्यांच्या पश्यात वरील सर्व अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहे, असा अर्ज न्यायालयात वकीला मार्फत दाखल केलेला आहे. सर्व अर्जदार हे मयत कै. साहेबराव नंथु पाटील (खैरनार) यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र हे अर्जदारांना शासकीय कामासाठी व शासकीय लाभासाठी मे. कोर्टाकडुन वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. करीता, अर्जदार यांना कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता, सदर अर्ज अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेला आहे (पुढील दिनांकः 6/8/2026).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारेरा प्रभागपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी है जाहीर प्रगटनव्दारे प्रसीध्द झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रासह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर रित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक: 8/7/2026 ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद

### मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.
**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: 76/2026

अर्जदारः- 1) धीरज सुभाष उर्फ सुपडु पाटील वयः 25 वर्षे, धंदाः खाजगी नोकरी रा. वडगाव (ती) ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर). ह.मु. दुर्गामाता मंदीराजवळ, चाळ नं.2 रूम नं. 4 मु. नेवाडी पो. मंगरूळ कल्याण (पुर्व) जि.ठाणे पीन 421306 2) अर्चना स्वप्नील पाटील वयः 40 वर्षे, धंदाः घरकाम सखाराम महाराज मार्ग रूम नं. 9 ओम नमो शिवाय जिनिंग पारोळा ता. पारोळा जि.जळगाव

// विरूध्द //

गैरअर्जदारः- कोणीही नाही.

अर्ज - वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळवीण्यात ते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत कै. सुभाष उर्फ सुपडू नागो पाटील हे दिनांकः-20/10/2019 ला मौजे वडगाव (ती) ता. सोयगांव जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असुन तसेच अर्जदारांची आई मयत नामे शोभा सुभाष उर्फ सुपडू पाटील ह्या दि.20/06/17 ला मौजे कल्याण पुर्व येथे उपचार घेत असतांना मयत झालेली आहे अर्जदारांचे वडील मयत कै. सुभाष उर्फ सुपडू नागो पाटील व आई मयत नामे.-शोभा सुभाष उर्फ सुपडू पाटील हे मौजे वडगाव (ती) (ग्रामपंचायत हद्दीत) ता. सोयगांव जि. औरंगाबाद येथे व कल्याण पुर्व येथे उपचार घेत असतांना मरण पावलेले असुन त्यांच्या पश्यात वरील सर्व अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहे यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र हे अर्जदारांना शासकीय कामासाठी व शासकीय लाभासाठी मे. कोर्टाकडुन वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. करीता, अर्जदार यांना कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता, सदर अर्ज अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांकः- 22/7/2026).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसीध्द झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रासह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर रित्या योग्य ते प्रमाणपत्रं देण्यात येईल.

आज दिनांकः- 8/7/2026 ला रोजी राही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद

### मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.
**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.:- 34/2025

अर्जदारः- 1) मीराबाई भिका कायटे वय 60 वर्षे धंदा-शेती 2) रविंद्र भिका कायटे वयः 42 वर्षे, धंदाः-शेती 3) जितेंद्र भिका कायटे वयः 40 वर्षे, धंदाः- शेती 4) प्रदीप भिका कायटे वय 38 वर्षे धंदा-शेती वरील सर्व रा. पळसखेडा सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद ता

// विरूध्द //

गैरअर्जदारः- कोणीही नाही.

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळवीण्यात ते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. अर्जदार नं.1 "चे पती व अर्जदार नं. 2 ते 4 ये वडील मयत नामे कै. भिका हिरामन कायटे हे दि. 28/09/2022 ला मौजे पळसखेडा (ग्रामपंचायत हद्दीत) ता. सोयगांव जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असुन त्यांच्या पश्यात वरील सर्व अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहे. यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र हे अर्जदारांना शासकीय कामासाठी व शासकीय लाभासाठी मे. कोर्टाकडुन वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. करीता, अर्जदार यांना कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता, सदर अर्ज अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांक:5/8/2026).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसीध्द झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रासह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर रित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनाकः-8/7/2026 ला रोजी राही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद

### मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.
**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: 121 / 2026

अर्जदारः- 1) सुमनबाई नाना जगताप, वयः 60 वर्षे, धंदाः शेती. 2) राहुल नाना जगताप वयः 33 वर्षे, धंदाः- शेती. 3) पंकज नाना जगताप, वयः 30 वर्षे, धंदाः शेती. 4) इंद्रजीत नाना जगताप वयः 28 वर्षे, धंदाः शेती, वरील सर्व रा गलवाडा (ब) ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)

// विरूध्द //

गैरअर्जदारः-कोणीही नाही.

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळवीण्यात ते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत कै. नाना राजाराम जगताप हे दिनांकः-21/12/2025 ला मौजे महाजन हॉस्पिटल मालेगाव जि. नाशिक येथे उपचार घेत असतांना मयत झालेले असुन त्यांच्या पश्यात वरील सर्व अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहे, असा अर्ज न्यायालयात वकीला मार्फत दाखल केलेला आहे. सर्व अर्जदार हे मयत कै. नाना राजाराम जगताप यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र हे अर्जदारांना शासकीय कामासाठी व शासकीय लाभासाठी मे. कोर्टाकडुन वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. करीता. अर्जदार यांना कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदर अर्ज अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. (पुढील दिनांक: 29/07/2026).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसीध्द झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रासह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर रित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक: 08/07/2026 ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद